# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. ३१/१०/२०११**

आज सोमवार दि. ३१/१०/२०११ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. १७/१०/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १४) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १८) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १९) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| २०) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २१) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २२) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २४) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३०) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३१) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३२) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३३) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३४) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३५) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३६) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३७) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३८) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३९) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४०) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४१) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४३) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४४) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४५) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४६) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४७) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४८) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ४९) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५०) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५१) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५२) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५३) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५४) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५५) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५६) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५७) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५८) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६०) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६१) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६२) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६३) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६४) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६५) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६६) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६७) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ६८) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | हंसु कमलकुमार पांडे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ३) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ४) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ५) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ६) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ७) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ८) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ९) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| १०) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ११) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |

**रजेचा अर्ज – निरंक**

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |

**मा. महापौर :-**

सन्मा. सर्व नगरसेवक, नगरसेविका, मिरा भाईंदरचे मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौर श्री. जयंत पाटील, प्रशासन अधिकारी, पत्रकार आणि प्रेक्षक गॅलरीतील सर्व प्रेक्षक. आपल्या सर्वांना ही दिपावली आणि नविन वर्ष, त्याचप्रमाणे ईद या तिन्ही सणांच्या हार्दिक शुभेच्छा देतो. ही दिवाळी आणि ईद हे सण अतिशय चांगल्या तऱ्हेने जातील अशी आशा करुन आपल्या देवीकडे प्रार्थना करतो की, अशाच तऱ्हेने सर्वांना चांगली बुद्धी दे आणि सर्वांना मार्गदर्शन कर. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार, दि. ३१/१०/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. १७/१०/२०११ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. बारा वाजून दहा मिनिटे झालेली आहेत. श्री. अनिल सावंत यांचा प्रश्न आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

सचिव साहेब, प्रोसिडींग में समय भी डालीए। प्रोसिडींग मे समय लिखकर नही आता है।

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, आजचा जो प्रश्न आहे तो प्रश्न आहे, मिरा भाईंदर महानगरपालिकेत मिरारोड येथे पोलिस स्टेशनसाठी दोन हजार स्वेअर मीटर जागेचे आरक्षण होते. त्याच्यासाठी सुरुवातीला शासनाकडुन प्रस्ताव आला होता की, ते समावेशक आरक्षणामध्ये विकसीत करावे. विकासक ते विकसीत करेल. पण समावेशक आरक्षणामध्ये ते विकसीत केल्यानंतर जी जागा उपलब्ध होणार होती ती फक्त ४०० चौ. मीटर जागा उपलब्ध होणार होती आणि या संपूर्ण मिरा भाईंदरची वाढती लोकसंख्या आणि विशेषतः मिरारोडमध्ये जी वाढलेली लोकसंख्या आहे, तर आज मिरारोड मधील रहिवाशांना एकमेव कनाकिया पोलिस स्टेशन आहे आणि कनाकिया पोलिस स्टेशनची आजची परिस्थीती अशी आहे की, तिथे उभे रहायलासुद्धा जागा नाही. अक्षरशः रोडवर गाड्या पार्किंग होतात आणि हे आरक्षण जर समावेशक आरक्षणामध्ये विकसीत केले तर ती जागा पोलिस स्टेशनसाठी अपूरी पडणार होती त्यामुळे हे आरक्षण शासनाने पूर्णतः विकसीत करावे यासाठीच्या सुचना आणि तक्रारी बऱ्याचशा नगरसेवकांनी राज्य शासनाला पाठवलेल्या आहेत. मी ज्या ठिकाणी प्रश्न विचारल्यानंतर मला प्रशासनाकडुन असे उत्तर आलेले आहे या प्रकरणात पूर्नःविचार होऊन आरक्षणातील क्षेत्र शासन संपादित करणार आहे आणि आमची मागणी हीच आहे की, शासनाने ते क्षेत्र संपादित करुन त्या ठिकाणी फुलफ्लेज पोलिस स्टेशन की, ज्या ठिकाणी पार्किंगची चांगली व्यवस्था असेल, पोलिस स्टाफसाठी क्वॅार्टरची व्यवस्था असेल आणि अशा प्रकारे हे आरक्षण विकसीत करावे. माझी प्रशासनाला अशी विनंती आणि विचारणा आहे की, हे आरक्षण क्षेत्र शासन संपादित करणार आहे ते काम कोणत्या स्टेजला आलेले आहे. कारण हे पोलिस स्टेशन लवकरात लवकर विकसीत होणे फार गरजेचे आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. यापूर्वी अकोमोडेशन रिझर्व्हेशनखाली डेव्हलपमेंट करण्याचा शासनाने पूर्नविचार केला असून हे आरक्षण शासन पूर्णतः विकसीत करणार आहे. याबाबत संपादनाचा प्रस्ताव पोलिस विभागाकडुन शासनाकडे सादर होणार आहे. अद्याप प्रस्ताव सादर झालेला नाही. हा निर्णय नुकताच झालेला आहे. पोलिस विभागाकडील पत्र आमच्या कडे २१/१० ला आलेले आहे. आणि तिकडून ४ ऑगस्टला पत्र आलेले आहे. लवकरात लवकर कार्यवाही करणेबाबत आम्ही पोलिस विभागाला लिहिणार आहे.

**एस.ए. खान :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. श्री. अनिल सावंत यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यामध्ये आपल्याला माहिती आहे की, मिरारोडची लोकसंख्या वाढत चाललेली आहे आणि आपले मिरा भाईंदर शहर मुंबईच्या जवळ असल्यामुळे मिरारोडची जी लोकसंख्या आहे त्यामध्ये दोन पोलिस स्टेशन पाहिजे. कमीत कमी हा जो प्रस्ताव आहे ती इमारत शासनाने पोलिस स्टेशनसाठीच बांधली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

२१/१० ला प्रस्ताव पाठवलेंले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

मी पत्र वाचुन दाखवतो. मा. पोलिस महासंचालक यांच्याकडुन पत्र आलेले आहे. संदर्भित विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील मौजे भाईंदर सर्वे क्र.४९६, ४८२ या जागेवर आरक्षण क्र.१८४ (अ) पोलिस स्टेशनसाठी आरक्षित भुखंड समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसीत करण्यास विकासक मे. आर. एस. असोसिएट्स यांना दि.१८ सप्टेंबर २००९ च्या पत्रांन्वये शासन मान्यता देण्यात आली होती. आत्ता सदर प्रकरणी पुर्नविचार करण्यात आला असून सदर भुखंडाचे शासनाने भुखंडाच्या भुसंपादनाच्या दृष्टीने पुढील कार्यवाही त्वरीत सुरु करावी असे पत्र त्यांनी पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांना दिलेले आहे. हे पत्र आम्ही पोलिस स्टेशनकडुन २१/१० ला प्राप्त करुन घेतलेले आहे.

**अनिल सावंत :-**

मी. मा. महापौरांना विनंती करतो की, त्यांनी मा. आयुक्तांना आदेश द्यावे की, याची कार्यवाही लवकरात लवकर करावी जेणेकरुन मिरारोडला ते पोलिस स्टेशन बांधले जाईल.

**मा. महापौर :-**

मौजे भाईंदर सर्व्हे नं.४९६ नविन १०५/१८४, पोलिस स्टेशन या आरक्षणासाठी शासन संपादित करणार आहे. शहरातील वाढती लोकसंख्या व अपूरे पोलिस स्टेशन याकरीता सुरक्षित पोलिस स्टेशन

विकसीत करणे गरजेचे आहे. तरी मा. आयुक्तांनी सदर आरक्षण शासनाकडुन आरक्षित क्षेत्र संपादित करुन घेऊन पोलिस स्टेशन विकसीत करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी असा मी आदेश देत आहे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये मी आपल्याला एकच सांगतो की, हे जे पोलिस स्टेशनचे काम आहे हे पोलिस खात्यामार्फत होते आणि भुसंपादनाची सगळी प्रक्रिया ही पोलिस खात्यामार्फतच होणार याच्यामध्ये नगरपालिकेमार्फत भुसंपादनाची प्रक्रिया होणार नाही.

**एस.ए. खान :-**

आपल्याला जी काही मदत द्यायची असेल तर आपण हातभार लावा कारण ते पोलिस स्टेशन आपल्या हद्दीत आहे आणि आपले जे नागरीक आहेत, त्यांच्या संरक्षणासाठी ते आहे.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे बरोबर आहे.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न श्री. अनिल दिवाकर सावंत यांचा आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, दुसऱ्या प्रश्नामध्ये या शहरामध्ये जी एम.एम.आर.डी.ए ची रेंटल हाऊसिंग स्कीमच्या अंतर्गत काही प्रकल्प सॅन्क्शन केलेले आहेत. मला प्रशासनाला असे विचारायचे आहे की, त्यांनी कोणत्या रुलच्या अंडर हे प्रकल्प सॅन्क्शन केले आहेत?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने ०४/११/२००८ रोजी एक नोटीफिकेशन जारी केलेले आहे. त्या नोटीफिकेशन नुसार रेंटल हाऊसिंगची स्कीम मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू केलेली आहे. त्यात सर्व जे नियम विशद केलेले आहे. त्या नियमाअंतर्गत ही परवानगी देण्यात आलेली आहे.

**अनिल सावंत :-**

४ नोव्हेंबर २००८ च्या ज्या पत्राचा आपण उल्लेख केला. त्या पत्राच्या अनुषंगाने आपण परवानगी दिली. पण त्या पत्रामध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे की, त्याच्यामध्ये डायरेक्शन्स दिलेले आहेत ते बघा. डि डायरेक्शन बघा After completing the legal procedure as laid down under section 37(1) of the said act, the said modification proposal shall be submitted to the government on final section. Pending section to these modification by the govt. under section 37(2) of the said act, the above mention modification shall come into effect fourth way

**सत्यवान धनेगावे :-**

बरोबर आहे. त्याचनूसार आम्ही केलेले आहे.

**अनिल सावंत :-**

मग ते ३७(१) खाली मा. महासभेने मायनर मोडीफिकेशन केलेले आहे का? आपल्या डि.सी. रुलमध्ये चार एफ.एस.आय. द्यायचे प्रोव्हिजन आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

डि.सी. रुलमध्ये ही प्रोव्हिजन इनकॉर्पोरेट झालेली आहे. १५४ चे डायरेक्शन्स आहेत. या डायरेक्शन्स नुसार ही तरतुद आपल्याला लागु झालेली आहे.

**अनिल सावंत :-**

३७(१) खाली मा. महासभेने जे मायनर मोडीफिकेशन करायला पाहिजे. ते महासभेने केलेले आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. हा विषय मा. महासभेला मागे दोन तीन वेळेस दिला होता. प्रत्येक वेळी हा विषय मा. महासभेला आलेला नाही. परंतु, आत्ता डि.सी. रुल डायरेक्टली लागु झालेले आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. महासभेला विषय आला नाही म्हणजे सॅनक्शन झाले असे तुम्ही गृहित धरले का?

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, गृहित धरण्याचा प्रश्न नाही. हे एमआरटीपी ॲक्टच्या १५४ चे डायरेक्टीव आहेत आणि यातच म्हटलेले आहे. एस. क्लॉजनुसार हे नियम लागु झालेले आहेत.

**अनिल सावंत :-**

जर तुम्ही शासनाकडे प्रपोजल पाठवले आणि ते सॅक्शन झाले नसेल तर लागु होतील पण प्रपोजल पाठवणे गरजेचे आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

On the date of publication of this notice हे लागु झालेले आहे.

**अनिल सावंत :-**

डेट ऑफ पब्लीकेशनला त्यातील गाईडलाइनसुद्धा तुम्हाला लागु झाल्या आहेत. त्या गाईडलाईनमध्ये म्हटलेले आहे की, तुम्ही शासनाला प्रपोजल पाठवा. शासनाला प्रपोजल पाठवल्यानंतर जरी ते सॅन्क्शन झाले नाही तरी ते तुम्हाला लागु आहे. पण मुळात तुम्ही शासनाला प्रपोझल पाठवले आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महासभेला प्रपोझल घेतलेच नाही. मागे दोन-तीन वेळा विषय दिला होता.

**अनिल सावंत :-**

दोन तीन वेळा दिला म्हणजे सॅन्क्शन झाले असे तुम्ही गृहित धरता का? मा. महापौर साहेब, ही फोर एफ.एस.आय. रेंटल हाऊसिंग स्किम या शहरासाठी एवढी घातक आहे. ब-याचशा महानगरपालिकांनी एम.एम.आर.डी.ए. ची ही स्किम फेटाळून लावलेली आहे. या स्किमच्या अंडर एम.एम.आर.डी.ए. डायरेक्ट फोर एफएसआय सॅन्क्शन करते म्हणजे ज्या ठिकाणी दहा माळ्यांची बिल्डींग बनणार आहे त्याला फोर एफएसआय दिल्यानंतर ॲडीशनल थ्री एफएसआय त्याला मिळतो आणि दहाचे चाळीस माळे होतात. आज या शहराची लोकसंख्या जवळ जवळ आठ लाख चौदा हजार झालेली आहे. आणि या शहराचा एकुण एरीया ७९ स्क्वेअर किलोमिटर आहे. राज्य शासनाने एक धोरण निश्चित केलेले आहे की, शहरामध्ये पॉप्युलेशनची किती डेन्सीटी असायला पाहिजे. मॅक्झीमम दहा हजार पॉप्युलेशन पर स्क्वेअर मीटर या शहरामध्ये पर स्क्वेअर किलोमीटर एवढे लोक राहू शकतात. आज या शहरामध्ये पाण्याचा ज्वलंत विषय झालेला आहे आणि आपण ऑलरेडी ७९ स्क्वेअर किलोमीटरमध्ये दहा हजार पूर्वीच क्रॉस केलेले आहेत. दहा हजाराच्या वर या शहरामध्ये पॉप्युलेशन झालेले आहे. गटार, नाले, रोड यांचा मुख्य प्रश्न आहेच. मेन प्रश्न आहे की, या साडेआठ लाख लोकांचा दररोज निघणारा कचरा आणि पाणी. आज वॉटर सप्लाय ४८ ते ५२ तासावर गेलेले आहे आणि लोकांना २५ ते ३० मिनिटे पाणी मिळते आणि ही जी ॲडशिनल पॉप्युलेशन वाढणार आहे त्या वाढणा-या पॉप्युलेशनला आपण या सोयी सुविधा कशा प्रकारे देणार आहोत? उल्हासनगर महानगरपालिकेने हा प्रस्ताव सरळ फेटाळून लावला. आज दुर्देवाने सांगावेसे वाटते की, ह्या प्रशासनाला या शहराच्या बाबतीत काही सोयर-सुतक राहीलेलं नाही. आज सहा स्कीम या फोर एफ.एस.आय. च्या अंडर महापालिकेने सॅक्शन केलेल्या आहेत. त्यांना सी.सी. दिलेले आहेत. त्यांना सीसी दिल्यानंतर ते पॉप्युलेशन कुठे अकोमोडेट होणार? त्यांना आपण कुठे फॅसिलिटी देणार आहोत? याचा जरा प्रशासनाने खुलासा करावा. आज महापालिकेचे बजेट, मिळणारे इन्कम आणि सोयीसुविधा पुरविण्यासाठी पडणारा ताण लक्षात घेतला तर ऑलरेडी आहे ती पॉप्युलेशनच एवढी जास्त आहे की, त्यामध्ये ॲडीशनल एफएसआय देऊन या शहरावर लोकसंख्येचा आणखीन भुर्दंड पडणार तर आहे तर या महानगरपालिकेची एवढी आर्थिक परिस्थीती नाही की, आपण त्यांना सोयी सुविधा देऊ शकु आणि महाराष्ट्र शासनाने किंवा एम.एम.आर.डी.ए. ने कुठेही बाईडींग केलेले नाही की, ही स्कीम तुम्ही राबवलीच पाहिजे. शासनाने सर्व्हे केला होता आणि या महानगरपालिकांमध्ये ही स्किम राबवावी असा प्रस्ताव होता. उल्हासनगर महापालिकेने फेटाळून लावलेला आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये या रेन्टल हाऊसींगच्या ज्या स्किम आहेत, आत्ता जे कमिशनर आहेत त्यांनी त्या सर्व स्कीमला स्टे दिलेला आहे. कारण या स्कीमच्या अंडर तुम्ही चार एफ.एस.आय. दिल्यानंतर २५ टक्के, १७० स्वेअर फुटची घरे विकासक बांधून एम.एम.आर.डी.ए. इतर लोकांना देणार आहे. म्हणजे या शहरामध्ये किती पॉप्युलेशन राहू शकेल याचा विचार एकदा व्हायला पाहिजे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, श्री. अनिल सावंत यांनी जो विषय मांडलेला आहे तो अतिशय योग्य विषय आहे. मुळात शासनाने आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये ही योजना मंजूर व्हावी असे स्पष्ट गाईड लाईन त्याच्यामध्ये आहेत मुळात ती प्रक्रिया आपण पूर्ण केलेली नाही आणि त्या लोकांना आपण परवानगी दिलेली आहे आणि नुकतेच मा. आयुक्त साहेबांनी नविन इमारतींना पाणी द्यायचे नाही अशी आपली प्रशसनानची एक भुमिका आहे म्हणजे ते चार एफ.एस.आय. म्हणजे आपण अजून चारपट लोकसंख्या वाढवतो. त्यांना एम.एम.आर.डी.ए. ची जरी ती योजना असेल, तरी त्या लोकांना पाणी देण्याची जबाबदारी मिरा भाईंदर महानगरपालिकेची आहे. इतर ज्या नागरी सुविधा आहेत त्यादेखील आपणच द्यायच्या आहेत. मग आपली त्या गोष्टीला परवानगी असणे अत्यंत गरजेचे आहे आणि भविष्यात आपण अशी जर लोकसंख्या वाढवत बसलो, इमारती वाढवत बसलो तर त्या लोकांना पाणी कुठून देणार?

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, एम.एम.आर.डी.ए. नियोजन समितीची गृहनिर्माण अभ्यास गटाची त्यांच्या कार्यालयामध्ये ०८/०४/२०११ ला एक मिटींग झाली होती. त्यावेळी नियोजन समितीचे आम्ही सर्व सदस्य उपस्थित होतो. त्यावेळी शासनाचे जे धोरण आहे त्या धोरणातील फक्त थोडा भाग तुम्हाला वाचून दाखवतो. महानगर प्रदेशातील म्हणजे आपल्या एम.एम.आर.डी.ए. च्या अंडर जे एरीया येतात त्याच्यामध्ये मिरा भाईंदरसुद्धा येते, झोपडपट्टयांचा अभ्यास करुन त्यांच्या पुर्नवसनाबाबत उपाय योजना सुचविणे व रस्त्यांची

वाढ रोकण्याचे प्रस्ताव करावे. लोकसंख्येची घनता जास्त दहा हजार प्रति चौरस किलोमिटर पेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रामध्ये कोणत्याही नविन उद्योगास गुंतवणुकीस नविन बांधकामास रहिवासी, व्यापारी व औद्योगिक, माहिती तंत्रज्ञान कार्यालये, बँका इत्यादी ज्यातून पन्नासपेक्षा जास्त आस्थापना निर्माण होतील अशा प्रकारच्या गुंतवणुकीस परवानगी देऊ नये. जेणेकरुन सदर गुंतवणुकीस सदर महानगर क्षेत्रातील कमी घनता असलेल्या क्षेत्रात विस्थापित होतील. पर्यायाने संपूर्ण महानगर क्षेत्राच्या विकासाचा समतोल राहिल. ह्या अभ्यासगटाने या महाराष्ट्र राज्य शासनाच्या सुचना आहेत. ज्या या अभ्यासगटाने एम.एम.आर.डी.ए. रिजनल क्षेत्रामध्ये आंगिकारलेल्या आहेत. दहा हजारपेक्षा जास्त घनता असलेल्या क्षेत्रामध्ये नविन बांधकामास परवानगी देऊ नये. आज आपली परिस्थीती अशी आहे की, २०११ च्या सेन्सेक्स प्रमाणे आपली लोकसंख्या पर स्क्वेअर किलोमीटरला तेरा हजाराच्या वर गेलेली आहे मग हा वाढीव एफएसआय देऊन महापालिकेवर हा जो भार पडणार आहे, त्याचे निकारण आपण कशाप्रकारे करणार आहात. कारण तुमचे बहुतेक प्रोजेक्ट आत्ता कम्प्लीशनच्या मार्गावर आहेत. उद्या पाचसहा महिन्यामध्ये लोक येऊन रहायला लागतील.

**सत्यवान धनेगावे :-**

महापालिका क्षेत्रात फक्त दोन प्रोजेक्टचेच काम चालू आहे. बाकी प्रोजेक्टचे काम सुरु झालेले नाही.

**अनिल सावंत :-**

हा जो तुमचा चेकनाक्याला प्रोजेक्ट चालू आहे लॉयन पेन्सीलची जागा तुम्ही दिली. तो कम्प्लीशनच्या स्टेजवर आहे. पाच-सहा महिन्यामध्ये तो कम्प्लीट होईल. मग त्या लोकांना तुम्ही पाणी, रस्ते, गटारे कुठून देणार आहात?

**सत्यवान धनेगावे :-**

अंतर्गत इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंट पूर्ण डेव्हलपरने करायची आहे.

**अनिल सावंत :-**

अंतर्गत म्हणजे काय? इंटरनल रोड आणि पाईप लाईन?

**सत्यवान धनेगावे :-**

बाहेरुन त्यांना बाकीच्या बाबतीत पाचशे रुपये पर स्क्वेअर मीटर त्यांनी एम.एम.आर.डी.ए. कडे जमा करायचे आहेत आणि त्यातील ९० टक्के हे मिरा भाईंदर कॉर्पोरेशनला इन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंटसाठी मिळणार आहेत.

**अनिल सावंत :-**

४५० रुपये पर स्वेअर मीटर ना? म्हणजे १००० स्वेअर फुटला ४५० रुपये?

**सत्यवान धनेगावे :-**

९० टक्के म्हणजे ४५० रुपये पर स्वेअर मीटर आपल्याला मिळणार आहेत.

**अनिल सावंत :-**

मग स्वेअर फुटला किती? तुम्हाला दहा स्वेअर फुटला ४५० रुपये मिळणार आहेत आणि ते ४५० रुपये कधी मिळणार आहेत?

**सत्यवान धनेगावे :-**

प्रोजेक्ट कम्प्लीशनच्या आत त्यांनी एम.एम.आर.डी.ए. कडे जमा करायचे आहेत आणि एम.एम.आर.डी.ए. आपल्याकडे देणार.

**अनिल सावंत :-**

एम.एम.आर.डी.ए. कधी देणार त्याचा भरोसा नाही. एम.एम.आर.डी.ए. घरे बनवून घेणार आणि ती २५ टक्के भाड्याने देऊन टाकणार. उरलेली जी ७५ टक्के घरे आहेत, कमर्शिअल प्रिमायसेस आहेत ती विकून बिल्डर मोकळा होणार.

**सत्यवान धनेगावे :-**

प्रायर टू कम्प्लीशन आपण त्यांच्याकडुन पैसे जमा करुन घेणार.

**अनिल सावंत :-**

साहेब, त्याच्यामध्ये तुम्ही काय काय इन्फ्रास्टक्चर देणार आहात? That is sufficient for this corporation? त्यांना पाणी कुठून देणार आहात ते सांगा.

**सत्यवान धनेगावे :-**

पाण्यासाठी आपली नविन स्कीम येतेच आहे.

**अनिल सावंत :-**

कोणती स्कीम येते आहे?

**सत्यवान धनेगावे :-**

वाढीव पाणी पुरवठा स्कीम आहे.

**अनिल सावंत :-**

वाढीव पाणी पुरवठा ज्यावेळी मा. महासभेने ते सॅक्शन केले त्यावेळी दोन ते अडीच वर्षे गृहीत धरले होते. त्याला अजून किती वर्षे लागतील सांगता येत नाही. आणि सहा महिन्यामध्ये लोक राहायला येणार आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

हा रेंटल हाऊसिंगचा गव्हर्नमेंटचा डिसीजन आहे.

**जुबेर इनामदार :-**

श्री. धनेगावे साहेब, थोडक्यात असे आहे. प्रश्न एवढा सुंदर आहे. पाणी हा मोठा विषय, दुसरे आरोग्य हे दोन विषय जे आहेत ते विकासकर्ता त्यांना कधी पुरवू शकणार नाही. आपल्याकडे या शहरामध्ये आरोग्याचा कुठे ठावठिकाणा नाही. पुनम सागरमध्ये साठ बेडचे हॉस्पीटलासुद्धा आजपर्यंत सुरु करु शकलो नाही. पाण्याचा विषय आपल्याकडे तीन वर्षे, येणाऱ्या योजना ज्या आहेत त्या तीन वर्षे पूर्ण होणार नाहीत आहेत त्या लोकांना आपण सोयी सुविधा देऊ शकत नाही.

**एस.ए. खान :-**

मा. महापौर साहेब, माझे सुद्धा तेच म्हणणे आहे की, जे जूने लोक इथे राहतात त्यांना आपण सोयी सुविधा देत नाही आणि आपण जे २५-३० माळ्याचे टॉवर बांधणार आहोत, त्यांना पाणी पुरवठा कुठून करणार आहात? आणि आपल्याकडे इन्फ्रास्टक्चर कुठे आहे? रस्ते बांधून त्याच्यामध्ये काय होणार आहे? आणि आपण मान्यता पण घेतलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

३७ खाली मान्यता घेतलेली नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

मान्यतेसाठी विषय आला तर विषय घेत नाही आणि पून्हा मान्यता घेत नाही असे बोलता.

**अनिल सावंत :-**

डायरेक्शन दिलेले आहेत ते तुम्ही वाचा.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, ''एफ'' मध्ये वाचा, ''एफ'' मध्ये दिलेले आहे. It is applicable……..

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही शहरामध्ये एवढे मोठे धोरण राबवता आणि तुम्हाला त्याला जनरल बॉडीची मान्यता लागणार नाही? असे शहर बनू शकते का?

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त महोदय, जरा या गाईडलाईन वाचा ज्या मी तुम्हाला देतो. मा. महासभेमध्ये विषय येत नाही म्हणून परस्पर त्याला सॅक्शन करणे, बिल्डरना परमिशन देणे आणि या शहराचा बोजा वाढविणे...........

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट अशा बऱ्याच प्रकरणामध्ये १५४ चे डायरेक्शन देते तुम्ही ३७ करत रहा. परंतु याची अंमलबजावणी..............

**अनिल सावंत :-**

पण साहेब, ही स्कीम शहराला किती हानीकारक आहे, हे तुम्हाला कळते का? तुम्ही या शहरामध्ये राहत नाहीत त्यामुळे शहरातील प्रॉब्लेम तुम्हाला माहिती नाहीत.

**सत्यवान धनेगावे :-**

यामध्ये रेंटल हाऊसिंगचे रिव्हीजन चालू आहे. पॉलीसी रिव्हीजन होत आहे. त्यामध्ये आपल्याला २५ टक्के घरे देण्याबाबत त्यांच्या स्तरावर विचार चालू आहे.

**अनिल सावंत :-**

तो विचार होऊ द्या. पण फोर एफ.एस.आय. आज मोडकळीला आलेल्या इमारतींचा मोठा प्रश्न या शहरामध्ये निर्माण झालेला आहे त्यांना आपण ॲडीशनल एफएसआय देऊ शकत नाही. आणि झाडे कापून फोर एफएसआय देऊन याच्यामध्ये बिल्डर लोकांचे भले केलेले आहे. मग या शहरातील सुविधा पुरवणार कोण? महापालिकेच्या पुढच्या पाच वर्षांच्या बजेटमध्ये याचे प्रोव्हिजन आहे का? एवढी लोकसंख्या वाढणार आहे आणि त्यांना आम्ही एवढे इन्फ्रास्टक्चर देणार आहोत?

**सत्यवान धनेगावे :-**

लोकसंख्येच्या बाबतीत बोलायचे असेल तर मिरा भाईंदरची लोकसंख्या ही ऑलरेडी थ्री टाईम्स वाढलेली आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणून आपण आणखीन वाढवायची का? इथे आपण कुठेतरी शासन कठोर व्हायला पाहिजे. जिथे आपण याला कमी करु शकतो ते कमी व्हायला पाहिजे. आज वसई विरार नविन महानगरपालिका होते आहे, नविन वस्त्या होत आहेत, तिथे ही स्कीम ॲडव्हायजेबल आहे पण मिरा भाईंदर सारख्या शहरामध्ये नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा विषय रितसर सभागृहात विषयपत्रिकेवर आणावा. त्याच्यावर व्यवस्थित चर्चा होऊन मग परवानगी द्याव्या. मा. आयुक्त साहेब, मध्ये एक आर.जी. चा विकास करण्याचा विषय होता................

**अनिल सावंत :-**

मा. महापौर सोहब, हा विषय या शहरासाठी अत्यंत हानीकारक विषय आहे. यांनी सहा ते सात स्कीम ऑलरेडी सॅक्शन केलेल्या आहेत. उद्या बिल्डर बिल्डींग बांधणार. चार एफएसआय वापरणार रस्त्याचा, पाण्याचा काही ठिकाणा नाही, २५ टक्के एम.एम.आर.डी.ए. ला देणार. एम.एम.आर.डी.ए. रेंटल हाऊसिंगवर आणखीन कोणाला देणार म्हणजे मुंबईमध्ये जे विस्थापित आहेत, त्यांना या रेंटल हाऊसिंग स्कीममध्ये ॲडजस्ट करणार. ७५ टक्के बिल्डर स्वःत विकुन मोकळा होणार आणि या शहरातील लोकसंख्या परत वाढणार आणि पाण्याचा प्रश्न जो मोठा प्रश्न आहे, आपण लोकांना त्याच्यासाठी पुरे पडु शकत नाही. कारण मिरा भाईंदरमध्ये मुळात स्वतःची वॉटर स्किम नाही, जशी इतर महानगरपालिकांमध्ये आहे. त्यामुळे या शहरामध्ये जे २५-३० वर्षे लोक राहतात त्यांना व्यवस्थित सोयी-सुविधा पुरविल्यानंतर या इतर वाढलेल्या पॉप्युलेशनचा विचार करावा असे मला वाटते. जिथे आपण रोखू शकतो ते रोखायला पाहिजे. आज आपल्या मिरा भाईदर महानगरपालिकेचे बजेट कुठे आहे की, आपण एवढे इन्फ्रास्ट्रक्चर पुरवू शकतो? आणि तुम्हाला जे ४५० प्रिमियम मिळणार आहे, त्याच्यामधुन किती निधी जमा होणार आहे? त्याच्यासमोरचा एक फुटपाथ किंवा रोडसुद्धा होऊ शकणार नाही, ज्या स्कीम राबवल्या जातात त्या हिशोबाने आणि या स्कीम त्यांनी कुठे-कुठे सॅन्क्शन केलेल्या आहेत. महाजनवाडीला एक आहे. नवघरला दोन स्कीम आहेत. आणखीन दोन स्कीम केलेल्या आहेत. साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, या संपूर्ण प्रकरणांचा, ज्या कायदेशीर त्रुटी राहिलेल्या असतील, त्यांच्या परमिशन सरळ कॅन्सल करावे. बिल्डरनी या शहरामध्ये धंदा करावा. त्यांनी आपल्या इमारती विकसीत कराव्या जो परमिशिएबल एफएसआय असेल, तो घेऊन एसआरए स्कीम विकसीत कराव्यात. पण या शहरावर नाहक भुंर्दड पडू नये की, ज्याच्यामुळे पाण्यासाठी या शहरामध्ये दोन-दोन वेळा मोठमोठी आंदोलने झालेली आहेत. रेल्वे रोको झालेले आहे. राजधानी रोकलेली आहे. लोकावंर अजून केसेस चालू आहेत. एवढा मोठा भयंकर पाण्याचा प्रश्न या मिरा भाईंदर शहरामध्ये आहे. असलेल्या लोकांना आपण चांगल्या सोयीसुविधा पुरवू आणि या स्कीमचा विचार न करता त्यांचा संपूर्ण आढावा आपण घ्यावा आणि याबाबतीत एक निश्चित धोरण आखावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

आपले असे म्हणणे आहे की, मिरा भाईंदरची लोकसंख्या दररोज वाढत आहे आणि जर अजून एफएसआय वाढवला तर लोकसंख्येमध्ये अजून भार होईल, अजून वाढ होईल. पण एफएसआय वाढविण्याची रेंटल हाऊसिंगची ही स्किम आहे, ती शासकीय खात्यामार्फत, एम.एम.आर.डी.ए. मार्फत सुरु झालेली आहे. त्याचा उद्देश असा आहे की, बरेचसे लोक जे मुंबईला राहतात, ते घर अफोर्ड करु शकत नाहीत. त्यांना कुठेतरी झोपडपट्टीमध्ये रहावे लागते. किंवा कुठेतरी जिकडे व्यवस्थित साधन आहे तिकडे रहावे लागते. म्हणून त्यांनी अशी एक नविन योजना तयार केली आहे की, ज्याच्यामध्ये इन्क्रीज एफएसआय देऊन बिल्डरला इन्सेंन्टीव्हज घेऊन काही घरे तयार करायची होती. जी घरे नंतर शासन हस्तांतर करुन घेणार आहे. आणि पुढे जाऊन त्याची पॉलीसी ठरवून देणार आहे. त्या विषयावर एम.एम.आर.डी.ए. ने रेंटल कोर कमिटीपण तयार केली आहे. त्यांच्यामध्ये मा. आयुक्त, मिरा भाईंदर सुद्धा आहेत. ही कोर कमिटी सगळ्याचाच विचार करणार आहे आणि त्याच्या नंतरच पॉलिसी फिक्स करणार आहे.

**अनिल सावंत :-**

पण आपण त्यांना ऑलरेडी परमिशन दिली आहे? तिकडे काम चालू झाले.

**मा. आयुक्त :-**

काम चालू झाले पण त्याची सुविधा पुरवायची आहे किंवा तिकडे रोड करायचे आहेत, आरोग्याचा प्रश्न आहे, रस्त्याचा प्रश्न आहे. या सगळ्या प्रश्नावर मागच्या वेळेला कोर कमिटीमध्ये श्री. धनेगावे साहेब गेले, त्याच्या त्या विषयावर होत आहे आणि ती पॉलिसी निश्चित करत आहेत. आपले जे विषय आहेत, ते सगळ्या महापालिकेचे तसेच विषय होते. ठाणे महापालिकेचे पण तसेच विषय होते की, तिकडे लोकसंख्या वाढली तर तिकडे सोयी सुविधा कोण देणार? महापालिकेवर त्याचा किती आर्थिक बोजा येणार? किंवा इतके लोक आले तर जी ट्राफिक डेन्सीटी आहे, जी पार्किंग डेन्सीटी आहे, सगळे वाढणार. या विषयावर अजून जास्त निधी महापालिकेला मिळाला पाहिजे किंवा ते टप्प्याटप्प्याने केले पाहिजे किंवा अजून काही उपाय केला पाहिजे. या सगळ्या विषयावर कोर कमिटीमध्ये निर्णय होत आहेत आणि त्याविषयी चर्चा सुरु आहे. आणि

थोड्या दिवसांनी ती कोर कमिटी पॉलिसी ठरवेल. त्यानंतर आपण परत या विषयावर विचार करु शकतो असे मला वाटते.

**अनिल सावंत :-**

तोपर्यंत या प्रोजेक्टला तुम्ही स्टे देणार आहात का?

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये स्टेचा प्रश्न नाही असे मला वाटते. कारण हे ॲज पर गव्हर्नमेंट नोटीफिकेशन काम सुरु आहे आणि दुसरा कोर कमिटीचा एकदा निर्णय होऊ द्या, त्यांची पॉलिसी फिक्स होऊ द्या, नंतर या विषयावर परत विचार करता येईल.

**अनिल सावंत :-**

मग तोपर्यंत तुम्ही काय करणार आहात? जर तुमच्याकडे नविन प्रपोजल आले तर तुम्ही सॅक्शन करणार आहात की, एक्झीस्टींग प्रपोझलना स्टे देणार आहात?

**मा. आयुक्त :-**

ते प्रपोझल कसे आहे, त्याप्रमाणे निर्णय घेईल. म्हणजे ते प्रपोझल नियमामध्ये आहे की, नाही त्याप्रमाणे निर्णय होईल.

**अनिल सावंत :-**

१५४ मध्ये ज्या गाईडलाईन्स आहेत, त्याच्यामध्ये................

**मा. आयुक्त :-**

ते मी चेक करतो.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, या विषयावर रुलिंग द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, श्री. अनिल सांवत यांनी जो विषय मांडला. आज त्यांना शहराची काळजी वाटलेली आहे म्हणून त्यांना धन्यवाद देतो. या शहरामध्ये आपण जर सुप्रिम कोर्टाचा आदेश बघितला, चार हजार अनधिकृत बांधकामे झालेली आहेत आणि चार हजार अनधिकृत बांधकामांना कनेक्शन देण्याचे काम या महापालिकेतर्फे झालेले आहे. त्यावेळी हा प्रश्न मा. महासभेत कधी उपस्थित झाला नाही. आज जो गरीब लोकांना घर देण्याचा विषय आहे आणि तो शासनाच्या कायद्याच्या अनुसार आहे जे श्री. अनिल सावंत हा विषय मांडतात आणि त्यांनीच १०० एम.एल.डी. ची योजना पास केलेली आहे. आणि ते शासनाच्या कायद्याच्या अनुसार आहे. सातशे कोटीची पाण्याची योजना पास केलेली आहे. त्या योजना थांबाव्या, त्या येऊ नये असा माझा विचार नाही. पण ज्या गोष्टी  दोन वर्षापूर्वी या सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाने मांडल्या पाहिजे, या शहराची लोकसंख्या वाढते आहे. इललिगल बांधकाम चालू आहे. लोकांना पाणी मिळत नाही. हे विषय कधीच मांडलेले नाहीत. आज तुम्ही सांगता पाणी नाही. पाणी का विषय मागच्या दोन वर्षापासून लोक सोसत आहेत. पाण्याचा विषय आजचा नाही. फक्त चार हजार सदनिका आल्या तर त्याच्यावर फार मोठा इम्प्लेक्ट होणार आहे, हा विषय नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल, आप निचे बैठिए।

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

त्यांनी एवढा सुंदर प्रस्ताव मांडला. या शहराची लोकसंख्या वाढु नये. एक तर एम.एम.आर.डी.ए. ने पाण्यासाठी आपल्याला एक रुपया दिलेला नाही. पाण्याची स्कीम आपण राबवतो आहे. पाण्यासाठी आपण मिटींग घेतो आहे आणि ते पाणी चार वर्षात येणार की, पाच वर्षात येणार हे कोणालाही माहिती नाही. सगळा अंधार आहे. पाण्याची समस्या ४५ ते ५० तासावर गेलेली आहे. असे असताना नियम काय आहे ते आम्हाला माहिती नाही. साहेब बघतील पण शहराची अवास्तव लोकसंख्या या काळात वाढु नये हे त्यांचे म्हणणे योग्य आहे आणि अशा वेळेला तुम्ही अनाधिकृतबद्दल बोलता. तो विषय वेगळा आहे त्या विषयाशी या विषयाची सांगड तुम्ही घालू नका. तुमचा विषय चुकीचा आहे असे मी म्हणत नाही पण त्यांच्या विषयाला तुम्ही कशाला वेगळे वळण देता?

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या भावना मी समजू शकतो. त्यांनी बिल्डर लॉबीचा कैवार घेणे अपेक्षितच होते कारण त्यांचे मित्र आज आलेले नाहीत. ते स्वतः बिल्डर आहेत. त्यांच्या काही स्किम असतील पण या शहराची जी दुर्दशा होणार आहे, ती कशी रोखायची याचा आपण विचार करु या. मा. महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो की, या संपूर्ण स्कीमचा फेर आढावा घेण्यासाठी आपण आदेश द्यावे.

**मा. महापौर :-**

जे यांनी मंजूर केलेले आहे. त्याची सर्व प्रकारची छाननी करुन तशा बाबी पूर्ण केल्यानंतरच द्यावे नाहीतर रद्द करण्यात यावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**अनिल सावंत :-**

साहेब, २५ टक्के घरे आणि १०० टक्के प्रिमियम महापालिकेलाच मिळाला पाहिजे. कारण एम.एम.आर.डी.ए. याच्यामध्ये काही करत नाही. एम.एम.आर.डी.ए. ला फक्त फायदाच घ्यायचा आहे.

**मा. महापौर :-**

त्यांनी फक्त मंजूरी द्यायचे काम केलेले आहे. दळणवळणाची व्यवस्था कोण करणार आहे? पाण्याची व्यवस्था कोण करणार?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आत्ता परमिशन दिले आहे त्याचे काय?

**मा. महापौर :-**

ज्यांना आत्ता परमिशन दिलेली आहे. त्यांची पुढची परमिशन देऊ नये.

**शरद पाटील :-**

ज्यांना दिली आहे त्याचे काय? ते थांबवणार का? त्यांनी जे विचारले आहे त्याचे उत्तर दिले नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याकडे दहा किंवा पाच वर्षांनी जे पाणी येईल. त्यानंतर त्यांना पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. तोपर्यंत त्यांना पाण्याची मंजूरी देऊ नये.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरीता दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी श्री. ध्रुवकिशोर पाटील यांची आहे. विषय :- मिरा भाईंदर शहरात येणाऱ्या १०६ एम.एल.डी. पाण्याचे वितरण व्यवस्थित होत नसल्याने पाणी टंचाईमुळे नागरीकांचे हाल होत असल्याने मा. महासभेत चर्चा करणे व निर्णय घेणेबाबत. दुसरी लक्षवेधी श्री. प्रमोद जयराम सामंत यांची आहे. विषय :- सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत अधिकाऱ्यांकडून मर्जीतील ठेकेदारांच्या संगनमताने, निविदा प्रक्रियेत घोटाळे, मोजणी बुकात नोंदीत हेराफेरी करुन, न केलेल्या कामाची देयके मंजुर करुन, महानगरपालिकेची आर्थिक फसवणूक करणे. अशा दोन लक्षवेधी आल्या आहेत. त्या मी मा. महापौरांकडे सुपुर्द करतो.

**मा. महापौर :-**

श्री. प्रमोद सामंत यांनी जी लक्षवेधी दिलेली आहे, ती फेटाळण्यात येत आहे आणि श्री. ध्रुवकिशोर पाटील यांची लक्षवेधी घेण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

स्विकारलेल्या लक्षवेधीचे वाचन करतो. **विषय :-** मिरा भाईंदर शहरात येणाऱ्या १०६ एम.एल.डी. पाण्याचे वितरण व्यवस्थित होत नसल्याने पाणी टंचाईमुळे नागरीकांचे हाल होत असल्याने मा. महासभेत चर्चा करणे व निर्णय घेणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या सुमारे साडे आठ लाख असून शहरात स्टेम प्राधिकरणाचे ८६ एम.एल.डी. पाणी तसेच एम.आय.डी.सी. चे २० एम.एल.डी. असे एकूण १०६ एम.एल.डी. पाणी येत आहे. शहरातील पाणी व लोकसंख्या तसेच २० टक्के लिकेज विचारात घेतली असता प्रत्येक माणसाला १०० लिटर्स पाणी मिळायला पाहिजे पण ते मिळत नाही. नागरीकांना दर दिवशी पाणी मिळत नाही. सुमारे ३८ ते ४२ तासांनी पाणी मिळते असे मनपाकडून सांगण्यात येते. परंतु प्रत्यक्षात पाणी नागरीकांना ४८ ते ५२ तासांनी मिळते, तर कधी ५८ ते ६० तासांनी पाणी मिळते. याचाच अर्थ एका दिवसातले १०६ एम.एल.डी. पाणी शहरातील सर्व नागरीकांना मिळत नाही. सुमारे चार लाख नागरीकांनाच पाणी मिळते याप्रमाणे प्रत्येक पाणसाला सुमारे १७५ लिटर्स पेक्षा जास्ता तर प्रत्येक कुटूंबाला १००० लिटर्स पाणी मिळायला पाहिजे. तुसुध्दा पाणी मिळत नाही याचाच अर्थ पालिकेच्या अंतर्गत वितरण व्यवस्थेत त्रुटी असतील, किंवा शहरात १०६ एम.एल.डी. पाणी येत नाही. मात्र महानगरपालिका १०६ एम.एल.डी. चे बिल अदा करते. तसेच मोठ्या प्रमाणावर पाणी लिकेजची शक्यत आहे. पाण्याचे वितरण योग्य पध्दतीने होत नाही या सर्व बाबींवर आपले प्रशासन लक्ष देत नाही व नागरीकांना वेठीस धरले जाते. जनतेचा रोष वाढत चालला असून कोणत्याही क्षणी पाण्याकरीता नागरीक रस्त्यावर येण्यीच शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब वारंवार आणून सुध्दा योग्य ती कार्यवाही होत नसल्याने मा. महासभेत लक्षवेधी मार्फत चर्चा करुन ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. मा. महापौर व मा. महासभेने चर्चा करणेस परवानगी द्यावी व सर्व सन्मा. नगरसेवकांना विनंती की सदर जटील प्रश्न सोडविण्याकरीता सुचना देऊन कृत्रीम पाणी टंचाई दूर करावी तसेच नवीन नळ कनेक्शन देण्याचे बंद करणे बाबत योग्य तो विचार व्हावा ही नम्र विनंती.

**आपला नम्र**
**सही/-**
**(ध्रुवकिशोर पाटील)**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण माझी लक्षवेधी स्विकारल्याबद्दल धन्यवाद. परंतु साहेब, मिरा भाईंदर शहरामध्ये १०६ एम.एल.डी. पाणी येते आणि आपले पॉप्युलेशन फक्त आठ लाख चोविस हजार आहे. आणि तसे बघायला गेले तर प्रत्येक नागरिकाला शंभर लीटर पाणी मिळाले पाहिजे.परंतु ते मिळत नाही. पॉप्युलेशन आठ लाख चोवीस हजार पाणी १०६ एम.एल.डी. मधून आपण २०टक्के पाणी लिकेज जरी काढले तरी आपल्याला ॲप्रॉक्सीमेटली ८६ एम.एल.डी. पाणी येते आहे. आणि आपल्या नागरिकांना पाणी मिळत नाही. नागरिकांना ४८ ते ५० तासांनी पाणी मिळते म्हणजे एका दिवसात फक्त ॲप्रोक्सीमेटली चार लाख नागरिकांनाच पाणी मिळते. मग बाकीचे पाणी जाते कुठे? आणि ते पण दोनशे लीटर प्रति माणसी मिळाले पाहिजे. परंतु, येत नाही. आज नागरीकांना पाणी येते, ते पण प्रेशर कमी येते. मग प्रेशर जाते कुठे? पाणी जाते कुठे? याचाच अर्थ पालिकेच्या इंटरनल डिस्ट्रीब्युशनमध्ये काहीतरी चुक असेल. पाणी काही ठिकाणी जास्त, काही ठिकाणी कमी याप्रमाणात असेल. आज भाईंदर वेस्टला जवळ जवळ ५२ ते ५५ तासांनी पाणी येते. त्या लोकांनी काय करायचे? तुमच्या घरी जर ५२ तासांनी पाणी येईल, तर तुमच्या फॅमिलीमध्ये पाण्याचा उपयोग कसा करतील? याचा विचार आपण कधी केला आहे का/? आज प्रशासनाला वारंवार सांगुनसुद्धा प्रशासन याच्यावर अजिबात उपाय करत नाही. त्यांनी काही उपाययोजना सुचवलेल्या नाहीत. आज भाईंदर वेस्टला जी पाईप लाईन रेल्वेखालून येणार होती, आज कमीत कमी चार ते पाच वर्षे हा प्रश्न प्रलंबित होता. कधी एमजीपी तर कधी रेल्वे याच्यामध्ये हा प्रश्न पेंडींग होता. आपल्या पाणी पुरवठा इंजिनिअरने काय केले? काहीच नाही साहेब पॉप्युलेशनच्या हिशोबाने आपल्या महानगरपालिकेच्या पाईपलाईन टाकलेल्या नाहीत. काही ठिकाणी कमी आहेत, तर काही ठिकाणी जास्त आहेत. काही ठिकाणी पाणी भरपूर येते, काही ठिकाणी कमी येते. आज मिरा भाईंदर परिसरामध्ये काही प्रभागाचे चाळीस तासाने पाणी येते आहे. काही प्रभागामध्ये ४८ तासाने पाणी येते. काही प्रभागामध्ये ५२ तासांनी पाणी येते का? कसे काय? How it possible? काही ठिकाणी पाणी २४ तासांनीपण येते हे कसे शक्य आहे? जर तुम्ही असे करु शकता तर भाईंदर वेस्टला एवढे पाणी डिले होत आहे? प्रशासनाने याच्यावर काय उपाययोजना केल्या आहेत? साहेब, त्याचबरोबर आपली ५० एम.एल.डी. पाण्याची जी स्कीम होती, त्याच्यातील काही संम्प अजून बनलेले नाहीत. तेसुद्धा अर्धवट आहे. आम्हाला सांगितले होते की, या संम्पामधुन पाणी येईल. तुम्हाला ग्रॅव्हीटीने पाणी येईल आणि तुम्हाला प्रेशर जास्त येईल. पण अजूनपर्यंत त्या स्कीमला दहा वर्षे होऊन गेली. पण आपल्या अभियंत्यांचे काहीच लक्ष नाही. साहेब, सन २००९ ला २०० एम.एल.डी. पाणी सॅन्क्शन केले. आरक्षित केले. त्यानंतर सन २०१० ला मा. महासभेने पीपीपी तत्वावर स्कीम मंजूर केली. मा. स्थायी समितीने सन २०११ ला त्या निविदेला मंजूरी दिली आणि प्रशासनाने मे २०११ ला शासनाकडे पाठवले. साहेब, जर हा गॅप तुम्ही बघितला तर आज अडिज वर्षे आपण फक्त टेंडर सॅक्शनकरीता घेतलेले आहेत. जर सॅक्शन करीता अडीच वर्षे घेतले तर त्याचे इम्प्लीमेंटेशन किती वर्षानंतर होईल. साहेब, आपण याचा विचार केला का? आज आपल्या महानगरपालिकेमध्ये एवढे इंजिनिअर आहेत. आपण प्रत्येक वेळी कन्सल्टंट नेमतो. पाईप लाईन टाकायची आहे, रेल्वेला पात्र पाहिजे, कन्सलटंट नेमा. एमजीपी ला पाहिजे, कन्सलटंट नेमा. मग हे इंजिनिअर काय करतात? त्या कन्सलटंटला पण फी द्यायची. यांनापण पगार द्यायचा. साहेब, तुम्ही म्हणता की, पॉप्युलेशन वाढते आहे. ज्याप्रमाणे आपले पॉप्युलेशन वाढते आहे, त्याप्रमाणे आपले पाणीपण वाढते आहे. साहेब, भाईंदरला ५० एम.एल.डी. चे पाणी सॅक्शन होण्यापूर्वी ३१ एम.एल.डी. पाणी यायचे आणि आपली ५० एम.एल.डी. ची योजना सॅक्शन झाली. सन २०००-२००१ ला ते ५० एम.एल.डी. पाणी आले. त्यानंतर आज १०६ एम.एल.डी. पाणी येते. त्यावेळी आपली पॉप्युलेशन फक्त पाच लाख वीस हजार होती. आणि आज आपले पॉप्युलेशन आठ लाख चोविस हजार आहे. हा कुठेही ताळमेळ नाही. मा. आयुक्त साहेब, तुम्ही आल्यानंतर संपूर्ण कारभार व्यवस्थित केला. सगळ्यांना शिस्त लावली. इललिगल कन्स्ट्रक्शनवर तुम्ही आळा घातला. ठेकेदारांवर तुम्ही चांगला अंकुश ठेवला. तुमचा फक्त पाण्यावर अंकुश नाही. तुम्ही आज भाईंदर वेस्टला, मिरारोडला, भाईंदर पूर्वेला पाणी व्यवस्थित देऊ शकत नाही. आपलेकडे हे जे इंजिनिअर आहेत, त्यांची डिग्री बी.ई. आहे. आपल्याकडे आणखीन एक इंजिनिअर आहे. तो एम.टेक. आहे. यांच्यापेक्षा त्यांना एमजीपी चा अनुभव जास्त आहे. साहेब, तो झोपडपट्टी मोजतो आहे आणि हे तिथे बसले आहेत. मग तुम्ही अशा इंजिनिअरचा उपयोग का घेत नाही? आज भाईंदर वेस्टला पाणी नाही. तुम्हाला येऊन आज चार महिने होऊन गेले. तुम्ही फक्त ८४ नगरसेवकांना फेस करता. आम्ही पाच ते सहा हजार नागरीकांना फेस करतो. आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचे? तुमच्या महानगरपालिकेमध्ये असा कुठेही चार्ट नाही की, या रोडला आठ इंची पाईपलाईन आहे. या रोडला सहा इंची पाईपलाईन आहे. तर ही सहा इंची पाईपलाईन का आणि ही आठ इंची पाईनलाईन का? इथे पॉप्युलेशन किती आणि इथे पॉप्युलेशन किती? याचा कुठेही ताळमेळ नाही. तुम्ही त्यांच्याकडुन रिपोर्ट घ्या. त्यांना विचारा साहेब, मी तुम्हाला ऑगस्टला पत्र दिले. तरीसुद्धा काही झाले नाही. शेवटी ऑक्टोबरला जनता दरबारामध्ये पत्र दिले आणि कमिशनर साहेबांनी चांगला डिसीजन घेतला की, पाणी कनेक्शन बंद केले. पण साहेब, कधीपर्यंत बंद करणार? एक वर्ष, दोन महिने, सहा महिने किती वर्ष, त्याचे अजून काही फिक्स नाही आणि पुन्हा जर पाणी कनेक्शन चालू केले तर येणार जो प्रॉब्लेम आहे.

त्याला कोण फेस करणार? साहेब, जसे आत्ता श्री. अनिल सावंत यांनी सांगितले की, भाईंदरमध्ये तीन वेळा आंदोलने झाली. आम्हीसुद्धा त्यावेळी जेलमध्ये होतो. आंदोलने झाली आणि लोकांनी रेल्वेगाड्या, बसगाड्या जाळल्या होत्या. महानगरपालिकेच्या काचा तोडल्या होत्या. एवढे भिषण झाले होते आणि जर पून्हा हे आदोलन पेटले तर त्याला जबाबदार कोण? प्रशासनाने काहीतरी ठोस उपाययोजना काय घेतलेली आहे? माझी सगळ्या सदस्यांना विनंती आहे की, तुम्ही तुमच्या सुचना द्या आणि ही पाणी टंचाई कृत्रिम आहे, ही पॉप्युलेशन वाढली म्हणून नाही. आपल्या इंटरनल डिस्ट्रीब्युशनचा बट्टयाबोळ आहे. आपल्या अधिकाऱ्यांचे लक्ष नाही.

**मिलन पाटील :-**

आत्ता ही पाणी टंचाई किंवा हे होते. प्रत्येक बजेटमध्ये पाणी डिपार्टमेंट लॉसमध्ये दाखवतात. लॉस कुठून होते, का होते ते काही कोणाला दाखवत नाही. फक्त लॉस येतो. एवढे फक्त त्या बजेटमधील तरतुदी पुन्हा वाढवुन घेतात. पुन्हा पुढच्या वेळेला शुन्य होते आणि काही काम केले जात नाही. पूर्ण बजेट हडप केले जाते, असा माझा पूर्ण आरोप आहे. मा. आयुक्त साहेब, आपल्याला एमजीपी कडुन साडेतीन ते चार रुपयांनी पाणी येते. आपण सात रुपयांनी वितरण करतो. आणि कमर्शिअलला अठ्ठाविस रुपयांनी लावतो. हा रेट लावल्यानंतर आपण त्याचा चार पट फायदा घेतो. कुठल्यापण व्यापाऱ्याला चार पट नाही. दोनपट जास्त घेतात. १ टक्के वर पण लोक धंदा करतात. तुम्हाला जर चारपट पैसे जास्त मिळतात आणि याच्यावर जर तीनपट जास्त मिळतात, तर तुम्ही लॉस कशाचे दाखवता? लॉस होतो कुठून? लॉस सांगतात, गळती. मा. आयुक्त साहेब, तुम्ही बघा जे वॉल्व्ह बसवलेले आहेत, तिथे गळती होते. तुम्ही एक लिटरचे माप घेऊन जा. त्या गळतीखाली तुम्ही एक लिटरचे माप लावा. किती सेकंद किंवा किती मिनिटामध्ये ते माप भरते त्याचा तुम्ही अंदाज करा. की, किती गळती होते. गळती कुठे-कुठे आहे हे तुम्ही सांगा. गळती आपल्या महापालिकेला लागलेली आहे. तुम्ही पाणी डिपार्टमेंटच्या प्रत्येकाला नोटीस काढा. आणि जे मेन वॉल्व्हमन आहेत, त्यांनासुध्दा नोटीस काढा आणि त्यांच्याकडून लिहून घ्या की, आपल्या इकडे अनऑथोराइज कनेक्शन आहेत किंवा नाहीत. प्रशासनाला हे सगळे माहीती आहे की, खोटे कनेक्शन कसे दिलेली आहेत आणि कुठे आहेत? प्रशासनाला नक्की माहीती आहे. तुम्ही त्यांच्याकडून काढून घ्या. त्यांना सांगा की, तुम्ही जर ही माहीती खोटी दिली. तर तुम्हाला त्वरीत सस्पेंड केले जाईल. हा शब्द त्याच्यामध्ये करा आणि जे कनेक्शन देतात त्यांना पहिले बोलवा. जेव्हा आम्ही आंदोलन केले...................

**मिलन म्हात्रे :-**

आंदोलनाच्या वेळेला सगळे पुढारी गायब होते. लोक नगरसेवकांना मारायला रस्त्यावर फिरत होते.

**मिलन पाटील :-**

त्यावेळेला आम्ही आंदोलन केले म्हणून पाण्याचे आम्हाला दुःख आहे. आम्ही पाठीवर डी.एस.पी. चे मार खाल्लेले आहेत. "है कोई माय का लाल, पानी देगा मिठालाल", या शब्दामध्ये आम्ही त्यावेळेला आंदोलन केले होते. आणि आमचे नेतृत्व श्री. मिठालाल शेठ करत होते. अशा वेळेला आम्ही पाणी आणलेले आहे. आणि त्याचे दुःख आम्हाला होते. तुम्ही यांच्याकडून लिहून घ्या. लिहून घेतल्यानंतर किती कनेक्शन खोटे निघतात. नाहीतर आम्हाला बरोबर घेऊन जा. आम्ही दाखवतो. त्याचे बिलींग होत नाही. आपल्याकडे त्या कनेक्शनचे बिलींग होत नाही असे पाच दहा हजार कनेक्शन आहेत. हे कनेक्शन रात्रीचे होतात आणि ते होत नसल्याकारणाने आपल्याला तो लॉस होतो.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंहः-**

कमिशनर साहब, कही बिल्डींग ऐसी है की, म्युनिसीपाल्टी के पानी से बिल्डींग का काम चालू है। वो लिस्ट मै आपको कल लाकर देता हू।

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे चोरटे कनेक्शन आहेत का? माहीती नसेल तर आम्ही तुम्हाला देतो. मा. आयुक्त साहेब, तुम्ही लिहून घ्या. त्यांच्याकडून ॲफीडेव्हीट करून घ्या. आणि जागेवर दोन-तीन जणांना सस्पेंड करा. सगळी यंत्रणा सुधारून जाईल. २४ तास पाण्याची काही गरज नाही. आम्हाला पाणी बरोबर येते. मा. आयुक्त साहेब, एम.जी.पी. ला लेटर दिलेले आहे. श्री. प्रफुल्ल पाटील वारले, त्यांनी पण सांगितले आहे की, आपल्या पैशांनी करोडो रूपयांचे पंप लागले आहे. आजपण सडतात. तुम्ही यांना विचारले का? हे पंप जर आज लावले, आम्ही सांगतो, हे लोडशेडींग बोलतात. आम्हाला एम.जी.पी. पाण्यापासून वंचित करतात. जर लोड शेडिंग असेल तर ५० एच.पी. च्या मोटरला जनरेटर येतात. जनरेटर लावा आणि तुम्ही आम्हाला पाणीपुरवठा करा.

**हंसुकुमार पांडे :-**

आत्ता श्री. धुव्रकिशोर पाटील साहेब बोलले की, २० टक्के पाणी लिकेज होते. लेकीन २० टक्के पाणी लिकेज कैसे होता है? २००५ मे हम सब नगरसेवक पातलीपाडा और टेमघर गये थे। वहासे पाणी वालो को हमने पुछा तो उन्होने बोला की, हम पुरा पानी भेज देते है। ०.२ एम.एल.डी. पाणी इनको ज्यादा देते है। और यहा मिरा भाईंदर तक आने मे लिकेज कैसे होता है, वो आप लोग देखीए। हमारे हर स्टॅण्डींग कमिटी मे हमने देखा था, २००५-०६ मे भी, हर एक समय स्टॅण्डींग कमिटी मे पाईपलाईन रिपेअरिंग के लिए इनका पैसा पास होता था। फिर भी २० एम.एल.डी. पाणी लिकेज मतलब २ करोड २० लाख लिटर पानी लिकेज

होता है। २ करोड, २० लाख लिटर के उपर अगर हम नियंत्रण लागायेंगे तो कमसे कम २० हजार लोगोंको पीने के लिए पानी मिलेगा। लिकेज का कोई प्रॉब्लेम सॉल्व्ह नही होता नही है। कम से कम पिछले पाच साल से मै यही सुनते आया हूॅं की, २० टक्के पानी लिकेज है। उसका प्रॉब्लेम क्यो सॉल्व्ह नही होता है, यह मे पानी पुरवठा डिपार्टमेंटसे पुछना चाहता हूॅं। पातलीपाडासे इधर आनेमे २० टक्के पानी लिकेज क्यों जाता है?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, आत्ता खरेच चांगली सुरूवात झालेली आहे. आमचे मित्र श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी जी लक्षवेधी ठेवलेली आहे, त्यांनी आत्ता त्यांच्या खुलाशामध्ये सांगितले की, काही ठिकाणी २४ तासाने पाणी येते. कुठे २४ तासाने पाणी येते त्याचासुध्दा खुलासा त्यांनी करावा, म्हणजे आम्हाला त्याचे उत्तर मिळेल. आणि आपण आत्ता आमच्या श्री. ओमप्रकाशजीना बोलले की, तुम्ही झोपले होते का ? आम्ही झोपलो नाही. सगळी जी चांगली कामे आहेत त्यांच्यासाठी आम्ही एकमताने तुम्हाला ठरावामध्ये मतदान केलेले आहे. आणि १००-२०० एम.एल.डी. चे बोर्ड मी फार बघितले होते. त्याच्यात नागरिकामध्ये चर्चा चालू आहे. एकदा आलेले १०० एम.एल.डी. पाणी आणि एकदा आलेले दिवाळी का तोहफा २०० एम.एल.डी पाणी आता किती दिवाळी किती गेल्या ते मला माहिती नाही, आणि पाणीही येत नाही. खरेच ते पाणी यावे अशी आमची अपेक्षा आहे. आणि नवी मुंबईवरून आपल्याला जे १०० एम.एल.डी पाणी देणार होते, त्याचे काय झाले? त्याचा खुलासा पुढे केला आहे की नाही ? शासनाकडे त्याचा पत्रव्यव्हार झाला आहे की, नाही? कारण सेंट्रलमध्ये आणि राज्यामध्येपण सरकार आपले आहे. त्याच्यासाठी त्या पाण्यासाठी आपण प्रयत्न करावा आणि ते पाणी आले पाहिजे. माझ्या मते जे ९६ ला पाणी वाढले त्याच्यानंतर ३५ एम.एल.डी. वाढले. आम्हाला त्याचाही खुलासा आता करावा. म्हणजे आम्हाला माहिती पडेल आणि आम्ही नागरिकांना सांगू की, याचा किती पाठपुरावा होतो. आणि कधी आपल्याला पाणी येणार ते आम्हाला माहीती पडल. कारण बॅनर वाचल्यानंतर लोक विचारतात की, पाणी कमी का येते. ५०-६० तासाने पाणी का? आणि २४ तासाने कोणत्या एरियामध्ये पाणी येते त्याचा खुलासा करावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आज श्री. धुव्रकिशोर पाटील साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, पहिली गोष्ट तर आभारी आहे. आणि आपल्या या विषयावर गेल्या पाच वर्षापासून मी ऐकतो आहे की, एक विशेष सभा लावावी, हे मा. महापौरांचे रूलिंग आहे. मा. महापौरांचे रूलींग लागून सुध्दा सचिव कार्यालयाकडून या विषयावर कधी मिटींग लागली नाही. त्याच्यावर चर्चा नाही. आपण आत्ता बोलतात की, आपल्या कार्यालयामध्ये भरपूर पत्रव्यवहार केला असेल. आपण दररोज पत्र देत असाल. तुमच्या पत्रावर कारवाई होत नाही, हा आपल्या सगळ्या लोकप्रतिनिधींचा अपमान आहे. सभागृह भरायचे कशाला? मा. आयुक्तांनी काम टाकून इकडे कशाला यायचे? अधिकाऱ्यांनी सगळ्यांनी येऊन बसायचे. काम काहीच नाही. दुसरी गोष्ट अशी आहे. आज पाणी गळती म्हणजे नेमके काय? आज श्री. वाकोडे साहेब, समोर उभे आहेत. वीस दिवसांपूर्वी त्यांना मी पत्र दिलेले आहे. मा. आयुक्तांना त्याची कॉपी मार्क आहे. आमची भरपूर पत्र आहेत, आत्ता कंटाळा आला आहे. काहीच होत नाही. एक दिवस आंदोलन होईल. लोक रस्त्यावर पहिले आम्हाला कपडे फाटेपर्यंत मारतील. त्या आंदोलनामध्ये त्या साहेबांचे सांगायचे राहीले. त्यांचे सहकारी श्री. संपतराव शिंदे यांना सफारी फाटेपर्यंत मारले होते. चिफ ऑफीसर, गाडी पलटी केली होती आणि इकडे शहरामध्ये कोणीही लोकप्रतिनीधी नव्हते. सगळी पळापळ होती. पोलिस रेकॉर्ड आहे, मी बोलत नाही. साहेब, तुम्हाला मी भेटलो होतो. अनधिकृत नळ कनेक्शनमध्ये सुध्दा अनधिृकत नळ कनेक्शन शोधण्याची एक पध्दत आहे. माझ्या वॉर्डमधील मी फिरून सगळे शोधले आहेत. आणि दिलेले आहेत. राममंदिर रोड येथे आमचे जुने घर आहे. मा. आयुक्त साहेब, जरा लक्ष द्या. याच्यामध्ये राजकारण नाही. पैशाचे सोंग आणता येत नाही. मी राजा बनेन, प्रजा बनेन, भिकारी बनेन, प्रधान बनेन, सगळे बनेन. पण पाणी आणि पैशांची नोट कधी बनवू शकत नाही. त्याला पाणीच लागते. राममंदिर लेनला जे तुमचे मीटर रिडर असतात. त्यांच्या अनेक तक्रारी गेल्या. आमचे गावात जुने घर आहे. कोणते मीटर बंद आहे, मी चॅलेंजने सांगतो की, तुमच्या डिपार्टमेंटला एकही रिपोर्ट नाही आणि अंदाजे वाटेल तसे पैसे लावून देतात. ठिक आहे. जास्त लावले चालू शकते. पण पाचशेचे बील आहे. पैसे घेऊन ते २०० आणि १०० रूपये करतात. तो अधिकार त्याला कोणी दिला? याच्यावर कोणाचेही लक्ष नाही. चोरीचे कनेक्शन आज ही चालु आहेत. तुम्ही चार तारखेपासून कनेक्शन बंद केले, बरोबर आहे ना? मग अजून शहरामध्ये पाण्याच्या कनेक्शनसाठी खड्डे कसे पडतात? एकही खड्डा नाही पडला पाहीजे. आणि दुरूस्ती होत असेल तर तिकडे बोर्ड लावा की, सदर पाण्याच्या कनेक्शनची दुरूस्ती चालली आहे. नविन कनेक्शन नाही. रस्त्या-रस्त्यावर पाण्याच्या बाबतीत खड्डे पडले आहेत. तुमचे प्लंबर ड्रेस घालून तिकडे कनेक्शन लावतात. हे कसे होते ते जरा मला सांगा. याचा ट्रेस कोणी घेतला आहे का? आम्हाला दिसतात. आम्ही गाडी थांबवून विचारतो सुध्दा. नही वो कनेक्शन पास हो गया, वो चल रहा है।

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्तांना विनंती करतो की. या ठिकाणी नवीन कनेक्शन बंद करा. जो कनेक्शन लावेल त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करा.

**मिलन म्हात्रे :-**

पाण्याचे कनेक्शन रात्री लागतात. मा. आयुक्त साहेब, तुम्ही अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करण्याकरिता नगरसेवकांची पण तमा बाळगू नका. आमच्याकडे लिस्ट आहे. त्यांच्यावर कार्यवाही करा.

**कांचन पुजारी :-**

मा. महापौरांतच्या परवानगीने बोलतो. चार इंचाचा पाईप आणि सहा इंचाचा पाईप याच्यामध्ये किती कनेक्शन लागले जातात?

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. महापौर साहेब, एक बिल्डर ने तीन साल हुआ, बिल्डींग बनाकर दिया। म्युनिसिपाल्टीने उसको आठ-आठ कनेक्शन पास करके दिए है। उधर ५००-६०० मीटर दुर तक कही पाईपलाईन नही है। चलिए मेरे साथ मै आपको दिखाता हूॅं।

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब, पानी के विषय के अंदर प्रश्न ऐसा है की, शहर के अंदर आपको जो पानी आएगा, तो आप उस पानी का वितरण करते है। स्थिति ऐसी है की, जोपानी हमे आ रहा है, आज भाईंदर वेस्ट की स्थिति ५२ घंटे के उपर जा रही है। भाईंदर पूर्व मे उसके छह घंटे पहले पानी आता है। मिरारोड के अंदर असके आठ घंटे पहले पानी आता है। यह समानता कही नही बैठ रही है। कुल मिलाकर भाईंदर पश्चिम मे मिरारोड से आठ से दस घंटे का डिफरन्स आ रहा है। और लोगो के अंदर हर व्यक्ती एक दुसरे से कनेक्टेड है। और वेस्ट मे खासकर लोगो मे चर्चा हो रही है की, जान बुझकर कम पानी दिया जा रहा है। टेक्नीकल ६०० एम.एम. की लाई है। १३०० की करनी है। वो विषय अलग है। लेकिन जब भी पानी आता है, ५२ घंटे मे भी पानी आता है, तो प्रेशर पूर्ण रूपसे डेव्हलप नही किया जाता है। और जो पानी हमे दो-सवा दो घंटे दिया जाता है, इसमे भी बीस मिनट की कटौती की जाती है। उसके कारण भाईंदर वेस्ट के अंदर सबसे ज्यादा समस्या उत्पन्न होती जा रही है। इसका मतलब यह है की, कही ना कही आपके वितरण के अंदर समस्या उत्पन्न हो रही है। पानी जब नही आएगा, आप पानी कहा से देंगे। लेकिन इस वितरण की, समस्या को सुधारने के लिए प्रशासन को कठोर कदम उठाने चाहिए। दुसरी बात, जब हमे पानी ३८-४० घंटे मे आता था, तब हमारे वेस्ट के अंदर एक असिस्टंट जे.ई दिया गया था। जिस का नाम श्री. अरविंद पाटील था। आज पानी की समस्या बढती जा रही है। मैने श्री. वाकोडे साहब को चार बार निवेदन किया। श्री. राऊत साहब को किया। उन्होने कहा की, नोट पुटींग करो, मै एक जे.ई देता हूॅं। आज ऐसी स्थिती होती है की, हमे पानी के बारे में श्री. वाकोडे साहब को फोन करना पडता है। श्री. वाकोडे साहब, निचे के अधिकारी को पुछकर हमे बताते है। मतलब पानी की समस्या बढती जा रही है। जहापर स्टाफ को बढाना चाहिए, वे न बढाते हुए कम किया गया। जब शहरमे कभी पानी नही आता था। चाहे वो लाईन का फॉल्ट हो, रिपेअरिंग हो, शटडाऊन हो, रिक्शा के व्दारा प्रचार किया जाता था की, आज पानी बंद है। तो नागरिकोंके अंदर एक मॅसेज जाता था की, आज पानी नही आनेवाला है। आज स्थिति ऐसी हे की, उसे भी बंद कर दिया गया। श्री. वाकोडे साहब मैने इसके बारेमे भी आपको बार-बार निवेदन किया है की, कमसे कम लोगो के अंदर जो रिक्शा फिरा रहे थे, इसे भी आपने बंद किया। कुल मिलाकर स्थिति ऐसी उत्पन्न हो गयी है की, प्रशासन का इस पानी के समस्यासे कही ना कही ध्यान हट गया है। इस शहर के अंदर आंदोलन हुआ है, जैसे सब सन्मा. सदस्यों मे बताया। और आज की स्थिति ऐसी उत्पन्न होती जा रही है की, कही ऐसा जन आंदोलन पैदा ना हो, उसके लिए प्रशासन कठोर से कठोर कदम उठाने की कृपा करे।

**जुबेर इनामदार :-**

साहेब, श्री. भगवती शर्मा यांनी बोलताना पाण्याच्या टंचाई बाबत बोलले. पाणी कमी किंवा जास्त. या शहरामध्ये आज १०६ एम.एल.डी. पाणी किमान येते. जनगणनेच्या आधारावर शहराची लोकसंख्या साडे आठ लाखाची आहे. फ्लोटींग पॉप्युलेशन, येणारे-जाणारे लोक किंवा जे मोजले गेले नाही, ते आपण दिड लाख लोक पकडले तरी दहा लाख होतात. ११० एम.एल.डी. पाणी आले, त्यातून २० टक्के गळती, म्हणजे पाईपलाईन कनेक्शन चोरी पकडा, अनधिकृत कनेक्शन हे सगळे मिळवले तरी ९६ एम.एल.डी. पाणी आले, त्यातून २० टक्के गळती, म्हणजे पाईपलाईन कनेक्शन चोरी पकडा, अनधिकृत कनेक्शन हे सगळे मिळवले तरी ९६ एम.एल.डी. पाणी आपल्याला रोज २४ तासाला शहरामध्ये येत आहे. म्हणजे एका व्यक्तीला ९६ लिटर पाणी? एका कुटूंबाला तुम्ही ४५०-५०० लिटर पाणी देऊ शकता? पाणी जाते कुठे? म्हणजे २४ तासाचे हे स्टॅटिस्टीकली आहे. आज ते पाणी वेस्टमध्ये ५८ तासानंतर, मिरारोडमध्ये ४२-४५ तासावर आणि भाईंदर ईस्ट मध्ये तीच परिस्थिती आहे. म्हणजे लक्षवेधीच्या अनुषंगाने बोलतो की, वितरण व्यवस्था कुठेतरी चुकते आहे. कुठे २४ तासाला पाणी आहे, तर कुठे ४८ तासावर तर कुठे ५२ तासावर पाणी आहे. शहराला येणारे पाणी अपूर्ण नाही, कमी आहे. १०६ एम.एल.डी. पाणी, २० टक्के गळती पकडली तरी ९६ एम.एल.डी. पाण्यामध्ये एका व्यक्तीला तुम्ही आजंच्या तारखेत ९०-९६ लीटर पाणी २४ तासाला देऊ शकता. ते पाणी आज आम्ही किमान ४८ तासानंतर देतो. याचा अर्थ मधला  हा जो डेफिशियट आहे, हा गॅप कूठून निर्माण झाला . हे पाणी जाते कूठे? साहेब, याचा शोध  घेणे गरजेचे आहे. लक्षवेधी चांगली आहे. विषय गांर्भियाचा आहे. या विषयावर दोन ते तीन वेळा आंदोलने झाली आहेत. प्रशासनाला आम्ही नेहमी या विषयावर चर्चा करायला उभे

करतो. मार्ग निघत नाही. त्याची सुटका होत नाही.आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहे. तुम्ही चांगले प्रशासन सांभाळता. या विषयावर तुम्ही त्याची एक्झॅक्ट माहिती घ्या. कॅल्क्युलेटींग सब्जेक्ट आहे. पाणी येउ शकते. पाणी आहे. पाणी कुठे जाते त्याची माहिती घ्यावी लागेल. हा विषय स्वतःहून सुटेल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो. कधीपासून लक्षवेधी मांडली आहे. सर्वांना बोलायला दिले. पण पुन्हा पुन्हा पुर्नविचार होतात की, श्री. मिलन म्हात्रे, मी नाव घेऊन बोलतो की,तेच सदस्य होते का, ज्यावेळी मिरा भाईदरमध्ये पाण्यासाठी आंदोलन झाले? बरेच सदस्य होते. मी ही त्यावेळी सदस्य होतो. मी आंदोलनाला उतरलो होतो. त्यावेळी श्री. दिलीप बाबर होते, श्री प्रफुल्ल पाटील होते आणि सदस्य एकमेव श्री. मिलन म्हात्रे बोलतात की, मीच होतो. दुसरे प्रतिनिधी कोणी नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

मी नगरसेवक पण नव्हतो. शेवटच्या दिवशी आंदोलन झाले. पहिले दोन दिवस कोणी नव्हते.

**शशिकांत भोईर :-**

त्याचे हे वक्तव्य चुकीचे आहे. वांरवार ते या सभागृहाची दिशाभूल करू इच्छितात. मी तिथे लोक प्रतिनिधी होतो. दुसरे सगळे झोपलेले.कोणीही झोपले नव्हते. सर्व आपआपल्या वॉर्डमध्ये तत्पर होते. तो होळीचा सण होता मला आतमध्ये टाकले होते. त्यावेळेस १०० एम.एल.डी. पाण्याची डिमांड केलेली . ते पाणी मोरबे डॅममधून पाणी देणार होते त्याचे काय झाले? मोरबे डॅमच काय झाल त्याचा आपण पाठपुरावा करावा. आणि मोरबे डॅममधून पाणी मिळत नसेल आणि मोरबे डॅममध्ये जास्त पाणी आरक्षित असेल तर मोरबे डॅममधून ते नवी मुंबईसाठी १०० एम.एल.डी. आपण मागणार होतो ते त्यांनी तिथे वळवाव आणि आपण एम.आय.डी.सी. कडून ते १०० एम.एल.डी. पाणी जादा जात असेल. तर ते आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करावा. आणि त्यासाठी प्रशासनाने जोमाने ही काळाची गरज आहे. तर आपण ताबडतोब कामाला लागाव ही माझी सुचना आहे. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी जी लक्षवेधी मांडली त्यांच अभिनंदन करतो की, मिरा भाईंदरमध्ये पाण्याचा प्रश्न ज्वलंत आणि अनिल सावंत साहेबांनी एम.एम.आर.डी. तर्फे रेन्टल हाऊसिंग बांधली जातात ती जर लोकसंख्या वाढली तर पाण्याची आणखी गैरसोय होईल त्यासाठी आपण जातीने लक्ष द्याव ही विनंती.

**मर्लिन डिसा :-**

मा. महापौर साहेब, काही सोसायटींना नेहमी सरासरीची बिल येतात. का येतात? त्यांची मीटर बंद असतील तर त्यांना नोटीस द्यायला पाहीजे.

**सुरेश वाकोडे :-**

आम्ही त्यांना नोटीस देतो.

**मर्लिन डिसा :-**

त्यांना नोटीस मिळत नाही.ते रिपेयरिंग करत नाही. मग सरासरीची बिल कशी येतात. काहीही अमाऊन्ट पाठवतात. त्यामुळे त्याचा त्यांना त्रास होतो. त्यांना टॅन्करचा खर्च असतो. मा. आयुक्त साहेब, एम.टी.एन.एल. रोडवर तीन चार जागेला लिकेज होतो. तिकडे सोसायटीना रिक्वेस्ट करून मटेरियल मागवून घेतले होते. तर है पैसे कॉर्पोरेशनने खर्च करायचे की सोसायटी ने खर्च करायचे. व्हू इज टू स्पेंट धिज अमाऊन्ट.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, आपके परवानगीसे भाईंदर इस्टमें भी बहोत सारे बिल्डींग है। जिनके मीटर बंद पडे है। अपनी नगरपालिका चेकींग के लिए कही बार गये है की, प्रेशर क्यू कम है। उनको कोई नोटीस नही आयी। वो आज भी बनवाते नही है। बिल ऐसे ही एक अनुमानित आ जाता है। यह सब पाणी के इतने सारे प्रॉब्लेम है। इतने सारे आंदोलन हुए। तो आंदोलन की नौबत नही आये। इसके लिए अपने को कदम उठाने है। साहब कमर्शियल जगह पर आठ-आठ कनेक्शन दिए गये है। जो पानी का अनइक्वल डिस्ट्रीब्युशन है। कमर्शियल जगह पे आठ-आठ कनेक्शन दिये है। मॉल्स मैं है। बडे बडे गॅरेज है जहॉ गाडीया धोने के लिए आठ-आठ कनेक्शन दिये है। शहर में लोगो को पीने के लिए पाणी नही है। और गॅरेज में आठ आठ कनेक्शन दिए है। इसपर ध्यान देने की जरूरत है।

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, पाणी की जो समस्या होती है। उसकी माहीती मेरे को है। वह मैं बताता हूॅं । पाणी की समस्या इसलिए होती है की अपने लाईन मॅन है ना। उन्होने सोसायटीसे हप्ता खाना चालू किया है। कभी कम करने का कभी जादा करने का। और रंगे हाथ रात के ११.०० बजे कमिशनर शिवमुर्ती नाईक साहब कनकिया बंगले पे जा रहा था। और मेरे कार्यक्रम मे मै साहब को लेने जा रहा था। तभी बीच मे रात ११.०० बजे गेस्ट हाऊस मे पानी का नल दि जा रही थी। ताबडतोब कमिशनर साहब, नीचे उतरे और रुकवाया ताबडतोब बंद करवाया। दुसरे दिन, तिसरे दिन फिर से लग गया। वह लाईन मॅन बागूल नाम का आदमी था। उसके रिपोर्ट पे यही लिखा हुआ था। बागुल नाम का जो इंजिनिअर है ना सब जगह पे यही धंदा करता है। और आपस मे नगरसेवकको झगडने का काम कराता है। और गेस्ट हाऊस और बिल्डरों का जब फायलिंग होता है। तब पानी का लाईन दिया जाता है। बिल्डर के फाईल को ओ.सी. नही। सब कनेक्शन

डाले है। जब ओसी नही तो उसकी कनेक्शन देने की क्या जरुरत है। और जिसको ओसी रहती है उसको प्यार की चप्पल घिसनी पडती है। अवैध कनेक्शन काफी हॉटेल मे और गेस्ट हाऊस मे हुआ है। वह कट कीया जाए तब ही यह पानी होगा जब वॉटर डिपार्टमेंट मे नया अधिकारी आता है तब उसके पिछे कुछ कांडी किया जाता है। पानी के टाकी मे इतना उपर कबुतर आता है। सब पाईपलाईन मे कबुतर निकलता है। थोडे दिन पहले प्लास्टिक निकलना चालू हो गया। यह धंदा चालू हो जाता है। क्योकी अधिकारी नया आता है उसको काम करने का मौका नही मिलता है। यह कौन करता ऐसे अधिकारी को तत्कालीन सस्पेंड किया जाए। और यह बात सत्य है सब नगरसेवक साक्षी है। एक पाईपलाईन मे कबुतर निकल सकता है। पर सब पाईपलाईनसे कैसे कबुतर निकल सकता है। टाकी के उपर का जाली निकाल दिया सब कबुतर अंदर गिरा। जो अधिकारी ने यह कांड किया है ना उसको तत्कालीन सस्पेंड किया जाए।

**मिलन म्हात्रे :-**

श्री. बागुल तर मिरारोड का बादशाह आहे. अर्धी अधिक काम तर त्यांनीच केली आहेत. बागुलला नुसतं कनेक्शन बसवु नका. श्री. बागुलने आतापर्यंत किती कामे अनधिकृत कोणाच्या सांगण्यावरुन केली आहेत त्याची इंन्क्वायरी करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपण जर पैसे भरुन आपल्याला पाण्याचे कनेक्शन मिळत नसेल तर तो बागुल नावाचं माणुस खोटी काम करत असेल तर त्याला कामावर कशाला ठेवलं आहे घरी बसवा.

**मिलन म्हात्रे :-**

पहिली चौकशी करा. कोणाची कनेक्शन लावली आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, पाण्यासारख्या ज्वलंत विषयावर या महासभेमध्ये यापूर्वी अनेक वेळेला चर्चा झाल्या आहेत. नागरिकांचे आंदोलन झाले आहेत. ह्या महासभेमध्ये ठरंल होतं. पाण्यासारख्या ज्वलंत विषयावर आपण एक विशेष महासभा बोलवू परंतु अद्यापही पाण्यासाठी विशेष महासभा आपण बोलवलेली नाही. सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांना धन्यवाद द्यायला पाहिजे की त्यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून ह्या ठिकाणी ह्या विषयावर चर्चा घडवून आणली आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी पाण्यासारख्या अत्यंत ज्वलंत विषयावर ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. सन्मा. मा. आयुक्तांनी मनःपूर्वक ऐकलं आहे असं दिसून येते. ज्या-ज्या सदस्यांनी ह्या ठिकाणी आरोप केलेले आहेत. अनधिकृत नळ कनेक्शनच्या संदर्भात म्हणा किंवा वॉलमॅनने जी काही सोसायट्या बरोबर संगनमत करुन प्रेशर कमी जास्त केलेलं आहे. इंजिनियरचं नियंत्रण आहे की नाही पाणीपुरवठ्याच्या इंजिनियरने जागेवर जाऊन बघण्याचं काम आहे. ते ही ह्या ठिकाणी दिसून आलेलं आहे. आपला पाणी विभाग जो आहे तो अत्यंत निष्क्रीय झालेला आहे. कार्यकारी अभियंताच पाण्याच्या विभागावर अजिबात नियंत्रण राहीलं नाही. असं ह्या प्रकरणावरून दिसून येते. मा. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की, ज्या-ज्या सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी सुचना मांडल्या आहेत. त्याची आपण प्रत्यक्ष जाऊन कुठे कनेक्शन अनाधिकृत आहेत? का पाण्याची गळती होते, आणि का विषमता आहे. इतर विभागात जास्त पाणी येते, आमच्या पश्चिम विभागात खुपच कमी पाणी येते. ५८-५८ तासाने पाणी येते. लोक कधी कोणत्या क्षणी आंदोलन करतील त्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्व सन्मा. सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. याची दखल घेतली पाहिजे. नाहीतर बोलाची भात आणि बोलाची कढी असे झाल नाही पाहीजे. मा. आयुक्त साहेब, आपण ह्या ठिकाणी तातडीने पावले उचलावी. आपल्याला पूर्ण अधिकार ही महासभा देत आहे. आपण जे-जे निर्णय घ्याल शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातुन त्याला आमचा पाठिंबा राहील. मा. महापौर बोलतात विकास करा. आपण कृपया कारवाई करावी.

**सुरेश वाकोडे :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर शहरामध्ये १०६ दशलक्ष पाणी मिळते. ते आपल्या गरजेच्या मानाने फारच अपुरे आहे. कमीत कमी ह्या शहराला १५० एम.एल.डी. पाण्याची गरज आहे. तेवढ पाणी न येता १०६ एम.एल.डी. पाणी येते. म्हणजे ४४ एम.एल.डी. पाण्याचा शॉटफॉल आहे. आणि तोच आपण एका एम.एम.आर. रिझममध्ये विचार केला. बाकी महापालिकामध्ये होणारा पाणी पुरवठा, ठाणे शहराच बघीतल तर ठाणे शहराचा १८.५० लोकसंख्या आहे. ४५० एम.एल.डी. पाणी येते. पर माणसी २४३ लिटर पाणी मिळते. नवी मुंबईला १३ लाख लोकसंख्या आहे. ३५० एम.एल.डी. पाणी मिळते. २६८ लिटर पर माणसी पाणी मिळते. आणि मिरा भाईंदर शहरामध्ये ८.१४ लक्ष लोकसंख्या १०६ एम.एल.डी. पाणी त्याप्रमाणे साधारण आपल्याला ११० एम.एल.डी. पाणी मिळते. ही फार मोठी तफावत आहे. ह्या तफावतेमुळे हा पाण्याचा प्रश्न उद्‌भवतो त्याला हेच कारण आहे. जर १५० एम.एल.डी. पाणी आल तर हा प्रॉब्लेम राहणार नाही. त्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी प्रधान सचिव उद्योग, मुख्य अभियंता पाटबंधारे, एम.एम.आर.डी.ए. प्रधान सचिवांना एम,आय.डी.सी. अतिरिक्त १०० एम.एल.डी. पाणी मिळण्यासाठी १६/०९ ला पत्राव्दारे कळवल आहे. आणि प्रधान सचिवांनी प्रत्यक्ष भेट घेऊन मिरा भाईंदरची परिस्थिती आहे. तर एम.आय.डी.सी. तर्फे ॲडीशनल १०० एम.एल.डी. पाणी मिळावे.

**मा. आयुक्त :-**

पाण्याचे जसे ह्यांनी आकडे सांगितले की, दररोज जर आम्ही सरसकट आमच्या लोकसंख्येला पाण्याचा जर हिशोब घेतला तर दररोज १०० एम.एल.डी. पाणी आहे. ठाणे आणि नवि मुंबईचा विचार केला तर २५० एम.एल.डी. पाणी आहे. म्हणजे मिरा भाईंदरला अडीज पट पाणी कमी येते. साहेबांनी सांगितल्याप्रमाणे बरेचसे डिस्ट्रीब्युशनचे प्रॉब्लेम आहेत. बरेचसे प्रॉब्लेम इनलिगल कनेक्शनचे आहेत. इमारती लिगल नाहीत त्यांना पाणी सप्लाय होते. हे सुध्दा माझ्या लक्षात येते. याच्यावर आम्ही लवकरात लवकर कारवाई करू. अशी जी इमारती आहेत ज्या इनलिगल आहेत किंवा ज्याच्यात सॅक्शन नाहीत त्या ठिकाणी पाणी जात असेल किंवा पाण्याची चोरी होत असेल, तर ते आम्ही थांबवू. ब-याचशा ठिकाणी मोटार लावून पाणी ते त्याच्या सोसायटीमध्ये घेतात किंवा घरात घेतात. त्याची सुध्दा आम्ही एक विशेष टीम करून रात्रीच्या वेळी अस घडते त्याच्यावर आम्ही लक्ष घालू. तांत्रिक दृष्टीने जो महत्वाचा विषय आम्ही करतो, एक मॉर्डन वॉल्व्ह लावू, वॉल्व्ह झाल्यानंतर कस असते वॉलमॅनला वॉल्व्ह लावायला लागते, वॉल्व्ह सुरू करायला लागते, वॉल्व्ह बंद करायला लागते. हे जे नविन वॉल्व्ह आहेत वॅट कंपनीचे वॉल्व्ह हे स्वतःहून म्हणजे बटन दाबल्यावर वॉल्व बंद होतात. बटन दाबल की वॉल्व्ह सुरू होतात. आणि त्याच रिडींग किती पाणी सोडला, किती पाणी आल, त्याच रिडींग कॉम्प्युटरवरून येते. असे वॉल्व्ह लावण्याचे प्रयत्न आम्ही करतो. परंतु वाकोडे साहेबांनी सांगितल विषय हे करून संपणार नाही अस वाटते, निश्चितपणे ह्याच्यात फरक पडणार पण संपणार नाही अस वाटते. कारण पाण्याची जी सप्लाय आहे ती आपल्या एरियामध्ये कमी आहे. यासाठी आम्ही सगळ्यांनी प्रयत्न केले पाहिजे पाणी वाढवण्यासाठी जी नविन सुर्या धरणाची योजना आहे. ती योजना पूर्ण होण्यासाठी तीन ते चार वर्ष जाणार आहेत. कारण ती १३५० कोटीची योजना आहे. त्याची एकदा सुरूवात केली तर त्याच्यात कम्प्लीएशन पिरीयड आहे. त्याच्यात बरेचसे लॅन्ड ॲक्वीझीशनचे विषय आहेत. फॉरेस्ट एरियामध्येसुध्दा लॅन्ड ॲक्वीझीशन आहेत आणि हे सगळ धरून तीन ते चार वर्ष जाणार आहेत. तातडीने जी पाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मी प्रधान सचिवांना सुध्दा भेटलो होतो. त्यांना सांगितल की एम.आय.डी.सी. कडून आता पाणी मिळाल तर त्याचा आम्हाला फायदा होईल तसेच एम.आय.डी.सी. मध्ये पाईपची रिप्लेसची गरज होती. ते रिप्लेसच काम सुरू केल आहे. आणि ते रिप्लेस झाली तर १० एम.एल.डी. पाणी वाढू शकते अस वाटते. तसेच भाईंदर वेस्टला पाण्याचा तुटवडा आहे. पाणी ५० ते ५२ तासाने पोहचते. त्याच्यामध्ये जी अडचण आहे ती रेल्वे ट्रॅकच्या खाली जे पाईपलाईन आहे त्याची क्षमता सध्या कमी आहे. ती पाईपलाईन रिप्लेस करून नवीन मोठी पाईपलाईन टाकायची आहे. त्याच्यासाठी त्याची परवानगी ब-याच दिवसापासून मिळत नव्हती. मागच्या आठवड्यात रेल्वेची मिटींग घेतली. रेल्वेकडे आम्ही ९० लाख आता जमा करतो. त्याची जेवढी फी आहे ती जमा केल्यावर परवानगी मिळेल. मग ते काम सुरू होईल. त्याची निश्चितपणे कॅपेसीटी वाढवली तर भाईंदर वेस्टला त्याचा फरक पडणार आहे. मला माहीत आहे हा विषय गंभीर आहे. एक ठिकाणी लोकसंख्या वाढत आहे. आणि पाण्याचा तुटवडा आहे. निश्चितपणे ह्याच्यावर आम्ही लक्ष घालून जेथे इनलिगल कनेक्शन आहेत. जेथे चुकीचे प्रकार घडला आहे त्याच्यावर कारवाई करु.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, ह्याच्यात एक दोन मुद्दे सुटलेले आहेत. या शहरात वाढीव पाणी कुठून येईल कारण मिरा भाईंदरचा स्वतःचा डॅम नाही. आपण काही करुन पाणी इथेच घेणार आहोत. या शहरामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग काही ठिकाणी यशस्वी रित्या कार्यान्वीत आहे. उदा. आमच्या सृष्टीमध्ये ब-याचशा बिल्डींगमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग प्लान्ट लागलेले आहेत आणि त्या बिल्डींगला अल्टरनेट डे पाणी मिळत. आज जवळ जवळ १० हजार लिटर पाणी एका रेन वॉटर हार्वेस्टींग प्लान्टला अल्टरनेट डे ला मिळते. त्या जर ह्या स्किमसाठी जे नविन नविन प्रोजेक्ट येत आहेत त्यांना जर कंम्पलसरी आणि प्रोत्साहीत केले तर नविन टेक्नोलॉजी वापरुन जे खारें पाणी लागते ते प्युरीफाय करुन येत असेल अशा प्रकारचे रेन वॉटर हार्वेस्टींगचे प्रोजेक्ट निघाले आहेत. आयुक्त साहेब, आपल्या जे.एन.एन.यु.आर.एम. चा प्रोजेक्ट ऑगस्टमध्ये कंम्प्लीट होणारच आहे. त्याला आणखी तीन चार महिने लागतील. त्याच्यातून बरचसे पाणी निघणार आहे. ते रिसायकलिंग करायची कंडीशन आहे. ते जर पाणी शहरातील गार्डनींग आणि फ्लश टँकसाठी वापरंले. प्रायोगिक तत्वावर अर्ध्या टक्क्यांनी वापरुन मग संपूर्ण शहरामध्ये वापरले तर त्या ठिकाणी बरीचशी बचत होईल आणि ह्या शहरामध्ये १० ते १२ तळी आहेत. त्याच्यातून ४ ते ५ एम.एल.डी. पाणी ह्या शहरातून आम्हाला उपलब्ध होऊ शकेल आणि ह्या शहराची गरज भागवू शकेल. हे आपण मिरा भाईंदर पालिका स्वतःहून करु शकतो. एम.आय.डी.सी. आपल्याला पाणी देणार सुर्या डॅम मधून देणार दॅट इज अ टाईम कंझ्युमिंग प्रोजेक्ट पण हे जे उपाय आहेत तुम्ही जे मोटरच बोललात ह्या मोटारवर सक्त कारवाई व्हायला पाहिजे त्याच्यामुळे तुमची मेन पाईपलाईन लिकेज होऊ शकते आणि एका ठिकाणी जास्त जाते एका ठिकाणी कमी जाते हे जे पुलिंग आहे. जसं पेट्रोल पंपावर जशा मशिन असतात. पेट्रोल टाकलं की बिल दिसते. नागपूर महानगरपालिकेने ती सिस्टम राबवली आहे. तुमचा मिटर रिडींग घेणारा सोसायटीमध्ये गेला सोसायटी च्या वॉचमन समोर किंवा सेक्रेटरी समोर रिडींग बघितलं की ताबडतोब ऑन द स्पॉट बिलींग द्यायला पाहिजे त्यामुळे काय होईल बिलींग कम्पलसरी होईल आणि रिकव्हरी चांगली होईल. या शहरातील लोक पैसे भरायला तयार आहेत. आज आपण पाण्याची बिल वसुल करतात १०० टक्के रिकव्हरी आहे लोक पैसे तीन

तीन महिन्याने भरतात पण बिल्डींग व्हायला उशीर होतो. आपण इतर सुविधा राबवल्या तुम्ही पाच सहा महिन्यामध्ये आल्यापासून ह्या वॉटर डिस्ट्रीब्युशनमध्ये ब-याच प्रमाणात फरक पडलेला आहे. मुळातच पाणी कमी मिळते ते व्यवस्थितरीत्या डिस्ट्रीब्युशन करुन पाणी पुरवठा करणं ही या शहराची गरज आहे. तुम्ही आल्यापासून महत्वाचा फरक त्याच्यामध्ये पडलेला आहे. आणखी फी जर वाढवली तर पाणी पुरवठा ह्या शहरातील लोकांना मिळू शकेल.

**मा. आयुक्त :-**

रिसायकलींग बद्दल सिव्हरेज स्ट्रीटमेंट प्लांट आम्ही सुरु करतो आहे. त्याच्यातील पाणी बाहेर पडणार त्याच रिसायकल केलं पाहिजे. ह्यासाठी निविदा काढली होती दोन लोकांनी निविदा भरली होती. पण दोन्ही निविदा त्यांच्या तांत्रिक कारणामध्ये बसत नसल्यामुळे रिजेक्ट केली आहे. आता ती निविदा परत करु दुसरा विषय आहे की, पाणी लोकांनी कशासाठी वापरलं पाहिजे. ज्या पाण्याचं रिसायलिंग होते त्यासाठी डी.सी. रुल चेंज करु की तुम्ही ह्याच्यामध्ये दोन पाईपची व्यवस्था करा एक रिसायकल पाण्याची आणि एक फ्रेश पाण्याची ह्याची डी.सी. रुलमध्ये तरतुद करण्यासाठी शासनाला पत्र दिले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, एक ठाणे महानगरपालिकेच्या महासभेसमोर विषय आलेला, की जसे महानगरपालिकेचे इंन्डीव्युजअल पाण्याचे बिलं जाते. तसेच जर आपल्याला पाण्याचं इंन्डीव्युजअल बिल करता आलं. कारण सोसायट्यांमध्ये सगळ्यांना पाण्याचे सारखे पैसे भरायला लागतात जर ते शक्य असेल तर ते करुन बघा. त्यानंतर रेन वॉटर हार्वेस्टींग किंवा बोअरवेल जे म्हणतो त्यासाठी नगरसेवक निधी जर वापरता आला तर त्याचा आपण विचार करुन बघा.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, सुभाषचंद्र मैदानामध्ये आपली जी पाण्याची टाकी आहे त्याचे ब-याच वर्षापासून काम तसेच राहिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सगळीकडे टाक्या अर्धवट आहेत आपल्याला पाणी स्टोअर करण्यासाठी कूठेच जागा नाही. करोडो रुपये लागले अनेक पत्रव्यवहार झाले. सगळ्यांना भेटून झाले त्या टाक्यामध्ये प्रोग्रेस का नाही? आणि जी कामे झाली आहेत त्याच्यातून ट्रान्सफरन्ट फटी आणि छिद्र दिसतात त्याच्यात आपण पाणी साठवणार आहोत.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब त्याच कारण सांगितले तर बर होईल.

**सुरेश वाकोडे :-**

५० एम.एल.डी. अंतर्गत त्या टाक्याचे काम चालू होते. एम.जी.पी. कडुन ते काम अर्धवट पडले आहे. त्याच्यावर कॉर्पोरेशनचा पाठपुरावा चालू आहे. मा. आयुक्त साहेब दोन आठवड्यामध्ये त्याच्यासोबत मिटींग घेणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना पॅनल्टी लावा त्यांनी तुमचे पैसे घेतले आहेत. करोडो रुपये वर्षानुवर्षे वापरतात कायद्यात तरतुद नाही का?

**कांचन पुजारी :-**

वाकोडे साहेब चार इंचाचां पाईप आणि सहा इंचाचा पाईपच कनेक्शन किती आहे ते बोला.

**सुरेश वाकोडे :-**

कनेक्शन कसं आहे त्याठिकाणी प्रेशर किती प्रेशरनूसार कनेक्शन लावणार.

**कांचन पुजारी :-**

चार इंचाचा पाईप आहे. सोसायटी आहे त्याच कनेक्शन चार इंचाच्या पाईपमध्ये लागते आणि सहा इंचाच्या पाईपमध्ये सोसायटी वाढली तर पाणी कमी खेचते ना पाणी कमी येते. वॉल्व्ह तर वाढवत नाही. मेंबर जास्त झाल्यानंतर वॉल्व्ह तरी वाढवायला पाहिजे. मला हे सांगा की,चार इंचाच्या पाईपमध्ये किती कनेक्शन लागायला पाहिजेत आणि सहा इंचाच्या पाईपमध्ये किती कनेक्शन लागायला पाहिजेत.

**सुरेश वाकोडे :-**

चार इंचाच्या पाईपमध्ये साधारण २० कनेक्शन आपण देतो आणि सहा इंचाच्या पाईपला ३६ कनेक्शन देतो.

**मर्लिन डिसा :-**

साहेब, माझे उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

मी ह्या सभागृहाला सांगु इच्छितो, गेल्या महिन्यात मी मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चौहान ह्यांची भेट घेतली त्याचा पत्रव्यवहार केलेला आहे. जेणकरुन मोरबे जे १०० एम.एल.डी. पाणी आहे. ते एमआयडीसी कडे शिल्लक आहे. ते तातडीने आम्हाला द्या. त्यासंबंधीत ह्याच महिन्यात मा. मुख्यमंत्री संबंधीत खात्याच्या लोकांना घेऊन मिटींग घेणार आहेत. त्याचा नक्की पाठपुरावा होणार आहे.

**मर्लिन डिसा :-**

वाकोडे साहेब, मला उत्तर द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, त्यांनी सांगितलं की प्रत्येक माणसी ११० लिटर पाणी देतो. त्यांनी कॅल्क्युलेशन करुन दाखवले की ११० लिटर पाणी कसे येते?

**भगवती शर्मा :-**

उन्होंने क्या किया ठाणे महापालिका नवी मुंबईका अंक जोड दिया।

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब २४ तासांनी कुठच्या एरीयामध्ये पाणी येतं ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, वाकोडे साहेबांनी सांगावे की ११० लिटर पाणी कसं येत त्याच कॅल्क्युलेशन करायला सांगा.

**आसिफ शेख :-**

११० एम.एल.डी. डिव्हाईड बाय आठ लाख पॉप्युलेशन किती पाणी देते दाखवा. वितरण व्यवस्था सांगा आपल्या वितरण व्यवस्थेमध्ये दोष आहे.

**मा. महापौर :-**

पाण्याचा विषय झालेला आहे आता पुढचा विषय घ्या ज्या अधिका-यांनी बेकायदेशीर कनेक्शन लावली आहेत. त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा आदेश देतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६२, दि. ३०/०५/२०११ व दि. २०/०६/२०११ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, एक गोष्ट इथे सांगायची आहे की, प्रशासन म्हणजे आयुक्ताचं सही आहे. ह्यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची अनुसूची ''ड'' मधील प्रकरण २ ''के'' अन्वये एक प्रस्ताव दिला आहे. तो आपण घ्यावा अशी मी तुम्हाला विनंती करते.

**नगरसचिव :-**

पान नंबर १ ते १०.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, १ ते १० मध्ये मागे आपली चर्चा झाली होती. सभागृहामध्ये प्रतिकृती अहवाल सादर केला होता. चांगली शिस्त होती. सभागृहामध्ये इंम्प्लीमेंटेंशन काय आहे. पान नंबर ८ वर आतापर्यंत किती लोकांवर एम.आर.टी.पी. ची कारवाई झाली. ३०/०५/२०११ इतिवृत्तांतला मंजूरी मिळाली आहे. आता मंजूरीसाठी विषय आला आहे. आपण प्रतिकृती अहवाल सादर केला नाही.

**नगरसचिव :-**

केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला आला नाही. मागच्या वेळेला तुम्ही प्रतिकृती अहवाल सादर केला तो फक्त तीन विषयाकरीता ते आमच्या करीता चांगल आहे. परंतु, ते ह्याच्यात नाही ह्या मिटींगचं कुठे आहे.

**नगरसचिव :-**

मागच्या मिटींगला दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एम.आर.टी.पी बद्दल काय झालं किती लोकांना एम.आर.टी.पी. लावला खुलासा करा. इतिवृत्तांताला तुम्ही मंजूरी घेता. साहेब, आतापर्यंत प्रतिकृती अहवाल येत नव्हता. सचिव साहेब, एक लक्षात घ्या आम्ही सदस्य आहोत. उद्या तीन मिटींग गैरहजेरी लावली तर पुढे होणारे त्रास आम्हाला सहन करायला लागतात ना.

**अनिल सावंत :-**

५२ नंबर पेज ते पेंडींग ठेवा त्या अनुषंगाने ''क'' चा प्रस्ताव आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

२६ नंबरपासून माझी हरकत अशी आहे की, आपण ज्या हॉस्पीटलची यादी दिली आहे. त्यामध्ये त्या यादीमध्ये डॉक्टराच कॉलिफिकेशन वगैरे टाकावे. अशी आमची सुचना होती. त्या आल्याच नाहीत भाईंदर मध्ये विचित्र अवस्था आहे. आम्ही सांगितले होते त्याच्यामध्ये कॉलिफिकेशन डिग्र्या वगैरे सगळं टाका. जशाच्या तशा रेगोट्या ओढल्या आहेत. त्यांना परमिशन मिळाली असेल तर त्या परमिशनची तारीख आली पाहिजे. ते

केलेलं नाही ती सुधारणा करुन घ्या आम्ही ह्याला मंजूरी देतो. शाळामध्ये आपण अनुदानित आणि विना अनुदानित स्टेट गव्हर्नमेंटचे धोरण आहे. विद्यार्थ्यांचे पट चेक केले जातात. ह्या शाळामध्ये काय मंजूरीची तारीख नाही, काही आपण टाकलेले नाही. ह्या सगळ्या सुचना त्यावेळेला आम्ही केल्या होत्या.

**प्रभात पाटील :-**

पान ५७ वर ठराव आहे. ठरावाचा भाग मंजूरीला घेऊ नका. त्याचाच ''के'' प्रस्ताव आलेला आहे. विषय तोच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, माझे ऑब्जेक्शन २६ ते ३५ पर्यंत आहे.

**नगरसचिव :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे माझं ऑब्जेक्शन नोंद करा आणि मग मंजूरी द्यायची आहे. डॉक्टरचं कॉलिफिकेशन शाळाचे रजिस्ट्रेशन असेल तर त्यांचे नंबर कारण स्टेट गव्हर्नमेंटचे धोरण चालू झाले आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, ५३ नंबर पेजवर मिलन पाटील म्हटले आहे. तिकडे मिलन म्हात्रे पाहिजे, सचिव साहेब, १३ नंबर पेजवर बघा. मा. महापौरांच्या तोंडी एक वाक्य आहे. त्यांचे कोणीतरी मयत झाले म्हणून ते हजर आहेत.

**नगरसचिव :-**

गैरहजर आहेत.

**अनिल सावंत :-**

ते गैरहजर पाहीजेत.

**प्रभात पाटील :-**

दि. ३०/०५/२०११ व दि. २०/०६/२०११ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

इतिवृत्तांत मंजूर करण्यात आला आहे.

**प्रकरण क्र. ६२ :-**

दि. ३०/०५/२०११ व दि. २०/०६/२०११ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६६ :-**

दि. ३०/०५/२०११ व दि. २०/०६/२०११ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६३, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांच्या नेमणूकीकरिता तसेच स्थायी समितीच्या दोन (२) सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम
१९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये दोन (२) सदस्यांची नेमणूक करणे.
निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १) श्री. दिनेश दगडू नलावडे | २) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी |
| ३) श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | ४) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे |
| ५) श्रीम. सुधा वासुदेव व्यास | ६) श्रीम. कॅटलीन ॲन्थोनी परेरा |
| ७) श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | ८) श्री. मोहन महादेव जाधव |

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे
१) श्रीम. पांडे स्नेहा शैलेश २) श्री. दुबे रामनारायण एस.

एकूण ११ नाव आली आहेत. संयुक्त लोकशाही आघाडीचे गटनेते शफिक अहमद सादत खान ह्यांच्या कडून सहा नावे दिली आहेत. १) शफिक अहमद खान २) जुबेर इनामदार ३) अनिल दिवाकर सावंत ४) मधुसूदन पुरोहीत ५) नयना म्हात्रे ६) मर्लिन डिसा अशी सहा नाव त्यांच्याकडून आली आहेत. राष्ट्रवादी कॉग्रेसचे गटनेते भगवती शर्मा ह्यांच्याकडून दोन नाव आली आहेत बर्नड डिमेलो, श्रीम. नर्मदा वैती, बहुजन विकास आघाडी अपक्ष मोहन जाधव हयांच्याकडून एक नाव आलेल आहे. श्री. मोहजन जाधन यांचे नाव आले आहे. भारतीय जनता पार्टीचे गटनेते ओमप्रकाश गंगाधर ह्यांच्याकडून दोन नावे आली आहेत. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर आणि सौ. कल्पना म्हात्रे. तीन राजीनामे दिलेले आणि आठ नियुक्त झालेली अशी ११ नाव आली आहेत.

**मा. महापौर :-**

एकून ११ नाव वाचली आहेत त्यांनी मजुंरी देण्यात आली आहे.

**नगरसचिव :-**

मर्लिन डिसा हया शेख मुर्सरत बानो ह्यांच्या जागेवर आल्या आहेत त्याचा कालावधी फक्त एक वर्षाचा आहे.

**प्रकरण क्र. ६३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांच्या नेमणूकीकरिता तसेच स्थायी समितीच्या दोन (२) सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये दोन (२) सदस्यांची नेमणूक करणे.

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे.
१) श्री. दिनेश दगडू नलावडे २) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३) श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे ४) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
५) श्रीम. सुधा वासुदेव व्यास ६) श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा
७) श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे ८) श्री. मोहन महादेव जाधव

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे
१) श्रीम. पांडे स्नेहा शैलेश २) श्री. दुबे रामनारायण एस.

**ठराव क्र. ६७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदयांपैकी निम्मे आठ सदस्य माहे ऑक्टोबर २०११ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत. तसेच तीन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना संयुक्त लोकशाही आघाडीचे ५, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २, व अपक्ष १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. तसेच भारतीय जनता पक्षाच्या २ व संयुक्त लोकशाही आघाडीच्या १ अशा एकुण तीन सदस्यांनी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजिनामा दिलेल्या तीन सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शफिक अहमद सादत खान | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. जुबेर इनामदार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्री. अनिल दिवाकर सावंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. मधुसुदन पुरोहित | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. नयना म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. बर्नड डिमेलो | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ७. | श्रीम. नर्मदा वैती | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | श्री. मोहन जाधव | अपक्ष |

स्थायी समिती सदस्या श्रीम. मुसर्रतबानो शेख यांनी त्यांचा स्थायी समिती सदस्य पदाचा राजिनामा दिलेला आहे. यापूर्वी राजिनामा दिलेले दोन सदस्य व श्रीम. मुसर्रतबानो शेख असे एकुण स्थायी समितीच्या तीन (३) सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्यांची उर्वरीत कालावधीसाठी नेमणूक करणेत येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | भारतीय जनता पक्ष |
| २. | श्रीम. कल्पना म्हात्रे | भारतीय जनता पक्ष |
| ३. | श्रीम. मर्लिन डिसा | संयुक्त लोकशाही आघाडी |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. १५ सदस्याची समिती असेल मा. आयुक्ताचे हे पदसिध्द चेअरमन असतील आणि एक स्विकृत सदस्य घ्यायची तरतूद आहे. १३ नाव आलेली आहेत ती मी अनुक्रमे वाचून दाखवतो. लोकशाही संयुक्त आघाडीचे गटनेते सन्मा. शफिक अहमद खान ह्यांच्याकडून सहा नाव आली आहेत. सौ. पाटील उमा श्याम, वेतोस्कर राजेश शंकर, सपार उमा विश्वनाथ, पुजारी कांचन, कल्पना ठाकूर, प्रमोद सामंत. राष्ट्रवादीचे गटनेते सन्मा. भगवती शर्मा ह्यांच्याकडून तीन नाव आली आहेत. सौ. वंदना पाटील, अनिता पाटील, श्री. राजेश म्हात्रे, शिवसेना गटनेते प्रशांत पालांडे ह्यांच्याकडून अनंत पाटील ह्याच नाव आलेल आहे. भा.ज.पक्षाचे गटनेते ओमप्रकाश अग्रवाल ह्यांच्याकडून सौ. मिरादेवी यादव, सिसिलीया बावीघर, अपक्ष मोहन जाधव ह्यांच्याकडून सौ. वर्षा भानुशाली ह्यांच नाव आल आहे. अशाप्रकारे १३ सदस्यांची समिती गठीत झालेली आहे.

**मा. महापौर :-**

१३ जणांची समिती गठीत झाली असे मी जाहीर करतो.

**प्रकरण क्र. ६४ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ६८ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. १७/१०/२००७ ठराव क्र. ६ अन्वये वृक्षप्राधिकरण समिती गठित करण्यात आलेली होती. त्यामध्ये एकूण सदस्य संख्या १५ असावी असे ठरविण्यात आले आहे. नगरविकास विभागाकडील पत्र क्र. टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र. १९३/२००६/नवि-११, दि. १४ डिसेंबर २००९ अन्वये वृक्ष प्राधिकरणावर अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत अशासकीय संस्थेची सक्रिय सदस्य असेल तसेच तिला वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि वृक्ष संरक्षण इत्यादी यामध्ये रुची असेल आणि तसेच तीला या क्षेत्रातील किमान १० वर्षाचा अनुभव प्राप्त असेल असा प्रतिनिधी नामनिर्देशित केलेला असेल व एक सदस्य हा या समितीचा अध्यक्ष असेल. कलम ३(२) अन्वये या समितीचे अध्यक्ष हे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त असतील.

यापूर्वी वृक्ष प्राधिकरण समितीवर तौलानिक संख्याबळानुसार संयुक्त लोकशाही आघाडी ६+१ नामनिर्देशित सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ३, भारतीय जनता पार्टी २, शिवसेना १ व अपक्ष १ अशी सदस्य नेमणूक केलेली होती.

मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२८, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य वृक्ष प्राधिकरण समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

त्यानुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. पाटील उमाताई शाम | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. वेतोस्कर राजेश शंकर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. पुजारी कांचन शेखर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. कल्पना हरिहर ठाकूर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. प्रमोद जयराम सामंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| ८. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| ९. | श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी |
| १०. | श्रीम. मिरादेवी यादव | भारतीय जनता पक्ष |
| ११. | श्रीम. सिसीलीया बावीघर | भारतीय जनता पक्ष |
| १२. | श्री. अनंत रामचंद्र पाटील | शिवसेना |
| १३. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | अपक्ष |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**नामनिर्देशित सदस्याची नेमणुक पुढील महासभेमध्ये करण्यात येईल. गठित झालेली समिती आपले कार्य / कामकाज सुरु ठेवील.**

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, महापौर चषक आयोजित करणेबाबत विचार विनियम करुन निर्णय घेणे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हा विषय घेतला तो विषयपत्रिकेतील विषय आहे. गेल्या अनेक वर्षापासून महापौर चषक संपन्न होते. गेल्या वर्षात का झाल नाही ती पहिली गोष्ट त्यांच्यानंतर त्याची रूपरेषा पण बदलली पाहीजे. आणि झालेले खर्च महापौर चषक म्हणजे आपल नाव झाले पाहिजे. ते व्यवस्थित झाले पाहीजे. त्याची व्याप्ती वाढली पाहीजे. त्याचा गोषवारा आला पाहिजे. आपण खर्च करतो, २५ लाख, १५ लाख श्री. मोहन पाटील असताना ४० लाखाच्या वर खर्च केला होता. स्टॅण्डींगला आम्ही असताना प्रोजेक्ट केला. २० लाख आणि झाला ५० लाख. आणि ती मिटींग एक मिनिटात संपवली होती. मी यायच्या आत खर्च मंजुर मिटींग संपवून सगळे बाहेर. ह्याच्यात गोषवारा आला नाही. आता आपण सगळे नक्की केले पण बजेटमधली किती रक्कम मंजुर करणार? त्याच्याकरिता तरतुद काय ठेवणार? लेखाशिर्षामध्ये ही तरतुद आहे का? ते पहिले ऑडिटर साहेबांनी सांगाव. खुलासा झाला तर बरे होईल.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर शहरातील शालेय विदयार्थी, नागरीक व वरीष्ठ नागरीक यांच्या सहभागाने त्यांना प्रोत्साहन देणेसाठी तसेच शहरात उत्साहाचे व खेळाचे वातावरण निर्माण करण्याकरीता महापौर चषक क्रिडा स्पर्धा करण्याची आवश्यकता आहे.

सदर महापौर चषक स्पर्धेचे आयोजन करणेकरीता मा. महापौर, यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी व अधिकारी यांची एक समिती नेमून खेळाचे प्रकार ठरविण्यास व तारखा निश्चित करण्यास रु. २०.०० लक्ष खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर स्पर्धेकरीता सर्व कामे जाहीर निविदा मागवून करावी तसेच रोख बक्षिसे देखिल देण्यात यावी.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ६५ :-**

महापौर चषक आयोजित करणेबाबत विचार विनियम करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर शहरातील शालेय विदयार्थी, नागरीक व वरीष्ठ नागरीक यांच्या सहभागाने त्यांना प्रोत्साहन देणेसाठी तसेच शहरात उत्साहाचे व खेळाचे वातावरण निर्माण करण्याकरीता महापौर चषक क्रिडा स्पर्धा करण्याची आवश्यकता आहे.

सदर महापौर चषक स्पर्धेचे आयोजन करणेकरीता मा. महापौर, यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी व अधिकारी यांची एक समिती नेमून खेळाचे प्रकार ठरविण्यास व तारखा निश्चित करण्यास रु. २०.०० लक्ष

खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर स्पर्धेकरीता सर्व कामे जाहीर निविदा मागवून करावी तसेच रोख बक्षिसे देखिल देण्यात यावी.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६६, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल पेमेंट किऑस्क प्रकल्पाद्वारे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व स्थानिक संस्था कर वसुली कार्यपध्दती राबविणेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

हा पण विषय असाच मंजुर करून टाकू या. हा पण पैशाचा प्रश्न आहे. तो पण पैशाचा प्रश्न होता.

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत मालमत्ता कर, पाणीपट्टी कर वसुली इ. करवसुलीची कार्यवाही महानगरपालिकेच्या विविध वसुली क्षेत्रातील कार्यालये व प्रभाग कार्यालयांतून करण्यात येते. त्यापैकी प्रभाग कार्यालय क्र. २, ३, व ४ रेडिओ फ्रिक्वेन्सी डिवाईस मार्फत संगणकीय आज्ञावलीशी जोडलेले आहेत. सदर कार्यालयांतून संगणकाद्वारे वसुली करुन नागरीकांना संगणकीकृत पावत्या देण्यात येतात.

परंतु प्रभाग कार्यालय १ व ग्रामीण भाग जसे चेणे, वर्सावे, उत्तन, डोंगरी, राई, मुर्धे इ. ठिकाणी आजतागायत संगणकीकृत वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करता आले नाही. करिता मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे किओस्क (KIOSK) प्रणाली यंत्रणा राबविणेकरिता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला. सदर यंत्रणा राबविणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही या टिप्पणी व्दारे प्रस्तुत करण्यात येत आहे.

१. Franchisee ने नोंदणी करणेकामी त्यांचेकडुन एक रकमी नोंदणी फी वसुल करण्यात येईल.
२. महानगरपालिका सदर प्रणाली कार्यान्वित करणे करीता Franchisee अधिकृत करेल.
३. सदर Franchisee कडून प्रथम टप्प्यामध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुली करणेत येईल.
४. सदरची KIOSK ची संख्या ही एकुण प्रभागाची (वॉर्ड) जनसंख्या व त्याचे एकुण क्षेत्रफळ यावर आधारित राहील.
५. सदर यंत्रणा राबविणेकरिता अधिकृत करण्यात आलेल्या Franchisee कडे कमीत कमी एक संगणक, इंटरनेट सुविधा व एक प्रिंटर यांची आवश्यकता आहे. तसेच स्वतःची जागा असणे आवश्यक राहील. परंतु Franchisee कडे स्वतःचा दुकानगाळा असेल तर अस्तित्वातील दुकानगाळ्यात देखील सदर Setup करता येईल.
६. सदर यंत्रणा राबविणेकरिता अधिकृत करण्यात आलेल्या Franchisee करीता महानगरपालिकेव्दारे स्वतंत्र लॉगीन आयडी ची सोय करुन देण्यात येईल. पासवर्ड सुरक्षिततेची जबाबदारी त्याची स्वतःची राहील.
७. याकरीता सदर Franchisee महापालिकेकडे अनामत रक्कम जमा करेल.
८. याकरीता सदर Franchisee ला प्रत्येक बीलाच्या रु. २००० पर्यंत रकमेवर ०.५ % सेवा आकार व रु. २००० चे वरील रकमेवर रु. २५ इतका सेवा आकार थेट देयक भरणाऱ्याकडून घेता येईल.
९. Franchisee ने जमा केलेल्या अनामत रकमेतून त्यांचेजवळ जमा झालेली कराची रक्कम संगणक प्रणालीद्वारे वजा होईल व प्रत्येक वेळेस वसुल करावयाचे रकमेपोटी आगाऊ अनामत रक्कम जमा करणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.
१०. वॉर्ड किंवा वॉर्डच्या समुहाची लोकसंख्या १५००० वा त्याहून जास्त असेल अशा ठिकाणी दोन KIOSK प्रस्तावित केले जातील. भौगोलिक दृष्ट्या सलग वॉर्डची १५००० लोकसंख्येपर्यंत एक KIOSK प्रस्तावित करण्यात येत आहे.
११. Franchisee कडे जमा होणाऱ्या कराचा भरणा हा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन (ONLINE PAYMENT) प्रणालीशी निगडीत असेल. याकरीता सध्या अचल (STATIC) असलेले महानगरपालिकेचे संकेतस्थळ हे चल (DYNAMIC) स्वरुपात करणे आवश्यक आहे.
१२. कर भरणा व्यतिरीक्त जन्म व मृत्यू दाखले च अन्य सुविधांकरीता Franchisee व्दारे माफक सेवा आकार घेणेत येईल. हा आकार महानगरपालिकेने विहीत केलेल्या दरांव्यतीरिक्त असेल. प्रती प्रमाणपत्र हा आकार रु. ५/- इतका असेल.
१३. सदरच्या कामाकरीता स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ही पध्दत काय आहे. आपण आणलेली सेवा ही सभागृहाच्या निम्म्या सदस्यांना ही योजना काय आहे ते कळले पाहीजे. आता मॅडमनी वाचल की २५.००० लोकसंख्येवर आम्ही एक किऑस्क बसवणार आहोत. आणि त्यांनी सुधारणा केली की १५,००० लोकसंख्येवर एक बसवणार आहेत. सध्याच्या वॉर्ड व्यवस्थेमध्ये कुठल्याही वॉर्डमध्ये ४ ते ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या नाही. तर ह्या पध्दतीबद्दल सभागृहाला माहीती द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, ही महत्वाची आणि गंभीर बाब आहे. ठराव पास होतात. इम्प्लीमेन्टेशन होतं नाही होते तो भाग निराळा आहे. गेल्या मिटींगला हा विषय होता. त्याच्यावर आपण काय कारवाई केली. कारण आर्थिक बाजू आहे. गेल्या वेळेला मिटींगमध्ये ज्या विषयावर काय निर्णय झाला त्यावरती प्रशासनाने महापालिकेची आर्थिक बाजू सबळ करण्याकरिता काय-काय कारवाई केली त्याची माहीती द्यावी. पहिली गेल्या मिटींगची आणि मग ह्या मिटींगची.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्याच्यामध्ये काय फ्रॉड झाला तर आपल्याला कसा टॅप करायला मिळेल. एल.बी.टी. चा टॅक्स वसुल केला. दोन ह्याची बिलच बनवली नाहीत आणि बिलाचे रोकडे पैसे घेतले तर आपण ते कस टॅप करू शकतो त्याची बॅक गॅरन्टी घ्या.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो. हा जो विषय आलेला आहे. हा विषय ह्यापूर्वी सभागृहात मांडण्यात आला होता. त्यावर सभेमध्ये चर्चा झाली होती. त्यामध्ये मुख्य मुद्दा दरा संदर्भातला होता. आणि ते जे दर प्रशासनाकडून सुचवण्यात आलेले आहेत. त्याला सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. हे पुन्हा री फॉर्म करण्यात आले आहेत ते २,००० रूपयापर्यंत अर्धा टक्का आणि २,००० वरील रकमेत २५ रूपये असा फ्लॅट रेट आहे. आणि जन्म, मृत्यु दाखले सुविधा करीता महापालिकेने घ्यायच्या चार्ज व्यतिरिक्त पाच रूपये प्रतिप्रमाणात त्या फ्रेंचायसीने घ्यायचे. सन्मा. मिलन पाटील साहेबांनी जी शंका मांडली. त्याच्यामध्ये हा पेमेन्ट त्यांना रिसीव्ह करायचा आहे तो प्रिपेड पध्दतीने म्हणजे त्यांनी विशिष्ट रक्कम ती महानगरपालिकेकडे डिपॉझीट करायचे आहे. त्याचा त्यांना कोड देण्यात येईल. आणि त्या रकमेची वसुली झाली की ते प्रिपेड कार्ड संपुष्टात येईल. ते पुन्हा भरावे लागेल. तेवढी रक्कम वसुल झाली की त्या कोडची व्याप्ती संपली आणि मग पुन्हा त्याला प्रिपेड कार्डसाठी रिव्हॅलिडीटेशन करावे लागेल.

**मिलन पाटील :-**

साहेब हा तुमचा मुद्दा वेगळा आहे. आज जर त्यांनी तुमच्याकडे ५ लाख रू. भरले. पाच लाख त्याने वसुली केली. तर पुन्हा तुम्ही त्यांना ते पाच लाख रूपये डिपॉझीट परत देणार आहेत. पण त्यांनी पाच लाख भरून सहा लाख वसुल केले ते तुम्हाला माहीत कस पडणार?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ही ऑनलाईन पेमेंन्ट सुविधा आहे. म्हणजे त्यांनी जे काय वसुल करणार आहेत. त्याची माहीती महानरपालिकेला त्वरीत मिळेल. आणि त्याला जो कोड दिला ह्याचे पाच लाख रूपये ज्याक्षणी संपतील त्यानंतर त्याचे ॲक्टीवेशन संपणार. आणि कोड पुन्हा रिॲक्टीवेट करता येणार नाही. आणि फ्रॉड होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**मिलन पाटील :-**

नाही कसा होत मी सांगतो तुम्हाला कसा होईल तो. आज तुम्ही त्याच कार्ड बंद केल. आता त्या फॅक्टरीवाल्यांना काय माहीत आहे. ते बफींगवाले आहेत. त्यांना काय माहित आहे. अनाडी माणूस आहे. उदा. दुधवाला कसा आपल्याकडे एकच येतो. आपण समजतो, की ह्याला कॉन्ट्रॅक्ट दिलेल आहे ही हयाची माणस येतात. हे काम बंद झाल्यानंतर त्याचीच माणस वसूल करायला येतील ते तुम्हाला कस कळणार आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी जी रक्कम जमा केली आहे त्याची रक्कम संपल्यानंतर त्याचा डेटा एक्ससरीज सुविधा नसणार म्हणजे ते कोणतीही पावती देऊ शकणार नाही. त्यांना कोणतीही माहिती पडणार नाही. त्याच कम्प्यूटर तेव्हा बंद होणार.

**मिलन पाटील :-**

त्यांनी डयूप्लीकेट पावत्या छापल्या आणि कंपनीवाल्यांना दिल्यातर त्यांना काय कळणार.

**मा. आयुक्त :-**

तस तर कधीही होऊ शकते. बॅकेमध्ये पण होऊ शकते. ही प्रीपेड सिस्टम आहे. समजा एक लाख रूपये जमा करणार एक लाखापर्यत जितके बिल माझ्याकडे येणार ते मी जमा करू शकतो माझे एक लाख रूपये संपले की माझ कम्प्यूटर बंद होणार.

**मिलन पाटील :-**

हयाच्यात भरपूर चोरी होऊ शकते.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ऑक्ट्रॉयच्या ठेकेदारामध्ये त्यांनी विझीलाईन्स टीसी टाईप माणसे ठेवली आहेत. चोऱ्या सगळीकडे होतात. पण आपल्याला काही टॅप करून काही पर्टीक्यूलर स्पेसिफिक जे मोठे व्यापारी आहेत पाटील साहेब जस बोलले त्याप्रमाणे आपल्याला कुठून तरी चोरी पकडायला पाहिजे हे ऑनलाईन आहे हे मला मान्य आहे.

**मा. आयुक्त :-**

हे एक ऑप्शन आहे. ज्यांना भरायचा आहे ते भरू शकतात नाही तर ते महापालिकेच्या ऑफीस मध्ये घेऊन भरू शकतात. दोन्ही पर्याय आहेत. किऑस्क मध्ये किंवा महापालिकेच्या ऑफिसमध्ये येऊन भरा.

**मिलन म्हात्रे :-**

जे चोरी करतात त्यांचे बोलतो.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्यावर पोलिस कारवाई करेल.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे पकडून पोलिसांना दिल तर. मागे दोन वर्षापूर्वी एकदा पावती बुक, बिल बुक आपल्या कॉर्पोरेशननी पकडली होती.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये पावती ऑनलाईन निघणार आहे. लेखी पावती म्हणजे हस्त लिखीत पावती नसणार. कम्प्युटरवरून प्रिंट आऊट निघणार.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपल्या ऑनलाईन कम्प्युटरवर जे होते ना. सिस्टिम मॅनेजर त्या सस्पेंड झाल्या आहेत. त्यांची चौकशी चालू आहे. चोऱ्या होतात आपल्या इकडूनच सगळ चालू होते.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, ह्याच्यात एक सुचना राहिली त्याच्यामध्ये कोडींग सिस्टम ठेवा. येणाऱ्या माणसाला कोडींग असेल त्याची रक्कम संपली की त्याचा कोड जनरेट व्हायचा बंद होईल.

**शरद पाटील :-**

जे पालिकेत येऊन भरतील त्यांना कमिशन लागणार नाही ना?

**भगवती शर्मा :-**

ते पेमेन्ट एक्सेप्ट करतील ना?

**सुधीर राऊत :-**

सन्मा. ओमप्रकाश गाडोदिया ह्यांनी एक प्रश्न उपस्थित केला. त्याच्यामध्ये लोकसंख्येचा जो आहे त्याच्यामध्ये दोन ते तीन वॉर्ड मिळून एक किऑस्क असेल. मात्र ५१ आणि ६१ हे मोठे वॉर्ड आहेत. त्यांची लोकसंख्या आजच्या तारखेला सुध्दा ५५ ते ६० हजार आहे. तर त्या वॉर्डला दोन ते तीन किऑस्क असतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता सभागृहामध्ये चर्चा झाली ज्यांनी सी.एफ.सी.मध्ये स्वतः जाऊन पैसे भरले तर त्यांना कमिशन लागणार नाही. ह्याचा अर्थ आपण जी एजन्सी नेमणार आहोत तो ही वसुल करू शकतो. आणि महापालिका स्वतंत्र वसुल करणार आहे. ही शंका सन्मा. मिलन पाटील ह्यांनी उपस्थित केली. महापालिकेच्या इथे आपण जे पैसे भरणार आहोत. ते लोकांना काय वाटणार की आपण इथे भरतो. आणि तो डुप्लीकेट छापणार आणि महापालिकेत पैसे भरा आणि पैसे कमवून झाल्यावर पैसे कुठे वसूल करायचे ती पूर्ण सिस्टम ठेकेदारामध्ये असली पाहिजे. जर ही सिस्टम राबवणार असाल महानगरपालिका पण लावणार कमिशन लागणार नाही. आणि ठेकेदाराकडून लोकांची गफलत होण्याची शक्यता आहे. म्हणून ही पूर्ण सिस्टम तुम्ही ठेकेदाराला दयायला पाहिजे किंवा महापालिकेने राबवली पाहिजे अस केल तर नक्कीच ...............

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

तस काय असणार नाही आपल्याला सिस्टमच राबवायला लागेल.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर ) :-**

प्रकरण क्र.६६ चा ठराव मंजुर झालेला आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल पेमेंट किऑस्क प्रकल्पाद्वारे मालमत्ता कर, पाणीपट्टी कर व स्थानिक संस्था कर वसुली कार्यपध्दती राबविणेबाबत.

**ठराव क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका संगणक विभागामार्फत मालमत्ता कर, पाणीपट्टी कर वसुली इ. करवसुलीची कार्यवाही महानगरपालिकेच्या विविध वसुली क्षेत्रातील कार्यालये व प्रभाग कार्यालयांतून करण्यात येते. त्यापैकी प्रभाग कार्यालय क्र. २, ३, व ४ रेडिओ फ्रिक्वेन्सी डिवाईस मार्फत संगणकीय आज्ञावलीशी

जोडलेले आहेत. सदर कार्यालयांतून संगणकाद्वारे वसुली करुन नागरीकांना संगणकीकृत पावत्या देण्यात येतात.

परंतु प्रभाग कार्यालय १ व ग्रामीण भाग जसे चेणे, वर्सावे, उत्तन, डोंगरी, राई, मुर्धे इ. ठिकाणी आजतागायत संगणकीकृत वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करता आले नाही. करिता मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे किओस्क (KIOSK) प्रणाली यंत्रणा राबविणेकरिता प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवण्यात आला. सदर यंत्रणा राबविणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही या टिप्पणी व्दारे प्रस्तुत करण्यात येत आहे.

१. Franchisee ने नोंदणी करणेकामी त्यांचेकडुन एक रकमी नोंदणी फी वसुल करण्यात येईल.
२. महानगरपालिका सदर प्रणाली कार्यान्वित करणे करीता Franchisee अधिकृत करेल.
३. सदर Franchisee कडून प्रथम टप्प्यामध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुली करणेत येईल.
४. सदरची KIOSK ची संख्या ही एकुण प्रभागाची (वॉर्ड) जनसंख्या व त्याचे एकुण क्षेत्रफळ यावर आधारित राहील.
५. सदर यंत्रणा राबविणेकरिता अधिकृत करण्यात आलेल्या Franchisee कडे कमीत कमी एक संगणक, इंटरनेट सुविधा व एक प्रिंटर यांची आवश्यकता आहे. तसेच स्वतःची जागा असणे आवश्यक राहील. परंतु Franchisee कडे स्वतःचा दुकानगाळा असेल तर अस्तित्वातील दुकानगाळ्यात देखील सदर Setup करता येईल.
६. सदर यंत्रणा राबविणेकरिता अधिकृत करण्यात आलेल्या Franchisee करीता महानगरपालिकेव्दारे स्वतंत्र लॉगीन आयडी ची सोय करुन देण्यात येईल. पासवर्ड सुरक्षिततेची जबाबदारी त्याची स्वतःची राहील.
७. याकरीता सदर Franchisee महापालिकेकडे अनामत रक्कम जमा करेल.
८. याकरीता सदर Franchisee ला प्रत्येक बीलाच्या रु. २००० पर्यंत रकमेवर ०.५ % सेवा आकार व रु. २००० चे वरील रकमेवर रु. २५ इतका सेवा आकार थेट देयक भरणाऱ्याकडून घेता येईल.
९. Franchisee ने जमा केलेल्या अनामत रकमेतून त्यांचेजवळ जमा झालेली कराची रक्कम संगणक प्रणालीद्वारे वजा होईल व प्रत्येक वेळेस वसुल करावयाचे रकमेपोटी आगाऊ अनामत रक्कम जमा करणे अभिकर्त्यास बंधनकारक राहील.
१०. वॉर्ड किंवा वॉर्डच्या समुहाची लोकसंख्या १५००० वा त्याहून जास्त असेल अशा ठिकाणी दोन KIOSK प्रस्तावित केले जातील. भौगोलिक दृष्ट्या सलग वॉर्डची १५००० लोकसंख्येपर्यंत एक KIOSK प्रस्तावित करण्यात येत आहे.
११. Franchisee कडे जमा होणाऱ्या कराचा भरणा हा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन (ONLINE PAYMENT) प्रणालीशी निगडीत असेल. याकरीता सध्या अचल (STATIC) असलेले महानगरपालिकेचे संकेतस्थळ हे चल (DYNAMIC) स्वरुपात करणे आवश्यक आहे.
१२. कर भरणा व्यतिरीक्त जन्म व मृत्यू दाखले च अन्य सुविधांकरीता Franchisee व्दारे माफक सेवा आकार घेणेत येईल. हा आकार महानगरपालिकेने विहीत केलेल्या दरांव्यतीरिक्त असेल. प्रती प्रमाणपत्र हा आकार रु. ५/- इतका असेल.
१३. सदरच्या कामाकरीता स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, सार्व. जागा व मोकळ्या जागेच्या व्यवसायीक वापर होत असल्याने त्यावर कर आकारणी करणेसाठी वार्षिक भाडे मुल्य दरास फेर विचार होणे बाबत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हया मिटींगमधील आपल्या हया प्रोसिंडीगला मंजुरी दिली. संदर्भिय विषयाला अनुषंगाने आपल्याला पान क्र. १५ पहिली प्रोसिडिंग त्याच्यामध्ये हा विषय मागच्य वेळेला चर्चीला गेला होता. त्यात महत्वाच म्हणजे त्यात आम्ही काय सुचना केल्या होत्या प्रोसिडिंगला सुचना आहेत त्याला पाच सहा महिने झाले. प्रोसिडिंग हा विषय सोडून दया परंतु काय केल पाहिजे. मा. आयुक्त साहेब आपल्याकडून मला जास्त अपेक्षा आहेत. कारण या शहराला चांगली शिस्त लागली पाहिजे मी कधीही महापालिकेला आर्थिक नुकसान होईल अस मी बोलत नाही. जी काय वाढ करायची ती तुम्ही करा नियमानुसार करा आमचा त्याला सपोट आहे. त्याकरिता हया पॅरेग्राफमध्ये काही सुचना दिल्या होत्या. आणि विधी अधिकारी आहेत त्यांना

सुप्रिम कोर्टाच जजमेन्ट दिल होत. हया प्रोसिडिंगच्या अनुषंगाने मी ज्या सुचना केल्या आहेत त्याच्यात सुप्रिम कोर्टाच जजमेन्ट करून मेन्शन पण आहे. कॉपी दिलेली आहे. त्यानुसार हया ठिकाणाचे जे बिल्डर आहेत त्याच्यावर आपल्याला शास्ती लावायाची आहे. त्या सुचनामध्ये ते बसतात का बघा. जजमेन्ट सुध्दा नेटवर आहे. त्यानुसार त्याच्यावर कारवाई करा. मला कोणाची बाजू घ्यायची नाही ज्याने चूक केली आहे त्यांनी शास्ती भरायची आहे. ऑक्ट्रॉयमध्ये साहेब आम्ही १०० रू. भरून आणलेले आहेत. त्याकरीता आम्ही करतो आम्ही भरतो. त्याकरिता काही सुचना केल्या त्याला सहा महीने झाले. दि. ३०/५/२०११ च्या मिटींगमध्ये मी सुचना केल्या. आता आपण १० व्या महिन्यात आहोत ५ महिने झाले. ह्याच्यावर प्रशासनाने काय कारवाई केली. ॲज पर रूल वैगेरे सुप्रिम कोर्टाच्या जजमेन्ट नुसार महापालिकेने काय करावे ते नाही. परंतु बिल्डर लोकांनी त्या कस्टमर लोकांबरोबर काय करावे ते दिलेले आहे. त्याचे जरा इम्पलीमेन्टेशन करावे.

**अनिल सावंत :-**

मा. पिठासीन अधिकारी हा जो ६७ नंबरचा प्रस्ताव आलेला आहे. मला वाटते प्रशासनाने असा इन्डीव्यूजवल प्रस्ताव आणायची गरजच नव्हती. कारण हे अप्लीकेबल होणार आहे. दि. १/०४/२०१२ पासून आणि एखादा टॅक्स जर वाढवायचा असेल तर तो आपण बजेटमध्ये वाढवतो. सन २०१२-१३ चे बजेट अजून यायच आहे. त्यामुळे माझ्या मते प्रशासनाने हा प्रस्ताव मागे घ्यावा. आणि जी काही वाढ करायची असेल ती आपण बजेटमध्ये करतोच. त्यामुळे इन्डीव्ह्युज्वल हा विषय आणायची गरजच नव्हती.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय दीड वर्षापासून येतो आहे. सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता जेव्हा महापौर साो., होते तेव्हापासून आपण आहात कुठे?

**अनिल सावंत :-**

कूठला विषय?

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय येतोय मोकळ्या जागेवरचा विषय दोन कमिशनर बदलले. मा. सुदाम गायकवाड, मा. शिवमुर्ती नाईक.

**अनिल सावंत :-**

नाही तो वेगळा विषय हा वेगळा विषय. ठराव काढून बघा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हीच ठराव बघा. तुम्हीच त्याच्यावर ठराव केला आहे.

**एस.ए.खान :-**

साहेब सर्व्हे करायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

करवाढ करु पण ती बजेटमध्ये करु.

**मिलन म्हात्रे :-**

शाब्दिक मारामारी करुन त्याच्यातली क्रिया बदलत नाही. ती करायलाच लागते.

**मा. आयुक्त :-**

विषयाला मंजुर करा अशी विनंती राहील. कारण तुम्ही मंजुर केल्यानंतर टॅक्स २०१२ पासूनच लागू होणार.

**मिलन म्हात्रे :-**

मंजुरीला विरोध नाही. तुम्ही इम्प्लीमेन्टेशन करावे अशी सुचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब हा जो विषय आणलेला आहे. सर्वप्रथम हा विषय दि. ०१/११/२००७ साली आला. प्रकरण क्र. ९ त्यावेळी प्रशासनाने पूर्ण टिप्पणी दिली नाही म्हणून त्याच्यामध्ये मोकळ्या जागेच जी व्याख्या असली पाहिजे ती व्याख्येच्या उल्लेख झालेला नव्हता. नंतर हा ठराव पून्हा दि. २०/०२/२००८ साली आलेला आहे. आणि तो ठराव संमत झालेला आहे. त्याचा उल्लेख आता जो प्रशासनाने दिलेला गोषवारा त्याच्यामध्ये आहे. परंतु त्याच्यामध्ये एकाच गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. तो स्केवअर फिटचा उल्लेख केलेला आहे. खर तर त्या ठरावाला वेगळी गोष्ट आहे. हा जो आपण २००८ चा ठराव वाचला त्यामध्ये हॉटेल, लॉजींग बोर्डींग, हॉल, मंगल कार्यालय ह्यांना त्या ठरावांमध्ये पाच रुपये चौरस फूट वार्षिक प्रस्तावित केले होते. आणि हॉटेल, सार्वजनिक हॉल मंगल कार्यालय, लॉज मोकळ्या जागा आणि अन्य व्यवसायिक वापराच्या जागेला आपण एक रूपया ठेवला होता. आणि जे हॉटेल लॉजींग, बोर्डींग आहेत त्याचे दोन भाग केले होते. जे आर.सी.सी. बांधल आहे. लिगल आहे की इनलिगल आहे. जे आर.सी.सी. आहे त्याला आपण पाच रू. आणि जे पत्राच शेड आहे त्याला आपण चार रू. दर निश्चित केले होते. त्या ठरावाचा उल्लेख केलेला आहे. कारण आतापर्यंत ह्या ठरावामध्ये २००८ पासून २०११ पर्यंतच कुठलही इम्प्लीमेन्टेशन झाले नाही. मी माहीतीच्या अधिकारामध्ये हा प्रश्न विचारला होता की, प्रशासनाने ह्या ठरावाच्या अनुषंगाने किती पैसे गोळा केले. प्रशासनाकडून माहीती आली एकही पैसा गोळा केलेला नाही. म्हणजे २००८ साली आपण मोकळ्या जागेचा कर म्हणजे त्यामध्ये येण

झालेलच नाही. आणि अस होतच २००८ ते २०११ ह्या चार वर्षामध्ये ४० कोटी अर्थसंकल्पाच्या आधाराने वसुल झाले पाहिजे होते. किमान २००९ ते २०१० मध्ये एकही रूपया त्या अर्थसंकल्पामध्ये वसुल झालेला नाही. ह्याचा अर्थ प्रशासनाने जे अधिकारी होते त्यांनी ह्या ठरावावर दुर्लक्ष केले. आज पुन्हा मा. आयुक्त साहेब हा ठराव आणतात. आपली आपुलकी आहे की, शहरात पाणी आल पाहीजे, शहरात नविन योजना आली पाहीजे म्हणून आपण एक रूपयाचे १० रूपये केले. त्यामध्ये वाढ होणे किंवा कमी होणे हा महासभेचा विषय आहे. पण २००८ साली ठराव पास झाला. परंतु २००८ ते २०११ पर्यंत प्रशासनाने एक रूपयाही वसुल केलेला नाही. अर्थ संकल्पाची बाजू पकडली तर आज ३० कोटीच नुकसान महापालिकेला झाल आहे. मागच्यावेळेला हा विषय आला त्यावेळी मा. आयुक्त साहेब आपण सक्ती केली आणि हॉटेल मालकांना नोटीसा काढल्या तेव्हा काही लोकांनी पैसे भरले. आणि खुल्या जागा जे बोललो त्या टिप्पणीचा उल्लेख झाला पाहीजे होता नाही झाला म्हणून खुली जागा एन.ए. झालेली जागा पण बांधकाम झाल नाही. किंवा बांधकाम होते पण भोगवटा दाखला घेतला नाही. ह्या दोन्ही विषयाबद्दल प्रशासनाने................

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ओमप्रकाशजी आपला विषय आणि ह्या विषयामध्ये फरक आहे.

**शरद पाटील :-**

मोकळ्या जागा म्हणजे काय.

**मिलन म्हात्रे :-**

मोकळ्या जागा म्हणजे काय? आता तुम्ही ग्रिन कोर्ट क्लबला गेले की, आतला हॉल निराळ भाडे, ओपन हॉल निराळे भाडे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

या संबंधात संबंधीत अधिकारी माहीती देतात.

**मिलन म्हात्रे :-**

वसुली झालेले नाही. अधिकारी काय माहीती देणार? तुम्ही लोकांनी २००८ ला ठराव पास केले आहेत. इम्पलीमेन्टेशन काहीच नाही. वसुली काहीच नाही. ठरावाला पैसे घेतात. आयुक्त साहेब, प्रत्येक लग्नाला मोकळ्या ग्राऊंडला लाखात भाडे घेतात आणि तुम्हाला हजाराने देत नाहीत.

**दिपक सावंत :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य ओमप्रकाश गरोडिया ह्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. ह्याच्यात दोन विषय आहेत. मोकळ्या जागेचा कमर्शियल युज हा एक विषय आहे. आणि दुसरा विषय ज्या मोकळ्या जागेवर आपण बांधकाम करतो. तो दुसरा विषय आहे. आपण जो मोकळ्या जागेचा विषय काढला तो २००८ पासून आपण मोकळ्या जागेवरती बांधकाम परमिशन दिल्यापासून..............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी त्या विषयाचा उल्लेख केलाच नाही. हा जो तुम्ही आणला त्याचा उल्लेख करतो. मी ठराव दिला आहे ना?

**अनिल सावंत :-**

त्यांचा एन.ए.फ्लॉटचा विषय आहे. हा व्यवसायिक वापर आहे.

**दिपक सावंत :-**

व्यवसायिक वापरच्या बाबतीत प्रभाग क्र. ३ ची जी वसुली आहे. तुम्ही म्हटल काही वसुली नाही. ती वसुली त्या संबंधीत विभागाकडून घेतली आहे. दोन लाख ऐंशी हजार रूपये वसुल केले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठल्या वर्षात.

**दिपक सावंत :-**

चालू वर्षामध्ये रिपोर्ट घेतले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी मागच्या वर्षाच सांगतो. आता तुम्ही वसुल केल असेल. मी मागच्या वर्षाच सांगतो.

**अनिल सावंत :-**

ठराव २००८ ला झाल आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा ठराव दि. २०/२/२००८ ला मंजुर झाला. दोन महिन्यांनी इतिवृत्तांला मंजुरी मिळाली. चवथ्या महिन्यापासून भाईंदर शहरामध्ये मोठे-मोठे मॅरेज हॉल आहेत त्याची जी ओपन ग्राऊन्ड आहेत. गवत लावल आहे. त्याच्यामध्ये मॅरेज हॉल, मॅरेज पार्ट्या, बँकेट हॉल आहेत. हे सगळे लाखात पैसे घेतात. मला तुम्ही हॉल वाईज नाव सांगा आणि तुम्ही तुमच्या नियमानुसार ठरावानुसार किती पैसे जमा केले. हजारात, शेकड्यात आणि लाखात ते सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दोन लाख हॉटेलवाल्याची रक्कम होणार आहे.

**प्रकाश दुबोले :-**

सावंत साहेब, तो आपल्या नाट्यगृहाच रिझर्व्हेशन आहे. त्या ठिकाणी गेल्या चार ते पाच वर्षापासून आनंद मेळावा भरतो. तसा तो मनोरंजन करायचा त्याच्याकडून टॅक्स वसुल होत नाही. ओपनचा असाही होत नाही. त्यासाठी तक्रार केली आणि तुम्ही सर्व्हे केला परंतु त्याच्याकडून अजून कर घेतला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या सुचना आम्ही त्या ठरावात केलेल्या होत्या. ठराव काढा प्रोसेडिंग काढा. मा. आयुक्त साहेब ह्या विषयावर बसून विचार करा. राजकारण नाही. तुम्हाला ठराव करून दिला आहे तर वसुली तरी करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा ठराव जो तुम्ही आणलेला आहे तो २००८ ला ठराव झालेला आहे. ही ठरावाची कॉपी घ्या. खुली जागा हा वेगळा विषय आहे. खुल्या जागेला मान्यताच नाही.

**प्रभात पाटील :-**

महानगरपालिका हद्दीत मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी मिरा-भाईंदर शहरामध्ये ६ विभाग करण्यांत आले असून मालमत्ता, इमारतीच्या प्रकारानुसार भाडेमूल्याचे दर मा. महासभा ठराव क्र. ४३ दि. २१/०८/२००६ अन्वये मंजूर दर निश्चित करण्यांत आलेले आहेत. (सोबत ठराव प्रत) महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढविण्याच्या दृष्टीने ज्या मोकळया जागांचा व्यावसायीक वापर होत आहे व अन्य व्यावसायीक वापर करीत असलेल्या मोकळया जागेवर कर आकारणी करण्याच्या दृष्टीने वार्षीक भाडेमूल्याचे सुधारीत दर (वाढीव) निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव व मा. महासभा प्रकरण क्र. २८ दि. २०/०२/२००८ रोजी विचारार्थ ठेवणेत आले असता ठराव क्र. २७ दि. २०/०२/२००८ अन्वये खालीलप्रमाणे वार्षिक भाडेमूल्य सुधारीत दरास मंजूरी देण्यांत आली आहे. (सोबत ठराव प्रत)

तथापी महानगरपालिकेने विविध विकास कामांकरीता कर्ज घेतले असून सदर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. व बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे डी.पी.आर. मंजूर होण्यापूर्वी केंद्र शासन व राज्य शासन महानगरपालिका यांच्यात त्रिपक्षीय समंजस्य करार (एम.ओ.यु.) झालेले आहेत. त्यात कराधान पद्धतीत सुधारणा करण्याचा अटीचा समावेश आहे. त्यामुळे वरील ठरावानुसार व्यावसायीक वापरातील मोकळया जागांकरीता निश्चित करण्यांत आलेल्या दरात सुधारणा करणे गरजेचे असून सदर दरात रु. १.०० प्र.चौ.फु. ऐवजी रु. ५/- प्र.चौ.फु. एवढी वाढ केल्यास याव्दारे महानगपालिकेस चांगले उत्पन्न मिळु शकेल.

| अ. क्र. | मालमत्तेचा तपशिल | वार्षिक भाडे मुल्याकरीता सध्याचे मंजूर दर (प्र. चौ. फु., प्र. महिना) | प्रस्तावित करावयाचे दर (प्र. चौ. फु., प्र. महिना) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्व. जागा, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या जागा. | रु. १.०० प्र. चौ. फुट | रु. ५.०० प्र.चौ.फु. |

वरील प्रमाणे (कॉलम ४ नूसार) भाडेमूल्याच्या दरास ही सभा मंजूरी देत आहे. ही वाढ २०१२ पासून लागू करण्यात येईल.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्यावर माझी सुचना आहे. प्रशासनाने महासभा ठराव क्र. २७ दि. २०/०२/२००८ ला जो निर्णय झाला आहे. आणि आमच्या ज्या सुचना केल्या आहेत. त्या सुचनासह हा ठराव पास करावा. त्याच्या वर कारवाई का केली गेली नाही. आणि त्या अधिकाऱ्यावर मा. आयुक्तांनी कारवाई करावी अशी माझी सुचना आहे.

**भगवती शर्मा :-**

सुचना घेणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या सगळ्या सुचना चालतात का? नियमानुसार सचिवांनी नाही सांगावे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

ज्या मोकळ्या जागेवर व्यावसायीक वापर होत आहे व व्यावसायीक वापराकरीता असलेल्या मोकळ्या जागेवर प्रथम व्यावसायीक वापराकरीता महानगरपालिकेत परवाना, नाहरकत दाखला घेणे व ज्या मोकळ्या जागा मालकांना समाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यासाठी नोंदणीकृत संस्थांना वर्षातून किमान ५ वेळा मोफत दिल्यास व त्याबाबतचा पुरावा सादर केल्यास अशा जागेच्या वार्षिक रक्कमेतून ५ % सुट द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

सुचना देणे आमचे काम आहे. तुम्ही फेटाळा मा. महापौरांनी आम्ही जी पहिली सुचना सांगितली आहे ती बेकायदेशीर आहे का? महापालिकेचं आर्थिक नुकसान करणारी आहे का ते पहिले सांगावे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सभागृहाच्या बहुमतावर सुचना घेतली जाते आपली सुचना फेटाळायची की नाही तो मा. महापौरांचा अधिकार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना आर्थिक नुकसान करणारी असेल तर कारण सांगा आणि मग फेटाळा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, सुचना मान्य करत नसाल तर आमचा ठराव आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

दोन्ही सुचना फेटाळल्या आहेत.

**अनिल सावंत :-**

पहिली सुचना सांगितली आता ठराव होऊ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सुचनांचे कारण सांगा सुचना बेकायदेशीर कशी ते सांगा आणि मग फेटाळा.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

फेटाळली ह्याचा अर्थ बेकायदेशीर आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

फेटाळायला कारण द्यायला लागते.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

मा. महापौरांना फेटाळायचा अधिकार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकार आहे ना कारण द्या.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

कारण द्यायची गरज नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कोर्ट जेव्हा फाशी चढवते तेव्हा आरोपपत्र सुनावते आणि मग तेव्हा त्याला फाशी देते हा नियम आहे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ओमप्रकाश गारोडीया ह्याच्या ठरावावर आवाजी मतदान घ्या.

**भगवती शर्मा :-**

उन्होंने ठराव किया क्या? त्यांनी माईक वर सुचना केली की ठराव केला.

**आसिफ शेख :-**

पिठासीन अधिकारी साहेब, आता तुम्ही बोललात फेटाळली तर मग प्रश्न मिटला. पून्हा तुम्ही म्हणता आवाजी मतदान घ्या.

**भगवती शर्मा :-**

त्यांनी सुचना मांडली.

**आसिफ शेख :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ह्या शहरामध्ये धार्मिक आणि सामाजिक आयोजनासाठी कुठली जागा आहे. मा. महापौर असताना तुम्ही कशी रुलिंग देता.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

ह्या विषयाला मी पिठासीन अधिकारी होतो.

**एस.ए. खान :-**

मा. महापौर साहेब, २९/०९/२०११ रोजीचा अनुपालन अहवाल दिला आहे त्याच्यावर चर्चा कधी करणार? आपल्या दौऱ्याचं काय झाले?

**नगरसचिव :-**

प्रकरण ६७ करीता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील अनुमोदक सन्मा. आसिफ शेख दुसरा ठराव सन्मा. मदनसिंग अनुमोदक सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल.

**चंद्रकांत मोदी :-**

पहिली सुचना थी। ठराव कहाँ से आ गया।

**भगवती शर्मा :-**

त्यांनी सुचना मांडली होती.

**आसिफ शेख :-**

मला असे वाटते तुमचे डोके ठिकाणावर नाही.

**नगरसचिव :-**

मी पिठासीन अधिकारी सांगतील त्याप्रमाणे चालतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शब्द मागे घ्या.

**आसिफ शेख :-**

सचिव म्हणून तुमची जबाबदारी आहे की नाही?

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिका-याचं रुलिंग असते माझे रुलिंग नसते.

**आसिफ शेख :-**

नाही सचिव म्हणून तुमची जबाबदारी आहे. त्यांनी सांगितले आमची सुचना घ्या. सुचनासह ठराव मंजूर झाला.

**(सभागृहात गोंधळ)**

**शरद पाटील :-**

आम्ही बोललो सुचना घेत नसाल तर ठराव समजून घ्यायचा आमचा ठराव घ्या. मा. महापौर साहेब, पहिलं विरोधी पक्षनेत्यांनी त्याचा शब्द मागे घ्यायचा. सचिवांना डोकं नाही ह्याचा अर्थ काय? पिठासीन अधिका-यांनी मतदान घ्यायचा आदेश दिल्यावर खालून सांगतात मतदान घ्यायचं नाही ह्याचा अर्थ काय?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही सुचना मांडली.

**शरद पाटील :-**

आम्ही लिहून दिले आहे ठराव मांडला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

आमचा ठराव घ्या असे म्हटलं आम्ही. तुम्ही नाही म्हटल्यावर आम्ही ठराव करुन दिला. त्याच्यावर ठराव लिहून दिला. नंतर लिहिलेला नाही.

**मा. महापौर :-**

एका ह्याच्यावर दोन विषय लिहिले आहेत. पहिली सुचना घ्या.

**शरद पाटील :-**

तुम्ही सुचना घेणार नाही असे बोलल्यावर आम्ही ठराव लिहिला ठराव करतो असे बोललो.

**मा. महापौर :-**

सुचनामध्ये ठराव कसा करु शकतो.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, चार सदस्य मागणी करतात.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

सुचना फेटाळल्यानंतर................

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही ठराव दिला आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, ह्याच्यात कितीतरी करोडोचे हिसाब आहेत ते तुम्ही खोडून देता आणि सांगता टायपिंग मिस्टेक, प्रिंटींग मिस्टेक त्याच्यावर ठराव लिहून दिला ह्या प्रोसिडींगमध्ये किती मिस्टेक असतात. तुमच्या विषयामध्ये किती मिस्टेक असतात. सचिव साहेब, आम्ही चार जण मतदानाची मागणी करतो.

**मा. महापौर :-**

सुचना फेटाळली आहे.

**शरद पाटील :-**

आम्ही सुचना नाही ठराव केला आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब, विषय घ्या.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

जेवणाची सुट्टी जाहीर करतो.

**अनिल सांवत :-**

मा. महापौर साहेब २९ सप्टेंबरचा महासभेचा अनुपालन अहवाल आलेला आहे. तर त्याच्यावर चर्चा सर्व विषय संपल्यावर करायची. म्हणजे ‘ज’ चे प्रस्ताव झाल्यावर की नंबर ‘ज’ च्या अगोदर..............

**एस.ए.खान :-**

ज्याच्यात आपण दौऱ्याच पण केल होत त्याच काय?

**प्रभात पाटील :-**

मागच्या महासभेमध्ये नगरसेवकाच्या प्रशिक्षण दौऱ्याच्या संदर्भात एक ठराव झालेला होता. मग तो लिहीला पण नाही आणि त्याच काय करायच.

**नगरसचिव :-**

ती प्रोसेस आता सुरू झाली आहे.

**प्रभात पाटील :-**

सभागृहाला माहीती द्या.

**नगरसचिव :-**

प्रस्ताव मा. आयुक्तांकडे पाठवायचा आहे.

**प्रभात पाटील :-**

पाठवायचा आहे. पाठवला नाही.

**नगरसचिव :-**

ठराव नाही. रिपोर्टसह पाठवायचा आहे.

**प्रकरण क्र. ६७ :-**

सार्व. जागा व मोकळ्या जागेच्या व्यवसायीक वापर होत असल्याने त्यावर कर आकारणी करणेसाठी वार्षिक भाडे मुल्य दरास फेर विचार होणे बाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

महानगरपालिका हद्दीत मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी मिरा-भाईंदर शहरामध्ये ६ विभाग करण्यांत आले असून मालमत्ता, इमारतीच्या प्रकारानुसार भाडेमूल्याचे दर मा. महासभा ठराव क्र. ४३ दि. २१/०८/२००६ अन्वये मंजूर दर निश्चित करण्यांत आलेले आहेत. (सोबत ठराव प्रत) महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढविण्याच्या दृष्टीने ज्या मोकळया जागाांचा व्यावसायीक वापर होत आहे व अन्य व्यावसायीक वापर करीत असलेल्या मोकळया जागेवर कर आकारणी करण्याच्या दृष्टीने वार्षीक भाडेमूल्याचे सुधारीत दर (वाढीव) निश्चित करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव व मा. महासभा प्रकरण क्र. २८ दि. २०/०२/२००८ रोजी विचारार्थ ठेवणेत आले असता ठराव क्र. २७ दि. २०/०२/२००८ अन्वये खालीलप्रमाणे वार्षिक भाडेमूल्य सुधारीत दरास मंजूरी देण्यांत आली आहे. (सोबत ठराव प्रत)

तथापी महानगरपालिकेने विविध विकास कामांकरीता कर्ज घेतले असून सदर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. व बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे डी.पी.आर. मंजूर होण्यापूर्वी केंद्र शासन व राज्य शासन महानगरपालिका यांच्यात त्रिपक्षीय समंजस्य करार (एम.ओ.यु.) झालेले आहेत. त्यात कराधान पद्धतीत सुधारणा करण्याचा अटीचा समावेश आहे. त्यामुळे वरील ठरावानुसार व्यावसायीक वापरातील मोकळया जागांकरीता निश्चित करण्यांत आलेल्या दरात सुधारणा करणे गरजेचे असून सदर दरात रु. १.०० प्र.चौ.फु. ऐवजी रु. ५/- प्र.चौ.फु. एवढी वाढ केल्यास याव्दारे महानगपालिकेस चांगले उत्पन्न मिळु शकेल.

| **अ. क्र.** | **मालमत्तेचा तपशिल** | **वार्षिक भाडे मुल्याकरीता सध्याचे मंजूर दर (प्र. चौ. फु., प्र. महिना)** | **प्रस्तावित करावयाचे दर (प्र. चौ. फु., प्र. महिना)** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **१** | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्व. जागा, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या जागा. | रु. १.०० प्र. चौ. फुट | रु. ५.०० प्र.चौ.फु. |

वरील प्रमाणे (कॉलम ४ नूसार) भाडेमूल्याच्या दरास ही सभा मंजूरी देत आहे. ही वाढ २०१२ पासून लागू करण्यात येईल.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८, मिरा भाईंदर महानगरपालिकेस ''अतिरिक्त आयुक्त'' पद मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणे बाबत.

**प्रभात पाटील :-**

दि. ४ मे २००६ शासन निर्णयान्वये शासनाने महानगरपालिकेकरीता आकृतीबंध निश्चित केलेला आहे. त्या आकृतीबंधानुसार फक्त ''ब'' आणि ''क'' वर्ग महानगरपालिकांसाठी ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद समाविष्ठ आहे. तर ''ड'' वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद समाविष्ठ नाही.

महानगरपालिकेत शासनाच्या विविध योजना, विविध प्रकल्प राबविणे जात असून त्या अंतर्गत सुधार कार्यक्रमही राबविले जातात. या प्रकल्पांची योग्य रितीने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्तांना पार पाडावी लागते. तसेच केंद्रशासन / राज्यशासन मार्फत विविध योजनेअंतर्गत महानगरपालिकांना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी योग्य रीतीने व वेळेत करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्तांची आहे. तसेच या प्रकल्पांअंतर्गत केंद्रशासन / राज्यशासन स्तरावर होणाऱ्या बैठकांना आयुक्तांना हजर रहावे लागते. अशावेळी महानगरपालिकेची दैनंदिन विविध कामे पार पाडण्यासाठी आयुक्तांना कामकाजास मदतनीस /सहाय्यक म्हणून अतिरिक्त आयुक्त दर्जाच्या वरीष्ठ अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. तसेच आयुक्तांचे रजा कालावधीत सुध्दा अतिरिक्त कार्यभार देताना अडचणीचे होते म्हणून या महापालिकेत सुध्दा अतिरिक्त आयुक्त पद निर्माण होणे आवश्यक आहे.

अतिरिक्त आयुक्त पद महानगरपालिका आस्थापनेवर मंजुर करणेबाबत शासन निर्णय क्र. एमसीओ१२११/प्र.क्र.१४/नवि-१४, दि. २८ मार्च २०११ अन्वये ''ड'' वर्ग महानगरपालिकेच्या आकृतीबंधात समाविष्ठ करण्यात आले आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पुढील नमुद तपशिल प्रमाणे पद मंजुरीस मान्यता देण्यात येते.

| सेवा संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत | शैक्षणीक व इतर अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा (श्रेणी-१) | अतिरिक्त आयुक्त | प्रतिनियुक्तीने | शासन निर्णय क्र. संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४, दि. ४ मे २००६ नुसार शासनाच्या नगरविकास विभागाचा अधिकारी प्रतिनियुक्तीवर |

तरी शासन निर्णय दि. २८ मार्च २०११ अन्वये ''ड'' वर्ग महानगरपालिकेस अनुज्ञेय असलेले अतिरिक्त आयुक्त हे पद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सन २०११ मधील आस्थापना खर्च ३५ टक्के आहे. ''अतिरिक्त आयुक्त'' या पदासाठी वार्षिक वेतनाचा खर्च रु. ५,७३,६२४/- एवढा होणार असून पद मंजुरीमुळे ०.०३ टक्के एवढा आस्थापना खर्चात वाढ होणार आहे. या वाढीव खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत असून पद मंजुरीचा प्रस्ताव शासनास पाठविणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, त्याचा खुलासा करावा की, गोषवाऱ्यात जो उल्लेख केलेला आहे की, आस्थापना ३५ टक्के आहे तो व्यवस्थित आहे का? कारण महासभेच्या वेळोवेळी चर्चेवर अस दिसून येते की आपल्या आस्थापनेचा खर्च ५० ते ५२ टक्के वर चाललेला आहे. त्यामुळे आपल्या हॉस्पीटलच काम रखडते नविन भरत्या होत नाही त्याचा खुलासा करावा.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, सन २०१०-११ चा आस्थापना खर्च ३५ टक्के पर्यंतच आहे. आणि म्हणून तो ३५ टक्के दिलेला आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मला आठवते की मागच्या टर्ममध्ये सन्मा. चंद्रकांत वैती हे विरोधी पक्षनेते का उपमहापौर होते. त्यांनी चर्चेमध्ये उल्लेख केलेला होता की, आपल्या आस्थापनाचा खर्च ५० टक्के वर चाललेला आहे. त्या कंट्रोल करा. ५० टक्के वरून ३५ टक्के वर काय खोळंबला. कमी झाला आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो हसण्याचा नाही. गोषवाऱ्यामध्ये काय चुक झाली असेल ती सुधरून घ्या. आपल्या मागे मुख्यलेखापरिक्षक बसले आहेत. त्याच्याकडून क्लियर करून चूक सुधारून टाका.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मी एवढच विचारतो की, ३५ टक्के दिल आहे ते चुकीने आले आहे की बरोबर आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) ) :-**

बराबेर आहे ते.

**मिलन म्हात्रे :-**

नगरपरिषदेच्या आस्थापनेचा खर्च ३५ टक्के नव्हता. ह्याच्यामध्ये तक्ता दिलेला आहे. मा. महापौर साहेब दरवेळेला आपल्याकडे चुकीचे तक्ते वैगेरे देऊन आणि पुढे भरत्या होतात. अनेक कोर्ट मॅटर झाले आहे. आता सध्या फायर ब्रिगेडच चालू आहे. ह्याच्यामध्ये नेमणुकीची पध्दत आणि टक्केवारी, नामनिर्देश पदोन्नती आणि प्रतिनियुक्ती तुमच्या गोषवा-यामध्ये ह्याठिकाणी अवर सचिव समकक्ष दर्जाच्या अधिका-यामधून नेमणूक करायची आहे. तुमच्या त्या कोष्टकामध्ये ते का नाही? खाली जो तक्ता दिला आहे त्याच्यात पाहीजे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस ''अतिरिक्त आयुक्त'' पद मंजुरीस व प्रस्ताव शासनास पाठविणे बाबत.

**ठराव क्र. ७२ :-**

दि. ४ मे २००६ शासन निर्णयान्वये शासनाने महानगरपालिकेकरीता आकृतीबंध निश्चित केलेला आहे. त्या आकृतीबंधानुसार फक्त ''ब'' आणि ''क'' वर्ग महानगरपालिकांसाठी ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद समाविष्ठ आहे. तर ''ड'' वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद समाविष्ठ नाही.

महानगरपालिकेत शासनाच्या विविध योजना, विविध प्रकल्प राबविणे जात असून त्या अंतर्गत सुधार कार्यक्रमही राबविले जातात. या प्रकल्पांची योग्य रितीने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्तांना पार पाडावी लागते. तसेच केंद्रशासन / राज्यशासन मार्फत विविध योजनेअंतर्गत महानगरपालिकांना निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी योग्य रीतीने व वेळेत करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्तांची आहे. तसेच या प्रकल्पांअंतर्गत केंद्रशासन / राज्यशासन स्तरावर होणा-या बैठकांना आयुक्तांना हजर रहावे लागते. अशावेळी महानगरपालिकेची दैनंदिन विविध कामे पार पाडण्यासाठी आयुक्तांना कामकाजास मदतनीस /सहाय्यक म्हणून अतिरिक्त आयुक्त दर्जाच्या वरीष्ठ अधिका-याची आवश्यकता आहे. तसेच आयुक्तांचे रजा कालावधीत सुध्दा अतिरिक्त कार्यभार देताना अडचणीचे होते म्हणून या महापालिकेत सुध्दा अतिरिक्त आयुक्त पद निर्माण होणे आवश्यक आहे.

अतिरिक्त आयुक्त पद महानगरपालिका आस्थापनेवर मंजुर करणेबाबत शासन निर्णय क्र. एमसीओ१२११/प्र.क्र.१४/नवि-१४, दि. २८ मार्च २०११ अन्वये ''ड'' वर्ग महानगरपालिकेच्या आकृतीबंधात समाविष्ठ करण्यात आले आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पुढील नमुद तपशिल प्रमाणे पद मंजुरीस मान्यता देण्यात येते.

| सेवा संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत | शैक्षणीक व इतर अर्हता |
|---|---|---|---|
| प्रशासकीय सेवा (श्रेणी-१) | अतिरिक्त आयुक्त | प्रतिनियुक्तीने | शासन निर्णय क्र. संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४, दि. ४ मे २००६ नुसार शासनाच्या नगरविकास विभागाचा अधिकारी प्रतिनियुक्तीवर |

तरी शासन निर्णय दि. २८ मार्च २०११ अन्वये ''ड'' वर्ग महानगरपालिकेस अनुज्ञेय असलेले अतिरिक्त आयुक्त हे पद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजुर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सन २०११ मधील आस्थापना खर्च ३५ टक्के आहे. ''अतिरिक्त आयुक्त'' या पदासाठी वार्षिक वेतनाचा खर्च रु. ५,७३,६२४/- एवढा होणार असून पद मंजुरीमुळे ०.०३ टक्के एवढा आस्थापना खर्चात वाढ होणार आहे. या वाढीव खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत असून पद मंजुरीचा प्रस्ताव शासनास पाठविणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी संदर्भिय पत्रान्वये अग्निशमन सेवेसाठी फी आकारणे, आग सुरक्षा निधी चालु करणे व पदनिर्मिती करणे याबाबत प्रस्ताव मागविला आहे.

मा. महासभा दि. १७/०३/२००७ प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. ९३ अन्वये अग्निशमन सेवेसाठी फी आकारण्यात येते तसेच आग सुरक्षा निधी नावाने स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे.

सद्यःस्थितीत सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता आवश्यक वाहनांचा तपशिल पुढील प्रमाणे

**तक्ता "अ" :-**

| वाहने | आवश्यक वाहने | उपलब्ध वाहने | तफावत |
|---|---|---|---|
| **फायर टेंडर** | ९ | ६ | ३ |
| **जीप** | २ | २ | - |
| **एकुण** | ११ | ०८ | ०३ |

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०, दि.३१/८/२००९ अन्वये आवश्यक अग्निशमन स्थानकांचा तपशील पुढीलप्रमाणे

**तक्ता "ब"**

| आवश्यक स्थानके | उपलब्ध स्थानके | तफावत |
|---|---|---|
| ५ | ३ | २ |

सद्यःस्थितीत सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये उपरोक्त नमुद तक्ता "अ" व "ब" नुसार आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचा तपशिल पुढील प्रमाणे

**तक्ता क्र. "क" (तक्ता क्र. १ ते २)**

| अ. क्र. | पदाचे नाव | आवश्यक कर्मचारी | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | पदनिर्मीती करिता आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ | - | ०१ | - |
| २ | उप मुख्य / सहाय्यक अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ | ०१ | - | - |
| ३ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ५ (निवास व्यवस्था असल्यास) | ०३ | - | ०३ | ०२ |
| ४ | उप अग्निशमन अधिकारी | ५ (निवास व्यवस्था असल्यास) | ११ | ०९ | ०२ | - |
| ५ | प्रमुख अग्निशामक – विमोचक | ३० (२७ + १०%) | २० | १४ | ०६ | १० |
| ६ | चालक यंत्रचालक | ५९ (५४ + १०%) | २३ | १७ | ०६ | ३६ |
| ७ | चालक | ०७ (०६ + १०%) | - | - | - | ०७ |
| ८ | अग्निशामक – विमोचक | २१५ (१९५ + १०%) | ४६ | ४५ | ०१ | १६९ |
| | **एकुण** | **३२३** | **१०५** | **८६** | **१९** | **२२४** |

उपरोक्त तक्ता क्र. "ब" मध्ये नमुद केल्यानुसार ०२ अग्निशमन स्थानकांची तफावत निदर्शनास येत आहे. सदर पैकी आरक्षण क्र. १३२ व ॲमिनिटी ओपन स्पेस मौजे नवघर सर्वे क्र. ४३० पै, ४३१, ४३२, ४३३पै. या दोन ठिकाणी अग्निशमन स्थानके उभारणे प्रस्तावित आहेत. सदर बाबत आरक्षण क्र. १३२ मौजे भाईंदर तळ + १ पार्ट + २ मजले अग्निशमन इमारत बांधणेकामी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार रु. १,३२,१०,३०४/- एवढा खर्च अपेक्षित आहे. अग्निशमन स्थानकांच्या सदर नमुद खर्चाच्या रक्कमेच्या महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम (६५%) एवढी वार्षिक अंदाजपत्रकात तरतुद करावयाची आहे तसेच

महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील २० चौ.कि.मी. क्षेत्रात अग्निशमन सेवा मोफत उपलब्ध करुन द्यावयाची आहे तथापी वाणीज्य व औद्योगिक आस्थापनाकरीता मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दि.१७/०३/२००७ अन्वये अग्निशमन फि आकारणी करण्यास मान्यता असावी.

उपरोक्त तक्ता क्र. ‘‘क’’ मध्ये नमुद केल्यानुसार सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता व शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०, दि.३१/०८/२००९ अन्वये २२४ पदांची आवश्यकता आहे सन २०१०-११ या वर्षामध्ये अंदाजपत्रकानुसार तसेच लेखा विभागामधील माहितीनुसार रु.९८५.०६ लाख रक्कम जमा असून त्यापैकी रु. २१७.०० लाख एवढा खर्च झालेला आहे. तसेच सदर पदनिर्मितीकरिता जो काही खर्च होणार आहे तो अग्निशमन दलाकडून वसुल केला जाणाऱ्या महसुलातून केला जाणार आहे.

तरी वरील बाबी लक्षात घेता हि मा. महासभा

१) अंदाजपत्रकानुसार अग्निशमन स्थानक बांधणेकामी बांधकाम विभागामार्फत तयार केलेल्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.
२) सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात अग्निशमन स्थानक बांधण्याकरिता रु. १,३२,१०,३०४/- ऐवढया रक्कमेच्या ६५% ऐवढया रक्कमेची तरतुद करणेस मा. महासभा मंजुरी देत आहे.
३) महानगरपालिका हद्दीबाहेर २० चौ.की.मी. क्षेत्रात मोफत अग्निशमन सेवा उपलब्ध करुन देण्यास तसेच वाणिज्य व औद्योगिक तसेच रस्त्यावरील वाहन जळीत प्रसंगी मा. महासभा ठराव क्र. ९३ दि.१७/०३/२००७ नुसार अग्निशमन फि आकारणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.
४) गोषवाऱ्यात नमुद पदनिर्मीतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.
५) सोबत जोडलेल्या ठरावाच्या मसुद्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.
६) १०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर शासनास हमीपत्र लिहून देण्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

## ठरावाचा मसुदा

**विषय :-** राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांमधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी ‘‘महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान’’ राबविणेबाबत.

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये शासनाने राज्यातील महानगरपालिका मधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी ‘‘महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान’’ राबविणेबाबत मान्यता दिलेल्या शासन निर्णयावर चर्चा होवून मा. महासभा पुढील बाबींना मान्यता देत आहे.

१) महानगरपालिकेने महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार वरिल योजनेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिका स्वतःच्या क्षेत्राबाहेरिल २० चौ.कि.मी. क्षेत्रात विनामुल्य अग्निशमन सेवा उपलब्ध करुन देण्यास तयार असुन त्यास मान्यता देण्यात येत आहे.
२) अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी सुमारे एक ते दीड एकर जमिनीची आवश्यकता असुन महानगरपालिकेच्या नावे उपलब्ध असलेल्या आरक्षण क्र. १३२ येथील १३७५.७२ चौ.मी. जागा महानगरपालिका अग्निशमन केंद्रासाठी उपलब्ध करुन देत आहे. तसेच सर्व्हे क्र. ४३० पै. ४३१,४३२,४३३पै. मौजे नवघर येथील १३२७.७७ चौ.मी. जागा ही ॲमिनीटी ओपन स्पेस म्हणून विकासक स्वखर्चाने अग्निशमन स्थानक उभारुन महापालिकेस उपलब्ध करुन देणार आहेत. या ठिकाणी अग्निशमन केंद्र बांधण्यास कोणतीही अडचण येणार नाही.
३) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानात सहभागी होण्यासाठी आवश्यक ती सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) आवश्यक त्या कागदपत्रांसह भरुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या संदर्भातील हमीपत्र (Undertaking) भरुन देण्यासही मान्यता देण्यात येत आहे.
४) महानगरपालिका वरील दि.३१/०८/२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (1) अ (i) नुसार महानगरपालिका आपल्या हिश्श्याची रक्कम भरण्याचे मान्य करीत असुन त्या रकमेची तरतुद अर्थसंकल्पात करुन तसे प्रमाणपत्र (D.P.R.) सोबत जोडण्यास मान्यता देण्यात येत आहे.
५) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महानगरपालिका शासनाने विहीत केलेल्या सुत्रानुसार अनुदान उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिका अग्निशमन केंद्र २४ तास ३ पातळीमध्ये चालु ठेवण्यासाठी वरील शासन निर्णयातील परिशिष्ट – ड (भाग (२) नुसार आवश्यक ते मनुष्यबळ उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. मनुष्यबळावर येणाऱ्या आवर्ती खर्च महानगरपालिका करण्यास तयार आहे.
६) महानगरपालिका वरील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.(१) अ (V) (२) नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसुची – दोन मधील भाग एक व दोन नुसार फी आकारणी बंधनकारक असून महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र.

१२२ दि.१७/०३/२००७ अन्वये अग्निशमन फि आकारणी करीत आहे. तसेच वरील अधिनियमाच्या कलम २५ नुसार आग सुरक्षा निधी (Fire Protection fund) स्थापन करणे बंधनकारक आहे व त्यानुसार बँक ऑफ बडोदा या बँकेत आग सुरक्षा निधी खाते उघडण्यात आले आहे.

७) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या अनुदानातून अग्निशमन वाहन व सहउपकरणे शासनामार्फत निश्चित करण्यात येत असलेल्या दरकरारानुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) अग्निशमन वाहनाचा वापर केवळ अग्निशमन व विमोचन या कार्यासाठीच करण्यात यावा व अग्निशमन वाहनाचा शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०८/४२९/नवि-२४, दि.१७/०८/२००८ नुसार गैरवापर करण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

९) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ दि.०६/१२/२००८ पासून व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ दि. २३/०६/२००९ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१/०१/२०१० पासुन लागू झाले असून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

अग्निशमन अभियान राबविणेकामी हि मा. महासभा उपरोक्त नमुद अटीशर्तीस मान्यता देत आहे.

**आसिफ शेख :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, भाईंदर पश्चिम जागेचा उल्लेख केलेला आहे. ती जागा आजच्या तारखेला आपल्याकडे आहे का? कारण जी जागा ७/१२ उताऱ्यावर महापालिकेच नाव नाही. आणि आणखी एक बिल्डर फायरब्रिगेडचे काम करू देत नाही त्याबद्दल खुलासा करावा. मा. आयुक्त साहेब, पुढे भविष्यात आपल्यासा नॉर्केल नावाची मोठी गाडी येणार आहे. तिच फिरण डायव्हरशन. टर्न, रिव्हस ह्या सगळ्याचा विचार करून त्याच्या समोरचा रस्ता ही गाडी पार्क कशी होईल ह्या सगळ्यचा विचार करून आपल्याला अग्निशमन केंद्र बनवायचे आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

त्यानुसार प्लान मंजुर केले. आपल्याकडे १४०० स्क्वेअरफुट जागा आपल्या ताब्यात आली आहे. त्यानुसार बांधकाम नकाशे मंजुर केलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कुठला.

**सत्यवान धनेगावे :-**

फायर स्टेशन आरक्षण क्र. १३२, भाईंदर पश्चिम.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे आरक्षण ठेवल आहे. भविष्यात येणारी लांबी गाडी. त्यानुसार ह्याच्यामध्ये माझी माझी त्याच्यावर सुचना आणि हरकत आहे की, त्याच्यामध्ये तुम्ही कॉर्नरचा स्पॉट घ्या. तो बिल्डर तुम्हाला ती जागा रिझर्व्हेशनमध्ये देत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

३० मिटरचा रस्ता आहे. गाडी टर्निंगला वैगेरे काय प्रॉब्लेम नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कमला पार्कचे फायर स्टेशन तुमच्या नियमानुसार नाही. मेन रोडला आहे का? आतमधून गोल फिरवून आणायला लागते.

**सत्यवान धनेगावे :-**

ते ग्रामपंचायत काळापासून आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तशी चूक आता पून्हा झाली नाही पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही होणार.

**मिलन म्हात्रे :-**

ते जे कोपऱ्यावरच आरक्षण आहे त्याच्यामध्ये आपल्याला काय त्रास झाला.

**सत्यवान धनेगावे :-**

साहेब, चूक होणार नाही हयाची आम्ही काळजी घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

कोपऱ्यावरच होत त्याचा तुम्हाला काय त्रास झाला?

**सत्यवान धनेगावे :-**

ती जागा त्यांची नाही. जी जागा डेव्हलपर्स टी.डी.आरच्या माध्यमातून जागा उपलब्ध झाली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ती दिली नाही ना.

**सत्यवान धनेगावे :-**

दिली नाही. बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दिली नाही हे बोला मी ते बोलतो म्हणजे महापालिका मोठी की बिल्डर मोठा हे बोला. त्या बिल्डरने तुम्हाला जागा दिली नाही हे वास्तव आहे. आरक्षणाखालची जागा आहे. आणि ती तुम्ही घ्यावी असे माझे म्हणणे आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र ६९ :-**

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविणेबाबत.

**ठराव क्रं ७३ :-**

मा. संचालक सो, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी संदर्भिय पत्रान्वये अग्निशमन सेवेसाठी फी आकारणे, आग सुरक्षा निधी चालु करणे व पदनिर्मिती करणे याबाबत प्रस्ताव मागविला आहे.

मा. महासभा दि. १७/०३/२००७ प्रकरण क्र. १२२, ठराव क्र. ९३ अन्वये अग्निशमन सेवेसाठी फी आकारण्यात येते तसेच आग सुरक्षा निधी नावाने स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे.

सद्यःस्थितीत सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता आवश्यक वाहनांचा तपशिल पुढील प्रमाणे

**<u>तक्ता “अ” :-</u>**

| वाहने | आवश्यक वाहने | उपलब्ध वाहने | तफावत |
|---|---|---|---|
| फायर टेंडर | ९ | ६ | ३ |
| जीप | २ | २ | - |
| एकुण | ११ | ०८ | ०३ |

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०, दि.३१/८/२००९ अन्वये आवश्यक अग्निशमन स्थानकांचा तपशील पुढीलप्रमाणे

**<u>तक्ता “ब”</u>**

| आवश्यक स्थानके | उपलब्ध स्थानके | तफावत |
|---|---|---|
| ५ | ३ | २ |

सद्यःस्थितीत सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये उपरोक्त नमुद तक्ता “अ” व “ब” नुसार आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचा तपशिल पुढील प्रमाणे

**<u>तक्ता क्र. “क” (तक्ता क्र. १ ते २)</u>**

| अ. क्र. | पदाचे नाव | आवश्यक कर्मचारी | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | पदनिर्मीती करिता आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ | - | ०१ | - |
| २ | उप मुख्य / सहाय्यक अग्निशमन अधिकारी | ०१ | ०१ | ०१ | - | - |
| ३ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ५ (निवास व्यवस्था असल्यास) | ०३ | - | ०३ | ०२ |
| ४ | उप अग्निशमन अधिकारी | ५ (निवास व्यवस्था असल्यास) | ११ | ०९ | ०२ | - |
| ५ | प्रमुख अग्निशामक – विमोचक | ३० (२७ + १०%) | २० | १४ | ०६ | १० |
| ६ | चालक यंत्रचालक | ५९ | २३ | १७ | ०६ | ३६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (५४ + १०%) | | | | |
| ७ | चालक | ०७<br>(०६ + १०%) | - | - | - | ०७ |
| ८ | अग्निशामक – विमोचक | २१५<br>(१९५ + १०%) | ४६ | ४५ | ०१ | १६९ |
| **एकुण** | | **३२३** | **१०५** | **८६** | **१९** | **२२४** |

उपरोक्त तक्ता क्र. "ब" मध्ये नमुद केल्यानुसार ०२ अग्निशमन स्थानकांची तफावत निदर्शनास येत आहे. सदर पैकी आरक्षण क्र. १३२ व ॲमिनिटी ओपन स्पेस मौजे नवघर सर्वे क्र. ४३० पै, ४३१, ४३२, ४३३पै. या दोन ठिकाणी अग्निशमन स्थानके उभारणे प्रस्तावित आहेत. सदर बाबत आरक्षण क्र. १३२ मौजे भाईंदर तळ + १ पार्ट + २ मजले अग्निशमन इमारत बांधणेकामी सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार रु. १,३२,१०,३०४/- एवढा खर्च अपेक्षित आहे. अग्निशमन स्थानकांच्या सदर नमुद खर्चाच्या रक्कमेच्या महानगरपालिकेच्या हिश्श्याची रक्कम (६५%) एवढी वार्षिक अंदाजपत्रकात तरतुद करावयाची आहे तसेच महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील २० चौ.कि.मी. क्षेत्रात अग्निशमन सेवा मोफत उपलब्ध करुन द्यावयाची आहे तथापी वाणीज्य व औद्योगिक आस्थापनाकरीता मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दि.१७/०३/२००७ अन्वये अग्निशमन फि आकारणी करण्यास मान्यता असावी.

उपरोक्त तक्ता क्र. "क" मध्ये नमुद केल्यानुसार सन २००१ च्या जनगणनेनुसार ५.३० लाख लोकसंख्येकरिता व शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०, दि.३१/०८/२००९ अन्वये २२४ पदांची आवश्यकता आहे सन २०१०-११ या वर्षामध्ये अंदाजपत्रकानुसार तसेच लेखा विभागामधील माहितीनुसार रु.९८५.०६ लाख रक्कम जमा असून त्यापैकी रु. २१७.०० लाख एवढा खर्च झालेला आहे. तसेच सदर पदनिर्मितीकरिता जो काही खर्च होणार आहे तो अग्निशमन दलाकडून वसुल केला जाणाऱ्या महसुलातून केला जाणार आहे.

तरी वरील बाबी लक्षात घेता हि मा. महासभा

१) अंदाजपत्रकानुसार अग्निशमन स्थानक बांधणेकामी बांधकाम विभागामार्फत तयार केलेल्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.
२) सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात अग्निशमन स्थानक बांधण्याकरिता रु. १,३२,१०,३०४/- ऐवढया रक्कमेच्या ६५% ऐवढया रक्कमेची तरतुद करणेस मा. महासभा मंजुरी देत आहे.
३) महानगरपालिका हद्दीबाहेर २० चौ.की.मी. क्षेत्रात मोफत अग्निशमन सेवा उपलब्ध करुन देण्यास तसेच वाणिज्य व औद्योगिक तसेच रस्त्यावरील वाहन जळीत प्रसंगी मा. महासभा ठराव क्र. ९३ दि.१७/०३/२००७ नुसार अग्निशमन फि आकारणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.
४) गोषवाऱ्यात नमुद पदनिर्मीतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस हि मा. महासभा मंजुरी देत आहे.
५) सोबत जोडलेल्या ठरावाच्या मसुद्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.
६) १०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर शासनास हमीपत्र लिहून देण्यास हि मा. महासभा मंजुरी देत आहे.

## ठरावाचा मसुदा

**विषय :-** राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांमधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" राबविणेबाबत.

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र.२११/नवी-२०,दि.३१/०८/२००९ अन्वये शासनाने राज्यातील महानगरपालिका मधील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" राबविणेबाबत मान्यता दिलेल्या शासन निर्णयावर चर्चा होवून मा. महासभा पुढील बाबींना मान्यता देत आहे.

१) महानगरपालिकेने महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार वरिल योजनेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिका स्वतःच्या क्षेत्राबाहेरिल २० चौ.कि.मी. क्षेत्रात विनामुल्य अग्निशमन सेवा उपलब्ध करुन देण्यास तयार असुन त्यास मान्यता देण्यात येत आहे.
२) अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी सुमारे एक ते दीड एकर जमिनीची आवश्यकता असुन महानगरपालिकेच्या नावे उपलब्ध असलेल्या आरक्षण क्र. १३२ येथील १३७५.७२ चौ.मी. जागा महानगरपालिका अग्निशमन केंद्रासाठी उपलब्ध करुन देत आहे. तसेच सर्व्हे क्र. ४३० पै. ४३१,४३२,४३३पै. मौजे नवघर येथील १३२७.७७ चौ.मी. जागा ही ॲमिनीटी ओपन स्पेस म्हणून विकासक स्वखर्चाने अग्निशमन स्थानक उभारुन महापालिकेस उपलब्ध करुन देणार आहेत. या ठिकाणी अग्निशमन केंद्र बांधण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

३) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानात सहभागी होण्यासाठी आवश्यक ती सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) आवश्यक त्या कागदपत्रांसह भरुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या संदर्भातील हमीपत्र (Undertaking) भरुन देण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

४) महानगरपालिका वरील दि.३१/०८/२००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. (1) अ (i) नुसार महानगरपालिका आपल्या हिश्श्याची रक्कम भरण्याचे मान्य करीत असुन त्या रकमेची तरतुद अर्थसंकल्पात करुन तसे प्रमाणपत्र (D.P.R.) सोबत जोडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महानगरपालिका शासनाने विहीत केलेल्या सुत्रानुसार अनुदान उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिका अग्निशमन केंद्र २४ तास ३ पातळीमध्ये चालु ठेवण्यासाठी वरील शासन निर्णयातील परिशिष्ट – ड (भाग (२) नुसार आवश्यक ते मनुष्यबळ उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे. मनुष्यबळावर येणाऱ्या आवर्ती खर्च महानगरपालिका करण्यास तयार आहे.

६) महानगरपालिका वरील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.(१) अ (V) (२) नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसुची – दोन मधील भाग एक व दोन नुसार फी आकारणी बंधनकारक असून महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दि.१७/०३/२००७ अन्वये अग्निशमन फि आकारणी करीत आहे. तसेच वरील अधिनियमाच्या कलम २५ नुसार आग सुरक्षा निधी (Fire Protection fund) स्थापन करणे बंधनकारक आहे व त्यानुसार बँक ऑफ बडोदा या बँकेत आग सुरक्षा निधी खाते उघडण्यात आले आहे.

७) महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या अनुदानातून अग्निशमन वाहन व सहउपकरणे शासनामार्फत निश्चित करण्यात येत असलेल्या दरकरारानुसार खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) अग्निशमन वाहनाचा वापर केवळ अग्निशमन व विमोचन या कार्यासाठीच करण्यात यावा व अग्निशमन वाहनाचा शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र. अशस-१४०८/४२९/नवि-२४, दि.१७/०८/२००८ नुसार गैरवापर करण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे.

९) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ दि.०६/१२/२००८ पासून व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ दि. २३/०६/२००९ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१/०१/२०१० पासुन लागू झाले असून त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

अग्निशमन अभियान राबविणेकामी हि मा. महासभा उपरोक्त नमुद अटीशर्तीस मान्यता देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र ७०, सन्मा. सदस्य श्री. आसिफ गुलाब शेख यांचे दिनांक २०/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दि. ०१/०६/१९९५ पूर्वीच्या धोकादायक इमारतींना वाढीव चटईक्षेत्र देणेकरीता मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब आपल्या परवानगीने बोलते सन्मा. सदस्य आसिफ गुलाब शेख ह्यांनी जो प्रस्ताव दिला आहे. आपल्याला विनंती आहे की, येणाऱ्या ११ तारखेच्या महासभेला हा रितसर विषय घेतलेला आहे. तर त्यावेळेला महापालिकेकडून आवश्यक ती माहीती मिळाल्यास तुम्हाला विनंती आहे. तेव्हाच त्या विषयावर चर्चा करू.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आपल्या सर्वांना कल्पना आहे की, मागील महिन्यामध्ये दि. २३/०९/११ रोजी भाईंदर पूर्व येथे लता अपार्टमेन्ट खारीगांव ह्याठिकाणी जी धोकादायक इमारत होती. त्या इमारतीच्या स्लॅब कोसळून सात जण मृत्युमुखी पडले. आणि शहरात ह्याच पध्दतीने सुमारे ६६ किंबहूना त्यापेक्षा अधिक धोकादायक इमारती आहेत. कोणत्याही क्षणी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाईंदर (पूर्व) लता अपार्टमेंन्ट ह्याठिकाणी जेव्हा दुर्घटना झाली त्यावेळी आपल्या शहरातील प्रथम आमदार आदरणीय गिल्बर्ट जॉन मेंन्डोसा साहेब ह्यांनी स्वतः ह्या प्रकरणात अत्यंत गंभीरतेने लक्ष घालून ह्या संदर्भात तातडीने दुसऱ्या दिवशीच घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर सन्मा. आयुक्त विक्रम कुमारजी साहेब, ह्यांना लेखी निवेदन दिल. उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री आणि पालकमंत्री त्याचप्रमाणे नगरविकास विभागाचे प्रधान सचिव मा. थॉमस

बेजामिन साहेब ह्यांची भेट घेऊन मिरा भाईंदर शहराच्या धोकादाक इमारतीचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी शहरात असलेल्या धोकादायक इमारतीचे जे चटईक्षेत्र आहे. विद्यमान चटईक्षेत्र अधिक एक चटईक्षेत्र देण्यात यावा अशी सविस्तर चर्चा झाल्यानंतर सन्मा. आयुक्त साहेबांनी देखील ह्या संदर्भात गोषवारा सन्मा. महापौरांकडे दिला होता. जेणेकरून हा विषय तातडीने मार्गी लावावा. पण मा. महापौराची अडचण आम्ही समजू शकतो. त्यांनी विषयपत्रिकेवर विषय न घेतल्यामुळे आम्हाला वाटल की ही महत्वाची गरज आहे. आणि शहरवासियांच्या दृष्टीकोनातून जी लोक त्या धोकादायक इमारतीत जीव मुठीत घेऊन राहात आहेत त्यांचा कायम स्वरूपी प्रश्न मार्गी लागला पाहीजे. ह्या प्रामाणिक हेतूने, लोकहिताच्या दृष्टीकोनातून हा 'ज' चा प्रस्ताव आम्ही जो आम्हाला अधिकार मिळाला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची २ नियम १ मध्ये हा प्रस्ताव ह्या महासभेत सादर केला आहे. आणि आपण ह्या प्रस्तावावर तद्नंतर महासभा ह्या विषयासंदर्भात महासभा ११ तारखेला बोलावली आहे. तो विषय त्या महासभेत आहेच. आमचा उद्देश एवढा होता की, सभागृहाच्या निदर्शनास आणि विशेषतः सन्मा. महापौराच्या निदर्शनास हा विषय किती गंभीर आहे हे दाखविण्यात आणि कृतीत आणण्याचा विषय आमचा प्रामाणिक प्रयत्न होता त्या प्रयत्नात आम्ही यशस्वी झालो असे वाटते नागरिकांच्या भावना आपण लक्षात घेउन सन्मा. सभागृह नेत्या प्रभातताई पाटील हयांनी जी सुचना मांडली आहे त्या सुचनेस माझे अनुमोदन आहे. आगामी येणा-या सभेत हया संदर्भात आपण सविस्तर चर्चा करु. ह्या शहरातील धोकादायक विद्यमान चटईक्षेत्र अधिक एक हयाप्रमाणे वाढीव एफ.एस.आय करून देण्याचा ठराव पारित करण्यात यावा आणि तो ठराव तातडीने शासनाकडे पाठवावा म्हणजे धोकादायक इमारतीत राहणा-या शहरवासियाना प्रामाणिक न्याय देऊ शकू एवढच हया ठिकाणी नमुद करतो. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

शहरातील धोकादायक इमारतीचे सर्वेक्षण करण्यासाठी इमारतीची एकूण संख्या, रहिवाशी संख्या, जागेचे क्षेत्रफळ, विकासक, जागेची मालकी कोणाकडे आहे ते कायदेशीर पुढील सभेत घेण्यात येणार आहे. म्हणून आपल्याला प्रशासनाने ह्याच्याबद्दल व्यवस्थित माहीती ११ तारखेच्या मिटींगला द्यावी आणि त्याचा पाठपुरावा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब ह्यापूर्वी २००६ साली असा प्रस्ताव शासनाकडे गेलेला आहे. पुढच्या महासभेत हा प्रस्ताव उपस्थित करा. सन्मा. नगरसेवक मिलन पाटील बोलले की मुख्यमंत्र्याकडे प्रस्ताव तयार आहे. फक्त महासभेत यायची गरज आहे. आम्ही तीन महिन्यात आणू. आज पुन्हा प्रस्ताव आणायला लागतो. मा. आयुक्त साहेब, आमचे असे मत आहे मागे ठराव केलेला आहे. त्याची कुठपर्यंत पोच आहे. कुठपर्यंत शासनाकडे पडलेले आहे त्याची शहानिशा करा. प्रस्ताव गेलेला आहे.

**(सभागृहात गोंधळ )**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७१, सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांचे दिनांक २१/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- जागतिक पोलिस स्पर्धेत ३ सुवर्णपदक विजेत्या खेळाडू कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांचा यथोचित सन्मान करुन रोख पारितोषीक देणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाटेबंदर, उत्तन, भाईंदर (प.) येथील रहिवाशी व रेल्वे पोलिस दलामध्ये उपनिरिक्षक या पदावर कार्यरत कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांनी माहे सप्टेंबर २०११ मध्ये न्युयॉर्क (अमेरिका) येथे आयोजित जागतिक पोलिस आणि फायर गेम्स स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करताना १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक तसेच ४ X १०० मीटर रिले स्पर्धेमध्ये सुवर्णपदक जिंकलेली आहेत. या स्पर्धेमध्ये धावण्याच्या सर्व प्रकारामध्ये सुवर्णपदक जिंकुन कुमारी हेमा नाझरेथ भंगा यांनी आपल्या देशासोबत महाराष्ट्र राज्य व मिरा भाईंदर शहराचे संपूर्ण जगामध्ये नाव उज्वल केले आहे. तसेच कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन १२ सुवर्ण, ६ रौप्य व ३ कांस्य पदके अशी एकूण २१ पदके जिंकलेली आहेत. करिता कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्या मिरा भाईंदर शहरातील रहिवाशी असल्याने त्यांना योग्य ते रोख पारितोषीक देऊन यथोचित सत्कार करणे आवश्यक आहे. तसेच मा. स्थायी समिती सभा दि. १३/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांचे अभिनंदन केलेले आहे.

तरी कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांना महानगरपालिका सर्वसाधारण फंडातून (जनरल फंड) रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) रोख पारितोषीक देवुन पूढील महासभेत त्यांचा जाहिर सत्कार करणेत यावा असा मी ठराव मांडीत आहे.

**एस.ए.खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

हा ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र ७१ :-**

सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांचे दिनांक २१/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- जागतिक पोलिस स्पर्धेत ३ सुवर्णपदक विजेत्या खेळाडू कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांचा यथोचित सन्मान करुन रोख पारितोषीक देणेबाबत.

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाटेबंदर, उत्तन, भाईंदर (प.) येथील रहिवाशी व रेल्वे पोलिस दलामध्ये उपनिरिक्षक या पदावर कार्यरत कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांनी माहे सप्टेंबर २०११ मध्ये न्युयॉर्क (अमेरिका) येथे आयोजित जागतिक पोलिस आणि फायर गेम्स स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करताना १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक तसेच ४ X १०० मीटर रिले स्पर्धेमध्ये सुवर्णपदक जिंकलेली आहेत. या स्पर्धेमध्ये धावण्याच्या सर्व प्रकारामध्ये सुवर्णपदक जिंकुन कुमारी हेमा नाझरेथ भंगा यांनी आपल्या देशासोबत महाराष्ट्र राज्य व मिरा भाईंदर शहराचे संपूर्ण जगामध्ये नाव उज्वल केले आहे. तसेच कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन १२ सुवर्ण, ६ रौप्य व ३ कांस्य पदके अशी एकूण २१ पदके जिंकलेली आहेत. करिता कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्या मिरा भाईंदर शहरातील रहिवाशी असल्याने त्यांना योग्य ते रोख पारितोषीक देऊन यथोचित सत्कार करणे आवश्यक आहे. तसेच मा. स्थायी समिती सभा दि. १३/०९/२०११, ठराव क्र. ६१ अन्वये कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांचे अभिनंदन केलेले आहे.

तरी कुमारी हेमा नाझरेथ भंगा ह्यांना महानगरपालिका सर्वसाधारण फंडातून (जनरल फंड) रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) रोख पारितोषीक देउुन पूढील महासभेत त्यांचा जाहिर सत्कार करणेत यावा असा मी ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेब, ह्या सभेत मी मागे तीन महिन्यापूर्वी एक पत्र दिल होते. शरीर शौष्ठव स्पर्धेमध्ये त्यांनी राष्ट्रीय पातळीवर बक्षिस मिळविल्याबद्दल त्यांनाही आपण बोलवायच ठरवल होत. पण बोलवल नाही. त्याचाही विचार व्हावा.

**प्रभात पाटील :-**

हा विषय आपण ११ तारखेला घेतला आहे. हे बघा जर तो कॅन्सल करायचा असेल तर तो कॅन्सल करता येतो. कारण त्यांना ११ तारखेला बोलावून त्याचा सत्कार करा. विषयामध्ये बदल करा.

**(सभागृहात गोंधळ )**

**मा. महापौर :-**

मुलांचा सत्कार करण्यात येईल आणि त्यांना मानधन देण्यांत येईल.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, शाळेच्या मुलाचा आपण अजून सत्कार केलेला नाही. आता दुसरे पर्व चालू होईल. मिरा भाईंदरमध्ये फर्स्ट आलेले आहेत. त्यांचा आपण सत्कार केलेला नाही. दरवर्षी आपली प्रथा आहे. १२ वीला जी मुले पहिली आली आहेत त्यांचा देखील सत्कार केलेला नाही.

**मा. महापौर :-**

त्यांची नाव घेऊन त्यांचा ११ तारखेला सत्कार करू.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. महापौर साहेब, पिछले टाईम बॉम्ब ब्लास्ट वालोको पैसा देने का बोला था। अभी तक दिया नही।

**मा. महापौर :-**

देनेवाले है।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब मागच्या वेळेला सभा चालू असताना आपल्याला बोलले होते. मा. आयुक्तांकडून म्हणजे प्रशासनाकडून एक ‘ड’ मधील प्रकरण २ (१) (क) अन्वये ‘के’ चा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे. प्रस्ताव असा आहे.

**सिसिलिया बावीघर :-**

मा. महापौर साहेब श्री. निनाद मयेकर यांनी एक पत्र दिलेले आहे. त्यांनी सुध्दा इंटरनॅशनल लेव्हलला बक्षिस मिळवले आहे.

**प्रभात पाटील :-**

भाईंदर (प.) येथील ५० तासांवर गेलेला पाणी पुरवठा परिस्थितीत सुधारणा करणेसाठी पाण्यासाठीच्या १४०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे काम महानगरपालिकेने सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजूर केलेल्या निविदाधारकांकडून रेल्वे रुळाखालून टाकण्याचे काम मे. घई कंस्ट्रक्शन प्रा. लि. पुणे यांचेकडून करून घेण्यास व रेल्वे परवानगी शुल्क तसेच याकामासाठी तांत्रिक सल्लागार मे. राईटस् लि. यांची बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे नेमणूक करणे यासह रेल्वे परवानगी शुल्क भरणे इत्यादी पोटी येणारा रु.४,९७,३८,४८५/- एवढया खर्चास मा. महासभा ठराव क्र . ३० दि. ३०/०५/२०११ रोजी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

वस्तुस्थिती पाहता सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजूर केलेल्या निविदेअंतर्गत कामांच्या अंदाजपत्रकात रेल्वे क्रॉसिंगसाठी लागणाऱ्या एम.एस. पाईपलाईन टाकणे संबंधीत बाबींचा अंतभार्व नाही. त्यामुळे सदर काम करताना अतिरीक्त बाबी (क् न्द्यद्बह्ठ क्ष्द्यड्ढथ्) होणार आहे व महानगरपालिकेस अतिरीक्त खर्च होणार आहे. त्यामुळे सदर रेल्वे क्रॉसिंगचे काम सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजुर असलेले निविदे अंतर्गत न करता स्वतंत्र निविदा मागविण्यास मान्यता मिळावी. जेणेकरुन सदर काम सुधारीत अंदाजपत्रकानुसार विहीत वेळेत पुर्ण होणे शक्य होईल.

तरी उपरोक्त नुसार मे. घई कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिलेला कार्यादेश रद्द करून रेल्वे क्रॉसिंगच्या कामाची स्वतंत्र निविदा मागविण्यास व सदर ठरावामध्ये दुरूस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**कॅटलीन परेरा :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

हा ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

मा. महापौर साहेब, खांबित साहबसे जानकारी लेना, बांधकाम विभागसे, की। रेल्वे समांतर जो कल्वर्ट बना हुआ है। तो रेल्वे फाटकसे लेके वहॉ तक १५ फुट चौढा बनानेका प्रस्ताव पास हुआ था। साहब अभी तक काम चालू नही हुआ। बारीश आयेगा तो टेम्परारी गटर खोदते है। पुरे केबिन रोड पर पानी भरता है। तो उसका खुलासा करो.

**शशिकांत भोईर :-**

त्याच टेंडर पण पास झाले आहे. फक्त काम चालू करायच आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

खुलासा करेंगे तो अच्छा है। खाली बारीशके टाईमपे पुरा पानी भरता है। अभितक कुछ नही हुआ। काम कभी चालु करेंगे उसकी जानकारी लेना है। बारीश के टाईमतक होगा क्या?

**प्रकरण क्र. ७१अ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची “ड” मधील प्रकरण २ (१) (के) अन्वये प्रस्ताव -- भाईंदर (पूर्व ) व भाईंदर (पश्चिम) भाग जोडणारी मुख्य जलवाहिनी रेल्वमार्ग छेदून टाकावयाच्या कामाबाबत प्रकरण क्र. २९ ठराव क्र. ३० मा. महासभा दि. ३०/५/२०११ मध्ये दुरूस्ती करणेबाबत.

**ठराव क्र. ७५ :-**

भाईंदर (प.) येथील ५० तासांवर गेलेला पाणी पुरवठा परिस्थितीत सुधारणा करणेसाठी पाण्यासाठीच्या १४०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे काम महानगरपालिकेने सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजूर केलेल्या निविदाधारकांकडून रेल्वे रुळाखालून टाकण्याचे काम मे. घई कंस्ट्रक्शन प्रा. लि. पुणे यांचेकडून करून घेण्यास व रेल्वे परवानगी शुल्क तसेच याकामासाठी तांत्रिक सल्लागार मे. राईटस् लि. यांची बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे नेमणूक करणे यासह रेल्वे परवानगी शुल्क भरणे इत्यादी पोटी येणारा रु.४,९७,३८,४८५/- एवढया खर्चास मा. महासभा ठराव क्र. ३० दि. ३०/०५/२०११ रोजी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

वस्तुस्थिती पाहता सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजूर केलेल्या निविदेअंतर्गत कामांच्या अंदाजपत्रकात रेल्वे क्रॉसिंगसाठी लागणाऱ्या एम.एस. पाईपलाईन टाकणे संबंधीत बाबींचा अंतभार्व नाही. त्यामुळे सदर काम करताना अतिरीक्त बाबी (Extra Item) होणार आहे व महानगरपालिकेस अतिरीक्त खर्च होणार आहे. त्यामुळे सदर रेल्वे क्रॉसिंगचे काम सांडपाणी व्यवस्थेसाठी मंजुर असलेले निविदे अंतर्गत न करता स्वतंत्र निविदा मागविण्यास मान्यता मिळावी. जेणेकरुन सदर काम सुधारीत अंदाजपत्रकानुसार विहीत वेळेत पुर्ण होणे शक्य होईल.

तरी उपरोक्त नुसार मे. घई कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिलेला कार्यादेश रद्द करून रेल्वे क्रॉसिंगच्या कामाची स्वतंत्र निविदा मागविण्यास व सदर ठरावामध्ये दुरूस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील अनुमोदक :- सौ. कॅटलीन परेरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब २९ सप्टेंबरचा अनुपालन अहवाल आलेला आहे. त्याच्यात एक प्रश्न आहे. महापालिका क्षेत्रात नामकरण फलक यादी बांधकाम विभागाने दिली आहे. शहरातील रस्त्याना, चौकाना जी नाव दिली आहेत ती ५०० च्या वर आहेत. त्याच्यामध्ये काही-काही ठिकाणी असे झाले आहे की एकच मोठा रस्ता आहे. त्याला वेगळ नाव दिले आहे. आणि त्याच्यामध्ये क्रॉस करून अजून तीन चार नावे दिली आहेत. असा बराचसा घोळ त्या यादीमध्ये आहे. त्या यादीचे फायनल काय करणार? कारण फक्त १० टक्के रस्त्यावर बोर्ड लागले असतील. ह्या ५०० नावामधील त्याच्यासाठी समिती नेमून क्रिटीसाईज करणार आहात. पूर्ण शहरामध्ये रस्ते, चौक ह्यांना सुसंगत नाव असे दिले जावे. काय करणार आहात.

**भगवती शर्मा :-**

अनिल सावंतजी इसके अंदरमें मैने सार्वजनिक बांधकाम विभागको बताया था की एक रस्ता है, जिसके अलग-अलग जगहपे दो बार नाम है। तो उन्होने यह सुचना दि थी की, आपको सुचना दे दो ताकी उसको दुरुस्त किया जाए।

**अनिल सावंत :-**

ह्या शहरामध्ये आपण नाव देतो ती नाव त्या शहरातील संबंधीत लोकाविषयी असावी की ज्या लोकांनी ह्या शहरासाठी योगदान दिलेले आहे. स्वातंत्र्य सैनिक असावे जे भुमिपुत्र ह्या ठिकाणी होऊन गेले किंवा राष्ट्रपुरूषाची अशी नावे असावी की ज्यांनी खरोखरच ह्या देशासाठी काहीतरी केल आहे. ह्याच्यात बरेच स्वातंत्र्य सैनिक मिळतील की ज्यांचा कुठेच उल्लेख नाही. इतिहासामध्ये जे स्वातंत्र्य सैनिक होते आणि ह्या रस्त्याला आपण नाव दिले आहेत.

**दिपक खांबित :-**

ही जी नाव दिली आहेत ती महासभेनेच दिली आहेत.

**अनिल सावंत :-**

बरोबर आहे. नगरसेवकानीच प्रस्तावित केली आहेत. नगरसेवकांनी एखाद नाव प्रस्तावित केले सरसकट दिल गेल आहे.

**दिपक खांबित :-**

ह्याच्यामध्ये काय त्रुटी असतील तर हा विषय पुन्हा घेऊ या.

**अनिल सावंत :-**

माझी अशी विनंती आहे की, ह्याच्यासाठी संपूर्ण शहरातील जी नाव दिली आहेत त्याच्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली तुम्ही पदाधिका-याची एक कमिटी नेमा. चारही प्रभाग अधिकारी घ्या. आणि ते पूर्ण स्क्रुटीनी करा. आणि नंतर तो प्रस्ताव महासभेत आणा.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहब, आज यह कार्यकाल है। इसके पाच साल पहले अलग कार्यकाल है। यह बार-बार बदलते रहेंगे तो शहरके अंदरमे वातावरण भी अलग टाईप का हो जायेगा। इसपे किसीका ऑब्जेक्शन है। उस विषयको आप वापस लाओ और महासभा में मंजुरी दो। और जो नाव डबल है। जो दो बार एक जगह को है। उनको आप सुधारीत करो।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्या शहरासाठी स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांचा पहिला विचार करा.

**मा. महापौर :-**

ह्या शहरातील रस्त्याना स्वातंत्र्य सैनिकाची नावे देण्यात येईल.

**दिपक खांबीत :-**

आम्ही तुम्हाला यादी ह्यासाठी दिली आहे की, पत्र व्यवहार करताना ह्याप्रमाणे पत्रव्यवहार करावा. म्हणून यादी दिली आहे. पोस्ट ऑफीस, पोलिस आपले सगळे वॉर्ड ऑफीसर ह्याना दिली आहे. ह्यासाठी दिली आहे की ह्याप्रमाणे पत्रव्यवहार करावा.

**एस.ए.खान :-**

ज्यांना ज्यांना यादी दिली आहे त्यांनी ती फाईलला ठेवली आहे. आता ह्याचे फायनल करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यह प्रस्ताव लाया किसने। जब प्रस्ताव लाया तो उसका विरोध किया। सभा में चर्चा करने के लिए तयार नही थे। आप लोग आप को शरम क्यु आती है। हम जब प्रस्ताव लाते है। वह सोच समझ लाते है।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब त्यांनी प्रस्ताव आणला होता. त्या प्रस्तावावरच आपण ठराव केला होता. ती लिस्ट मागवावी म्हणून तेव्हा ते बोलले नाहीत. नाव द्यायचा प्रस्ताव आणला होता.

**(सभागृहात गोंधळ)**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चुकीच विधान करू नका.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

आपण शहरामध्ये नाव देताना नाव मोठे असले पाहिजे, रस्ता मोठा नाही आणि त्या नावामुळे तो रस्ता मोठा झाला पाहिजे. कोणाचे नाव द्यायचे, कोणी ठरवायचे ते नावे वाचल्यानंतर....... या शहरामध्ये आगरी समाजाचे खूप स्वतंत्र सैनिक आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही समाजावर जाऊ नका. मग मी बोललो तर तुमची सहनशक्ती असली पाहिजे.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

तेव्हा नावे देताना या सगळ्याचा विचार केला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, लॉजींग बोर्डिंगवरची कार्यवाही चालू आहे ना? ती जरा तीव्र करा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मा. उमहापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, श्री. आसिफ शेख, मी सगळ्यांना उद्देशून बोलते. मी संपूर्ण सभागृहाच्या वतीने बोलते. कारण मागून सारखे सभागृह नेता म्हणून मला गिव्हींग चालू आहे. त्या अनुषंगाने बोलते की, मागच्या मा. महासभेमध्ये नगरसेवकांच्या प्रशिक्षणांचा एक प्रस्ताव ठराव करूनच आपल्याकडे दिला होता. मगाशी बोलले, आत्ताही माझी मा. आयुक्तांना विनंती आहे की, आमचा हा कालावधी संपतो आहे. आणि पुढच्या कालाधीमध्ये निवडून येण्यासाठी आम्हाला अधिक प्रशिक्षणाची गरज आहे. त्यासाठी आमच्या प्रशिक्षण दौऱ्यास आपण लवकर मंजुरी द्यावी, ही विनंती.

**मा. महापौर :-**

या विषयाला मा. आयुक्त साहेब, निश्चितपणे मंजुरी देतील असे मी डिक्लेअर करतो. सर्व सन्मा. सदस्यांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडल्यामुळे सर्वांचे आभार व्यक्त करतो. सर्वांना दिवाळी व ईदच्या शुभेच्छा देतो. आणि आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ४.२८ वाजता.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**